सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ०५ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३३९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत पुढील सुनावणी ६ मे रोजी

### महापालिकांसह स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर

नवी दिल्ली : स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी ६ मे रोजी होणार आहे.

याआधी, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात मंगळवार, दि. ४ मार्च रोजी सुनावणी होणार होती. मात्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबतची अत्यंत महत्त्वाची सुप्रीम कोर्टातील सुनावणी मागील तारखेला होऊ शकली नाही. हे प्रकरण कोर्टाच्या २९व्या क्रमांकावर होते, मात्र कोर्ट क्रमांक ३ मध्ये दुपारी १ वाजेपर्यंतच कामकाज चालणार असल्याने फक्त आठव्या क्रमांकापर्यंतचीच प्रकरणे ऐकली गेली.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. या याचिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्यासंदर्भात विनंती न्यायालयाकडे करण्यात आली. तर ओबीसी आरक्षण असो किंवा नसो मात्र निवडणुका व्हाव्यात, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात केली आहे. राज्यात अनेक ठिकाणी ३ ते ४ वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाही. देशात लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे.

# अबू आजमीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झालाच पाहिजे

### विधानसभेत उपमुख्यमंत्री शिंदे कडाडले

मुंबई : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या मारेकऱ्याचे म्हणजे औरंगजेबाचे गोडवे गाणाऱ्या विधानसभा सदस्य अबू आजमी यांचा आम्ही निषेध करतो. अबू आजमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अतिशय आक्रमकपणे विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात केली.

याबाबत निवेदन करताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, धर्मरक्षक, स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना आणि त्यांच्या शौर्याला मी मानाचा मुजरा करतो. अबु आजमीसारखी माणसं शरीरानं भारतात राहात असली तरी मनानं मोगलाईतच जगत आहेत. त्यांना देशाच्या इतिहासाशी, संस्कृतीशी कसलंही देणंघेणं नाही. औरंगजेब कसा शासक होता हे जगाला माहीत आहे. औरंगजेब क्रुरकर्मा होता. तो कसला उत्तम प्रशासक. अशा राक्षसांची भलामण करणाऱ्या पिलावळीचा आम्ही धिक्कार करतो.

अबू आजमीवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा नोंदवावा अशी मागणी करीत उपमख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, अबु आजमिंनी कितीही माजोरडी विधानं केलीत तरी त्याने इतिहास बदलणार नाही. कारण हा इतिहास मराठ्यांच्या शौर्याचा आहे. पराक्रमाचा आहे.

नऊ वर्षात ६९ लढाया जिंकणारे शंभूराजे हे महापराक्रमी होते. उत्तम प्रशासक होते. औरंगजेबाचा खोटा इतिहास सांगण्यापेक्षा संभाजी महाराजांचा खरा इतिहास अबू आजमींनी शिकावा असे सांगत देश धरम पर मिटने वाला शेर शिवा का छावा था,महा पराक्रमी परम प्रतापी एक ही शंभू राजा था या ओळीने उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या निवेदनाचा समारोप केला.

## धनंजय मुंडेंनी दिला मंत्रिपदाचा राजीनामा



मुंबई : मस्साजोग सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फोटो हाती लागल्यानंतर आता राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर आली आहे. राज्याचे अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला आहे.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचे बोलले जाते. मुंडे यांच्या निवडणुकीचे व्यवस्थापन वाल्मिक कराडकडे होते, असा दावा केला जातो. राजकीय अभय, वरदहस्त असल्याने कराडने बीडमध्ये गुन्हे केले आणि पचवले असल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जात आहे. वाल्मिक कराड आरोपी असल्याने या प्रकरणी तपास योग्य रीतीने होणार नाही, असेही विरोधकांनी म्हणत धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत होती. धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी आपल्यावरील आरोपांबाबत स्पष्टीकरण दिले. धनंजय मुंडे हे अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राजीनामा देतील असा दावा त्यांच्या पत्नी करुणा मुंडे यांनी केला होता. मात्र, मुंडेंनी राजीनामा न दिल्याने त्यांचा दावा फोल ठरला होता. त्यानंतर करूणा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला असून तो दोन तीन दिवसांत जाहीर केला जाईल, असा नवा दावा केला होता.

## राम मंदिरावरील हल्ल्याचा कट उधळला, फरीदाबाद येथून दहशतवादी अब्दुल रहमानला अटक

### गुजरात आणि फरीदाबाद एसटीफची संयुक्त कारवाई

नवी दिल्ली : अयोध्येच्या श्रीराम मंदिरावरील दहशतवादी हल्ल्याचा कट उधळून लावण्यात आलाय. याप्रकरणी गुजरात व फरीदाबाद एटीएसने रविवारी अब्दुल रहमान नामक दहशतवाद्याला अटक केली होती. चौकशीत त्याने राम मंदिरावरील हल्ल्याच्या योजनेचा खुलासा केलाय. विशेष म्हणजे अब्दुलकडून २ हँण्ड ग्रेनेड देखील जप्त केले आहेत.

यासंदर्भात चौकशीत पुढे आलेल्या माहितीनुसार, जिहादी दहशतवादी अब्दुल रहमान फरीदाबादचा रहिवासी असून तो व्यवसायाने मांस विक्रेता (कसाई) आहे. पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयने अब्दुलला प्रशिक्षण दिले होते. तसेच त्याला हल्ल्यासाठी २ हँण्ड ग्रेनेड देण्यात आले होते. हे बॉम्ब घेऊन अब्दुल रहमान अयोध्येला जाणार होता. त्याने हे दोन्ही बॉम्ब एका पडक्या घरात लपवून ठेवले होते. या पडक्या घरातून काही व्हिडीओ सापडले असून त्यात देशातील प्रमुख धार्मिक स्थळांची माहिती आहे.

अयोध्येच्या मिल्कीपूरचा रहिवासी असलेला रेहमान हा शंकराच्या नावाने फरीदाबादच्या पाली येथे लपून बसला होता. तो येथे एका कूपनलिकेच्या चेंबरमध्ये राहत होता, ज्याच्या मालकाचे काही दिवसांपूर्वी निधन झाले होते. कुठलाही घातपात घडवण्यापूर्वी अब्दलला झालेली अटक हे गुजरात एटीएसचे हे मोठे यश म्हणून पाहिले जात आहे.

## ओला इलेक्ट्रिक कंपनी १००० कर्मचाऱ्यांना दाखवणार बाहेरचा रस्ता!

बंगळूरु : भाविश अग्रवाल यांनी स्थापन केलेली भारतीय इलेक्ट्रिक वाहन निर्माता कंपनी गेल्या काही आठवड्यांपासून चांगलीच चर्चेत आली आहे. पाच महिन्यांपूर्वी या कंपनीने कंपनीने नोकरकपात जारी केली होती. यामध्ये सुमारे ५०० कर्मचाऱ्यांना कंपनीने काढून टाकले होते. त्यानंतर आता पुन्हा ओला इलेक्ट्रिक कंपनीने नोकरकपात काढली असून १००० कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा निर्णय घेणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ओला इलेक्ट्रिकच्या शेअरमध्ये देखील मोठी घसरण झाल्याचे पाहायला मिळालं होते.

## भारताच्या आर्थिक विकासात एमएसएमईंची महत्त्वपूर्ण भूमिका - पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली : भारताच्या आर्थिक प्रगतीत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) परिवर्तनकारी भूमिका बजावत आहेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

वाढ, उत्पादन, निर्यात आणि अणुऊर्जेचे इंजिन या विषयावरील वेबिनारला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारत सरकार स्वावलंबी भारताच्या दृष्टीकोनातून काम करत आहे आणि सुधारणा आणण्याचा वेग वाढवत आहे. आज देशात ६ कोटींहून अधिक एमएसएमई कार्यरत असून, यामुळे कोट्यवधी लोकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

पंतप्रधानांनी स्पष्ट केले की, यंदाच्या अर्थसंकल्पात एमएसएमईंची व्याख्या अधिक व्यापक करण्यात आली आहे, जेणेकरून या क्षेत्रातील उद्योगांना अधिक संधी आणि आत्मविश्वास मिळेल. परिणामी, तरुणांसाठी रोजगाराच्या संधी वाढतील.

मोदी यांनी नमूद केले की, उत्पादन-संबंधित प्रोत्साहन योजनेचा १४ उद्योगांना लाभ झाला असून, आतापर्यंत ७५० हून अधिक युनिट्स मंजूर करण्यात आल्या आहेत. यामुळे १.५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक, १३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पादन, आणि ५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निर्यात झाली आहे.

ते पुढे म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत भारताने आर्थिक सुधारणा, पारदर्शकता, आणि समावेशक विकास यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. सरकार उद्योगांसाठी सोयीस्कर आर्थिक वातावरण निर्माण करत आहे आणि एमएसएमईंना वित्तीय मदत सहज मिळावी यासाठी नव्या पद्धती शोधत आहे. ५ लाख नवोदित महिला उद्योजक, अनुसूचित जाती आणि जमातीतील उद्योजकांना २ कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. मोदींनी असेही सांगितले की, कोविडच्या आर्थिक परिणामांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात भारत यशस्वी ठरला असून, त्यामुळे देश जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक बनला आहे. आज जगभरातील देश भारतासोबत आर्थिक भागीदारी मजबूत करू इच्छित आहेत. त्यामुळे भारतीय उद्योजक आणि उत्पादकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## शेतकऱ्यांना आवाहन; पीक कर्जाचे नूतनीकरण करा : दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.४(जिमाका):- ज्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज थकीत आहे अशा शेतकऱ्यांनी थकीत पीक कर्जाचे नुतनीकरण ३१ मार्च अखेर पूर्ण करुन घ्यावे, त्यासाठी संबंधित बँकेशी संपर्क साधावा, जेणेकरुन पुढील हंगामासाठी पीक कर्ज घेणे सुलभ होईल,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

जिल्हास्तरीय बँक समन्वय समितीची आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. अपर जिल्हाधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक शिरसे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी रेशमा चिमंद्रे, रिझर्व बँक ऑफ इंडियाचे जिल्हा अग्रणी प्रबंधक अमितकुमार मिश्रा, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्निल राठोड, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी सुरेश पटवेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांच्यासह विविध विभाग प्रमुख,विविध बँकेचे प्रमुख बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात आतापर्यंत ४ लाख २१ हजार शेतकऱ्यांना ३०३२ कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटप झाले आहे. त्यापैकी १ लाख ८८ हजार शेतकऱ्यांनी १७२४ कोटी रुपयांचे पीक कर्ज नुतनीकरण केले नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना नवीन पीक कर्जाचा लाभ देण्यात अडचणी निर्माण होतात. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्रशासनातर्फे ३ टक्के तर राज्य शासनातर्फे ४ टक्के असे एकूण ७ टक्के अनुदान मिळते. तथापि, शेतकऱ्यांनी आपल्या कर्जाचे नुतनीकरण न केल्याने शेतकऱ्यांना या अनुदानापासून वंचित रहावे लागते शिवाय नवीन पीक कर्ज देता येत नाही. जिल्ह्यातील बँकाची पीककर्जाची वसूली झालेली नाही. जिल्ह्यातील प्रमुख बँकांची असलेली थकबाकी याप्रमाणे-बँक ऑफ महाराष्ट्र ४३३ कोटी पैकी ३६५ कोटी रुपये थकबाकी (८४ टक्के), स्टेट बँक ऑफ इंडीयाचे ७१६ कोटी पैकी ३१७ कोटी थकबाकी (४४ टक्के), महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे ६०१ कोटी पैकी ३८२ कोटी थकबाकी (६४ टक्के), जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ८४४ कोटी रुपयांपैकी३३७ कोटी (४० टक्के) थकबाकी आहे. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा जसे की, कृषी पायाभुत सुविधा, अन्न प्रक्रिया उद्योग, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, राष्ट्रीय पशुधन मिशन इ. विविध योजनांचा लाभ घेता येत नाही,असेही यावेळी सांगण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, ३१ मार्च २०२५ पूर्वी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम. प्रधानमंत्री विश्वकर्मा, कृषी पायाभुत सुविधा, अन्न प्रक्रिया उद्योग या योजनांना बँकांनी अर्थसहाय्य करुन आपापले उद्दिष्टपूर्ती करावी. तसेच महिला व बालविकास विभागामार्फत ई- पिंक रिक्षासाठी अर्थसहाय्याचे ५०० हून अधिक प्रस्ताव सादर करण्यात आले, हे प्रस्ताव बँकांनी तातडीने मंजूर करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

## 'विदर्भाच्या कृषी क्रांतीस नवा आयाम:१००० कोटींच्या पतंजली फूड पार्कचे ९ मार्च रोजी भव्य उद्घाटन!'

नागपूर : विदर्भातील शेतकर्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी पतंजली योगपीठाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. तब्बल १००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून नागपूरमध्ये 'पतंजली फूड आणि हर्बल पार्क' स्थापन केला जात असून त्याचा भव्य उद्घाटन समारंभ ९ मार्च २०२५ रोजी पार पडणार आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पतंजली योगपीठाचे संस्थापक बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण देखील उपस्थित राहणार आहेत.



विदर्भातील अनेक जिल्ह्यांत गेल्या अनेक वर्षांपासून शेतकर्यांच्या आत्महत्या सातत्याने वाढत आहेत. कर्जबाजारीपणा, नैसर्गिक संकटे आणि हमीभावाच्या अभावामुळे हजारो शेतकरी संकटात सापडले आहेत. याच पार्श्वभूमीवर, पतंजली योगपीठाने 'शेतकर्यांच्या अर्थसक्षमीकरणासाठी आणि आत्मनिर्भरतेसाठी' हा मोठा निर्णय घेतला आहे.

हा प्रकल्प म्हणजे कृषी आधारीत उद्योगांचा विशाल संकुल आहे. येथे शेतकर्यांकडून मोठ्या प्रमाणात कच्चा माल खरेदी केला जाणार असून त्यावर प्रक्रिया करून निर्यातही केली जाईल.यामुळे शेतकर्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य दर मिळेल आणि त्यांचे उत्पन्न वाढेल. या प्रकल्पामुळे अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्यांतील शेतकर्यांना मोठा फायदा होणार आहे.येथे जवळपास ५०,००० लोकांना थेट व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होईल. कारण हा प्रकल्प म्हणजे केवळ उद्योग नाही, तर हजारो कुटुंबांच्या उज्ज्वल भविष्याची हमी ठरणार आहे.

२०१६ मध्ये पतंजली योगपीठाने महाराष्ट्रात शेतकर्यांसाठी विशेष धोरण आखले होते. आता नागपुरातील हा प्रकल्प त्या धोरणाचा पुढील टप्पा आहे. स्वदेशी संकल्पनेला प्रोत्साहन देत बाबा रामदेव यांनी नेहमीच भारतीय शेतकर्यांच्या हितासाठी काम करण्याची ग्वाही दिली आहे. सध्या शेतकर्यांना त्यांच्या पिकाला योग्य हमीभाव मिळत नाही, यामुळे त्यांना नुकसान सहन करावे लागते. परंतु या प्रकल्पामुळे 'शेतकर्यांच्या कष्टाला आता थेट पतंजलीचा मजबूत आधार मिळणार, त्यामुळे दलालांची साखळी तोडली जाईल आणि शेतकर्यांचे उत्पन्न वाढेल.

९ मार्च रोजी होणार्या उद्घाटन सोहळ्यास देशभरातील शेतकरी, पतंजली योगपीठाचे प्रमुख नेते आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात नितीनजी गडकरी,देवेंद्र फडणवीस,बाबा रामदेव, आचार्य बाळकृष्ण, हे शेतकर्यांना मार्गदर्शन करतील. या प्रकल्पामुळे सेंद्रिय शेतीला चालना मिळेल, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होईल आणि पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन मिळेल. पतंजली योगपीठाने विदर्भातील शेतकर्यांना नवा आत्मविश्वास देण्याचे ध्येय ठेवले आहे. 'पतंजली फूड आणि हर्बल पार्क' हा विदर्भातील 'विदर्भाच्या कृषी क्रांतीस नवी दिशा देणारा हा प्रकल्प' ठरणार आहे. भारतीय शेतीच्या उज्ज्वल भविष्यासाठी पतंजलीचे हे धाडसी पाऊल विदर्भातील शेतकर्यांना एक नवी उमेद देईल.नागपूरसारख्या महत्त्वाच्या केंद्रातून हा प्रकल्प सुरू होत असल्याने संपूर्ण महाराष्ट्राला त्याचा फायदा होईल.निराशेच्या गर्तेत अडकलेल्या विदर्भातील शेतकर्यांसाठी हा प्रकल्प नवसंजीवनी ठरेल.

उत्सव पर्यटनाचा... केसरीसोबत जग पाहण्याचा!

जे जे नवीन ते ते दाखवणं... हाच आमचा ध्यास! नव्या टूर्स, नवीन साईटसिईंग्स्.




स्नोवाला हॉलीडे, बीचवाला हॉलीडे, क्रुझवाला हॉलीड की ॲडव्हेंचरवाला हॉलीडे...चला तर!

प्रत्येक बजेट आणि पसंतीनुसार टूर्स. फोर-फाईव्ह स्टार हॉटेल्स,** बेस्ट एअरलाईन्स आणि दर्जेदार सेवा.

युरोप टूर्स

| टूर कोड दिवस | | | बोनान्झा प्राईस |
|---|---|---|---|
| ET 08 | बेस्ट ऑफ टर्की | ~~1,93,000~~ | 1,79,000* |
| EP 08 | प्राग व्हिएन्ना बुडापेस्ट स्लोव्हेनिया क्रोएशिया | ~~2,46,000~~ | 2,29,000* |
| ER 09 | बेस्ट ऑफ ईस्टर्न युरोप | ~~2,61,000~~ | 2,44,000* |
| EE 07 | फ्रेंच रिव्हीएरा | ~~2,68,000~~ | 2,49,000* |
| EF 09 | फ्लेवर्स ऑफ इटली लेक कोमो | ~~2,84,000~~ | 2,64,000* |
| EL 09 | स्विस पॅरिस | ~~3,01,000~~ | 2,84,000* |
| EM 08 | बेस्ट ऑफ स्वित्झर्लंड | ~~3,03,000~~ | 2,84,000* |
| EW 09 | बेस्ट ऑफ स्कँडिनेव्हिया | ~~3,13,000~~ | 2,94,000* |
| EH 15 | स्पेन पोर्तुगाल मोरोक्को | ~~3,61,000~~ | 3,44,000* |
| EO 13 | इंग्लंड स्कॉटलँड आयर्लंड वेल्स | ~~3,71,000~~ | 3,49,000* |
| E1 22 | ऑल ऑफ युरोप | ~~5,04,000~~ | 4,74,000* |

इतर इंटरनॅशनल टूर्स

| टूर कोड दिवस | | | बोनान्झा प्राईस |
|---|---|---|---|
| UW 07 | युएसए वेस्ट कोस्ट J/L | ~~2,20,000~~ | 1,93,000* |
| PW 06 | बेस्ट ऑफ रशिया | ~~2,08,000~~ | 1,95,000* |
| VS 08 | साऊथ आफ्रिका पिलान्सबर्ग | ~~2,34,000~~ | 2,14,000* |
| JS 08 | क्लासिक साऊथ कोरिया | ~~2,45,000~~ | 2,24,000* |
| A1 17 | ऑस्ट्रेलिया न्यूझीलँड | ~~2,56,000~~ | 2,44,000* |
| JF 08 | जपान चेरी ब्लॉसम | ~~3,22,000~~ | 2,84,000* |
| JA 10 | जपान अल्पाईन रूट आशिकागा फ्लॉवर पार्क | ~~3,25,000~~ | 2,94,000* |
| V1 13 | साऊथ आफ्रिका केनिया व्हिक्टोरिया फॉल्स | ~~4,11,000~~ | 3,84,000* |
| J1 15 | जपान चायना | ~~4,60,000~~ | 4,29,000* |
| VM 11 | क्लासिक मादागास्कर केनिया | ~~4,65,000~~ | 4,34,000* |
| VT 07 | टांझानिया वाईल्डलाईफ स्पेशल | ~~5,69,000~~ | 5,35,000* |

ईझी व्हिसा टूर्स

| टूर कोड दिवस | | | बोनान्झा प्राईस |
|---|---|---|---|
| FT 06 | थायलँड | ~~78,000~~ | 71,000* |
| FY 07 | फुकेत क्राबी बँकॉक | ~~1,02,000~~ | 92,000* |
| MS 08 | श्रीलंका | ~~1,03,000~~ | 94,000* |
| WB 05 | बाकू छोटा ब्रेक | ~~1,16,000~~ | 99,000* |
| WS 05 | सिंगापूर | ~~1,25,000~~ | 1,16,000* |
| M1 06 | मॉरिशस | ~~1,30,000~~ | 1,19,000* |
| D1 07 | दुबई अबूधाबी | ~~1,28,000~~ | 1,19,000* |
| FI 08 | बाली जकार्ता | ~~1,48,000~~ | 1,39,000* |
| FH 07 | हाँगकाँग शेंगेन मकाओ | ~~1,69,000~~ | 1,62,000* |
| F2 10 | सिंगापूर थायलँड मलेशिया | ~~1,74,000~~ | 1,64,000* |
| FV 10 | व्हिएतनाम कंबोडिया | ~~1,83,000~~ | 1,74,000* |

हिमालयन टूर्स

| टूर कोड दिवस | | | बोनान्झा प्राईस |
|---|---|---|---|
| H6 08 | पॅनोरॅमिक शिमला मनाली | ~~35,000~~ | 31,000* |
| H7 08 | डलहौसी धरमशाला अमृतसर | ~~38,000~~ | 34,000* |
| NH 07 | लेह लडाख | ~~43,000~~ | 39,000* |
| NS 07 | दार्जिलिंग गँगटोक | ~~43,000~~ | 39,000* |
| K6 07 | पॅनोरॅमिक काश्मीर वैष्णोदेवी | ~~44,000~~ | 40,000* |
| N6 08 | नैनिताल मसूरी कॉर्बेट पार्क | ~~47,000~~ | 43,000* |
| ON 06 | अमरनाथ यात्रा | ~~56,000~~ | 52,000* |
| NX 08 | लेह ॲप्रिकॉट ब्लॉसम | ~~78,000~~ | 74,000* |
| NP 08 | नेपाळ | ~~79,000~~ | 75,000* |
| O1 13 | उत्तरांचल चारधाम यात्रा | ~~80,000~~ | 76,000* |
| NZ 10 | भूतान | ~~98,000~~ | 94,000* |

आंतरराष्ट्रीय महिला दिन - महिलांसाठी खास ऑफर! 8 मार्च पर्यंतच. देशविदेशातील टूर बुक करा, हजारो वाचवा*

युरोपसाठी 10 किंवा अधिक जणांचा ग्रुप असल्यास एक्स्पर्टस्शी बोला 91 6783 5005 / 91 6783 5003

*T & C Apply **फोर-फाईव्ह स्टार हॉटेल्स ठराविक टूर्सवर उपलब्ध

केसरीच्या स्पेशॅलिटी टूर्स | KESARI SELECT CUSTOMIZED HOLIDAYS 1800 266 9080, 86577 58850 | KESARI MICE CORPORATE TOURS 70300 11444, 914556 1122 | Shop travel-curated products. Visit: www.shop.kesari.in

9167 835 071 | 1800 266 1100
ऑफिस/कॉल सेंटर:सोमवार ते शनिवार 10 ते 8, रविवार 11 ते 6

मुंबई 022-61744100 | विलेपार्ले 7045 23 4545 | बोरीवली 022 69582200 | वसई 7045 00 0031 | ठाणे 022-69721100 | डोंबिवली 7045 00 0041 | वाशी 022-69462222 | नाशिक 0253-6914444 | पुणे 020-66465555 | बाणेर 020-69101234 | नागपूर 0712-6921717 | कोल्हापूर 0231-2533222 | छत्रपती संभाजीनगर चेतना नगर 9822 26 7567 | सिडको 9960 08 2472 | परभणी 9422 17 6466 | गरखेडा | जालना | धाराशिव

KESARI.in

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# केंद्र शासनाचा पद्मश्री पुरस्कार नुकताच जाहीर झालेले चैत्राम पवार यांचा भव्य नागरी सत्कार

## रास्वसंचे अ.भा.कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशींची उपस्थिती

छत्रपती संभाजीनगर – धुळे जिल्ह्यातील बारीपाडा या एकेकाळच्या उजाड, ओसाड व कायम दुर्भिक्ष्यग्रस्त जनजातीय गावात, शाश्वत विकासाच्याद्वारे नंदनवन फुलविणाऱ्या, श्री चैत्राम पवार यांना केंद्र शासनाचा पद्मश्री पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. त्यानिमित्त शनिवार, दिनांक ८ मार्च रोजी, एमजीएम येथील रुक्मिणी सभागृहात भव्य नागरी सत्कार सोहोळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६:०० वा. होणाऱ्या या सत्कार समारंभास, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य मा. श्री भैय्याजी जोशी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. एमजीएम चे सचिव व कुलपती मा. श्री अंकुशराव कदम हे प्रमुख अतिथी असतील.

सत्कार समारंभाच्या नियोजनासाठी शहरातील मान्यवरांची स्वागत समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रसिद्ध उद्योजक श्री अशोक काळे हे स्वागत समितीचे अध्यक्ष तर अॅड. विशाल बडाख हे कार्यवाह आहेत. उपाध्यक्ष, श्री फुलचंदजी जैन, सहकार्यवाह, अॅड.श्री अनिलकुमार धोंगडे, समिती सदस्यांमध्ये उद्योजक श्री गिरीश मगरे, श्रीराम पुलकुंडवार, श्री विश्वनाथ जालनापुरकर, श्री वसंत पाटील, श्रीमती नताशा झरीन केळकर, डॉ श्री विकास कापरे, श्री अशोक रंगदळ, श्री राहुल पगारिया, श्री विनोद भाले, श्री अनिल सोनी, प्रकाश खोसे, शिक्षण क्षेत्रातील श्री मुनिषजी शर्मा, श्रीअब्दुल हुसेन तसेच श्री जितेंद्रजी देसले, श्री परागजी भामरे, देवगिरी कल्याण आश्रमच्या शहर समितीच्या अध्यक्षा अॅड. स्वाती पाडळकर, सचिव श्री अभिमन पवार, पर्यावरण क्षेत्रातील मान्यवर श्री प्रशांतजी गि–हे यांचा समावेश आहे.

सत्कार समारंभात पद्मश्री श्री चैत्राम पवार यांना शाल श्रीफळ सन्मानपत्र व सन्माननिधी अर्पण करण्यात येणार आहे. याप्रसंगी श्री चैत्राम पवार यांची प्रगट मुलाखत घेण्यात येणार असून बारीपाड्याच्या शाश्वत विकासाची यशोगाथा ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून उलगडवून दाखवण्यात येणार आहे. पद्मश्री चैत्राम पवार यांनी बारीपाडा व परिसराचा कायापालट कसा घडवून आणला हे पाहणे मोठे उद्बोधक ठरेल.

वर्षानुवर्षे दुष्काळी परिस्थिती, पाण्याचे मोठे दुर्भिक्ष्य, रोजगाराअभावी होणारे वाढते स्थलांतर, बेसुमार जंगलतोड, शिक्षण व वैद्यकीय सुविधांचा अभाव, परिणामी अठरा विश्व दारिद्र्य पाचवीलाच पुजलेले. या अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून, एका ध्येयाने प्रेरित होऊन, जिद्दीने मार्ग काढत, चैत्राम पवार या वनवासी युवकाने बारीपाड्यात कामाला सुरुवात केली. गावातील ग्रामस्थांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहकार्याने जन, जल, जंगल, जमीन, जानवर, जीव व ऊर्जा या सप्तसंपदांच्या आधारावर शाश्वत व सर्वांगीण विकासाचा पाया रचला. जेथे पूर्वी दोन विहिरीतून सहामाही पाणी मिळणे सुद्धा कठीण होते. तेथे ३० पेक्षा जास्त विहिरींचे पाणी ओसंडून वहायला लागले. शेतीची सिंचन क्षमता वाढली. बारमाही पिके. फळबागा, दुग्धोत्पादन व छोटे मोठे कृषी आधारित उद्योग सुरू झाले. एवढेच नाही तर परिसरातील जैवविविधता मोठ्या प्रमाणावर वाढली याची नियमित नोंद येथे ठेवण्यात येते.शाश्वत विकासाची गंगा, बारीपाड्यासारख्या जनजाती क्षेत्रात प्रवाहित करणाऱ्या, आधुनिक भगिरथाच्या या सत्कार सोहळ्यात, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नागरी सत्कार सोहळा स्वागत समितीचे अध्यक्ष श्री अशोक काळे, कार्यवाह अॅड. विशाल बडाख व सर्व स्वागत समिती सदस्य तसेच देवगिरी कल्याण आश्रम छत्रपती संभाजी नगर शहर अध्यक्षा अॅड. स्वाती पाडळकर व सचिव अभिमन पवार यांनी केले आहे.

# औरंगाबाद जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनतर्फे भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन!

छत्रपती सभाजीनगर . प्रतिनिधी श्री. जगन्नाथजी उर्फ आप्पासाहेब शिंदे यांच्या अमृत महोत्सवी , औरंगाबाद जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने दिनांक ५ व ६ मार्च २०२५ रोजी स्वर्गीय रावसाहेब खेडकर मेमोरियल केमिस्ट प्रीमियर लीग २०२५ या भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध संघांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. दोन दिवस चालणाऱ्या या रोमांचक स्पर्धे चे नियोजन संघटनेचे अध्यक्ष नितीन देशमुख, सचिव विनोद लोहाडे, कोषाध्यक्ष निखिल सारडा, उपाध्यक्ष नंदकुमार काळे,सागर पाटील सहसचिव किरण जोशी ,सुनील देशमुख कार्यकारिणी सदस्य बाबुराव सोनावणे ,कपिल टिबडीवाला,रईस शेख, वसंत भराड, हरीश काबरा सचिन मुगदिया, प्रभू गिरी, सुरेश बोरसे, अशोक धस,प्रवीण तिवारी, देविदास, मगर विनोद ठोंबरे, तसेच राहुल कोरडे, आशिष भारूका, महेश सोनी व निखिल कासलीवाल यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यासाठी विशेष अतिथी म्हणून क्रिकेट विश्वातील मान्यवर खेळाडू उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे हा सोहळा अधिक भव्य व संस्मरणीय ठरणार आहे.

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेचे कौन्सिल मेंबर मा. मनोहर कोरे यांनी स्पर्धेच्या आयोजनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२६/२०२५

पुढील तारीख २९/०३/२०२५

अर्जदार : १. नसरीन भ्र. युसुफ शेख, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. शफेपुर (पिशोर), ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. जोहेब पिता युसुफ शेख, वय २६ वर्षे, धंदा शेती, रा. शफेपुर (पिशोर), ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत युसूफ महेबुब शेख याची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयत युसूफ महेबुब शेख यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ची पत्नी व अर्जदार क्र. २ चे वडील नामे युसूफ महेबुब शेख ही दि.२३/०९/२०२४ रोजी मौजे पिशोर, ता. कन्नड येथे आजारपणामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ व २ यांना मयत युसूफ महेबुब शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ व २ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत युसूफ महेबुब शेख हे मौजे पिशोर, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ व २ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०२/१२/२०२४ रोजी मौजे पिशोर, ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १८/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायधीश क. स्तर. कन्नड

# फर्निचर कामासाठी आलेल्या दोन राजस्थानी कामगाराचा शेततळ्यात बुडून मृत्यू



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ४ मार्च पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील म्हारोळा शिवारातील गट नंबर २०६ येथील शेतीमालक नंदकिशोर जयराम पावणे यांच्या शेतातील फार्म हाऊसच्या फर्निचरच्या कामासाठी आलेल्या दोन राजस्थानी परप्रांतीय मजुराचा शेततळ्यात पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना दि ३ मार्च रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास घडली असून यामधे रामकिशोर सत्यनारायण जांगीड (वय २८) शेंशडा जिल्हा नागौर राजस्थान, प्रल्हाद ओम पुरी (वय ३०) रा. रामगढ नागौर पुंदलौता राजस्थान (हल्ली मुक्काम बिडबाय पास छत्रपती संभाजीनगर) असून हे दोघे ठेकेदार विनोद भागवत जांगिड यांच्याकडे कामांसाठी होते मागील चार दिवसांपासून फार्म हाऊसच्या फर्निचर कामासाठी येत होते. फॉर्म हाऊस मधील एका दरवाजाच्या कामासाठी हे दोघे आले होते मात्र लाईट नसल्याने दोघे मजूर शेततळ्यातच्या पाण्यामध्ये पोहण्यासाठी अंगावरील कपडे बाजूला काढून ठेवून पाण्यात पोहण्यासाठी उतरले मात्र कामासाठी आलेले दोघे मजूर बऱ्याच वेळेपासून कामावर दिसून न आल्याने सुरक्षारक्षकाने आजूबाजूला बघितले तर शेततळ्याच्या कडेला त्यांचे कपडे आढळून आले. सुरक्षा रक्षकाने शेतमालक नंदकिशोर पावणे यांना फोन करून याची माहिती दिली. पावणे यांनी फर्निचरचे ठेकेदार विनोद जांगीड यांना याबद्दल माहिती दिली. लगेच मयताचे नातेवाईक व ठेकेदार घटना स्थळी येऊन पाहणी केली. त्यांनी बिडकीन पोलीसांना माहिती दिली लगेच सहाय्यक निरिक्षक निलेश शेळके यांनी पोलीस फौजफाटा घेऊन म्हारोळा येथे पोहचले. बिडकीन पोलीसांनी अग्निशामक दलाला माहिती देउन पाचारण केले. दोन्हीं मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढून मृतदेह ग्रामीण रूग्णालयात हलविण्यात आले. आज दि ४ रोजी सकाळी वैद्यकीय अधिकारी डॉ आशिष वेदपाठक यांनी शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, यांच्या मार्गदर्शनाखाली योगेश नाडे, सहाय्यक फौजदार अशोक सोकटकर करीत आहे,

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४६/२०२५

अर्जदार : १– गंगुबाई हनुमंत हडपद, ह.मु. रांजणगाव शेणपुंजी, हनुमान नगर ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : १) कल्पना बाबुराव हडपद, २) हर्षदा पिता बाबुराव हडपद, ३) शिवांश पिता बाबुराव हडपद, रा.नवीन पोलीस वसाहत, बी ब्लॉक, ए विंग, रूम नं. ७०४, मिल कॉर्नर, औरंगाबाद ४) सरूबाई पिता हनुमंत हडपद, ५) सुनिता भ्र. नागेश मंगली, ६) उमाबाई भ्र.शिवराज हडपे, ४ ते ६ ह.मु. रांजणगाव शेणपुंजी, हनुमान नगर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ७) लक्ष्मी अविनाश गोईनोड, रा.सगरोळी, ता.बिलोली, जि. नांदेड

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराचा मुलगा नामे बाबुराव हनुमंत हडपद रा. रांजणगाव शेणपुंजी, हनुमान नगर ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांचा दि.२८/११/२०२४ रोजी औरंगाबाद येथील वेदांतनगर पोलीस ठाणे हददीमध्ये अपघात झाला. वैद्यकीय उपचारादरम्यान बाबुराव हनुमंत हडपद यांचा मृत्यु दि.०९/१२/२०२४ रोजी औरंगाबाद येथील घाटी हॉस्पीटल मध्ये झालेला आहे. अर्जदाराचे पती हनुमंत हडपद हे २०१४ साली शिर्डी, ता. राहता, जि.अहमदनगर येथे मृत्यु पावले आहेत. मयत बाबुराव हनुमंत हडपद यांना वर नमुद अर्जदार व गैरअर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नसुन अर्जदार यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अॅड.श्री.बी.पी.जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.२८/०२/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३९/२०२५.

पुढील तारीख ०८/०४/२०२५

अर्जदार : १. मच्छिंद्र पिता रंगनाथ जमधडे, वय ५० वर्षे, धंदा मजुरी, रा. रुम नं. ५०१, ५ वा मजला, शहिद जितेश चाळ, बार्वे मार्ग, पाईप रोड, कुर्ला वेस्ट, मुंबई ता.व जि. मुंबई २. सुमन भ्र. नामदेव बागुल, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. कलिना चर्च रोड, रुम नं. १३, हाऊस नं. १३, खंडागळे चाळ, शास्त्री नगर, सांताक्रुझ, मुंबई ता. व जि. मुंबई. ३. विलास पिता रंगनाथ जमधडे (मयत) ३.१. प्रमोद पिता विलास जमधडे, वय ३७ वर्षे, धंदा नौकरी, रा. फातिमाबाई चॉल, पाईप रोड, बुध्द कॉलनी, कुर्ला वेस्ट, मुंबई मुंबई ता. व जि. मुंबई. ३.२. रोहित पिता विलास जमधडे, वय ३५ वर्षे, धंदा नौकरी, रा. फातिमाबाई चॉल, पाईप रोड, बुध्द कॉलनी, कुर्ला वेस्ट, मुंबई ता. व जि. मुंबई.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. एम. एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, मयत रंगनाथ गंगाराम जमधडे हे मुळचे उपळा ता. कन्नड येथील रहिवाशी होते ते सन १९८४ मध्ये आणीबाणीच्या काळात गावात काही कामधंदा नसल्यामुळे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविण्यासाठी ते मुंबई येथे मोल मजुरी करण्यासाठी गेले होते व तेथेच दिनांक ११/१०/१९८८ रोजी मरण पावले आहे. तसेच त्यांची पत्नी रुख्मणीबाई भ्र. रंगनाथ जमधडे ह्या सुद्धा दिनांक ०५/०६/१९९० रोजी मुंबई येथे मरण पावल्या आहे. मयतांना विलास रंगनाथ जमधडे व अर्जदार क्र. १ असे दोन मुले असून व अर्जदार क्र. २ ही मुलगी असे ३ आपत्य होती व आहे. त्यापैकी विलास रंगनाथ जमधडे हा मुलगा दिनांक १२/०१/२००९ रोजी मुंबई येथे मरण पावला असून त्याची पत्नी अनिता भ्र. विलास जमधडे ही सुद्धा दिनांक २२/०४/२०१७ रोजी मरण पावली आहे. मयत विलास रंगनाथ जमधडे यास अर्जदार क्र. ३.१ व ३. २ व दोन मुले आहे. अर्जदार क्र. १ ते ३.२ हे मयत रंगनाथ गंगाराम जमधडे यांचे वारस असून इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्रं. १ ते ३.२ यांना मयत रंगनाथ गंगाराम जमधडे यांच्या पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार नं. १ ते ३.२ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत रंगनाथ गंगाराम जमधडे हे मौजे उपळा, ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते व तसेच मयताच्या नावाने जंगम मालमत्ता सुद्धा मौजे उपळा ता. कन्नड येथे आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ३.२ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.१५/०२/२०२४ रोजी मौजे उपळा ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज यापुर्वी इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०३/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायधीश क. स्तर. कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४२/२०२५

अर्जदार : १) शालुबाई भ्र.गोरखनाथ म्हस्के, २) रविंद्र पिता गोरख म्हस्के, दोन्ही रा.गवळीशिवरा, ता.गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे सासरे व अर्जदार नं. २ चे आजोबा नामे बाबु धोंडीबा म्हस्के हे दि. ०९/०५/२०२३ रोजी मौजे गवळीशिवरा, ता. गंगापुर येथे मृत्यु पावले आहेत. मयत बाबु धोंडीबा म्हस्के यांचे पत्नीचे नाव हौसाबाई बाबु म्हस्के असुन मयत बाबु धोंडीबा म्हस्के आणि हौसाबाई बाबु म्हस्के दोघेही मृत्यु पावले असुन हौसाबाई बाबु म्हस्के हि दि.०१/०६/२०१८ रोजी मौजे गवळीशिवरा, ता. गंगापुर येथे मृत्यु पावली आहे. मयत बाबु धोंडीबा म्हस्के आणि मयत हौसाबाई बाबु म्हस्के यांना दोन अपत्ये झालेली होती. त्यापैकी एकाचे नाव गोरख बाबु म्हस्के असुन दुस–या मुलाचे नाव मच्छिंद्र बाबु म्हस्के आहे. गोरख बाबु म्हस्के आणि मच्छिंद्र मच्छिंद्र बाबु म्हस्के दोघेही मृत्यु पावले आहेत. तसेच अर्जदार नं. १ चे पती नामे गोरख बाबु म्हस्के आणि अर्जदार नं. २ चे वडील नामे गोरख बाबु म्हस्के हे दि. १७/०८/२००२ रोजी मौजे गवळीशिवरा, ता. गंगापुर येथे मृत्यु पावले आहेत. तसेच अर्जदार नं. १ चा भाया व अर्जदार नं. २ चे काका नामे मच्छिंद्र बाबु म्हस्के हे दि. १७/०८/२००२ रोजी मौजे गवळीशिवरा, ता. गंगापुर येथे मृत्यु पावले आहेत. मच्छिंद्र बाबु म्हस्के हे मृत्युसमयी अविवाहित होते. मयत मच्छिंद्र बाबु म्हस्के हे अविवाहित असल्याने त्यांना अपत्य नव्हते. मयत बाबु धोंडीबा म्हस्के व हौसाबाई बाबु म्हस्के यांना अर्जदार नं. १ व २ यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नसुन अर्जदार नं. १ व २ यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अॅड.श्री.बी. पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ व २ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.२८/०२/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क्र. १००/२०२५

प्रकरणात पुढील तरीख दि. १५/०३/२०२५

अर्जदार : १) बंडु कचरू ढोले, वय ४९ वर्ष, धंदा मजुरी, रा. देंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) मिरा क्ष. येडु पवार, वय ५२ वर्ष, धंदा घरकाम रा. कनकोरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) संगीता भ्र. उत्तम ढोले, वय ४७ वर्ष, धंदा घरकाम, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) प्रभाकर उत्तम ढोले, वय २६ वर्ष, धंदा मजुरी, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५) संध्या भ्र. रामेश्वर गावंडे, वय २६ वर्ष, धंदा घरकाम, रा. मांगेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६) मुरलीधर धोंडीराम ढोले, वय ७७ वर्ष, धंदा मजुरी, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जिऔरंगाबाद ७) काशिबाई भ्र. मुरलीधर ढोले, वय ७२ वर्ष, धंदा घरकाम, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद ८) शंकर मुरलीधर ढोले, वय ३९ वर्ष, धंदा मजुरी, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद ९) चेतन शंकर ढोले, वय २० वर्ष, धंदा शिक्षण, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात अॅड. एस. एन. साबणे, गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाचे कायमस्वरूपी रहिवासी असुन अर्जदार क १ व २ हे आपसात नात्याने सख्खे भाउ व बहिन असुन मयत कचरू धोंडीराम ढोले यांची आपत्य आहे तसेच अर्जदार क ३ हि अर्जदार क १ व २ यांचा मयत भाउ नामे उत्तम कचरू ढोले यांची पत्नी असुन अर्जदार क ४ व ५ हे मुलगा व मुलगी आहे. तसेच मयत कचरू व अर्जदार क ६ हे आपसात नात्याने सख्खे भाउ असुन अर्जदार क ६ व ७ हे आपसात नात्याने पत्नी पत्नी असुन अर्जदार क ८ हा मुलगा असुन अर्जदार क ९ हा अर्जदार क ८ चा मुलगा आहे अर्जदार क १ व २ यांचे वडील अर्जदार क ३ चे सासरे व अर्जदार क ४ व ५ यांचे आजोबा आणि अर्जदार क ६ चे सख्खे भाउ व अर्जदार क ७ चे भाया व अर्जदार क ८ चा चुलता आणि अर्जदार क ९ चे चुलत आजोबा नाने कचरू धोंडीराम ढोले हे दि. ०८/०१/२०२२ रोजी मौजे टेंभापुरी ता. ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयत कचरू यांची पत्नी नामे गंगुबाई भ्र. कचरू ढोले हि पुर्वीच मयत झालेली आहे. तसेच मयत कचरू धोंडीराम ढोले व मयत गंगुबाई कचरू ढोले यांचा मुलगा नामे उत्तम कचरू ढोले हा दि. १८/०३/२०१९ रोजी मौजे टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. अर्जदारांचे मुळ पुरूष म्हणजेच मयत कचरू धोंडीराम ढोले व अर्जदार क ६ चे वडील नामे धोंडीराम भावराव ढोले व आई नामे अनुसयाबाई धोंडीराम डोले हे अनेक वर्षापुर्वी मयत झालेले आहे. वर नमुद मयतांना अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत कचरू धोंडीराम ढोले यांच्यानावे मौजे चंडीकापुर ता. गंगापुर येथील शेत गट क २८ मध्ये १ हे ७७ आर शेत जमीन होती सदर शेत जमीन हि एकत्र कुटुंबातील उत्पन्नातुन विकत घेतलेली असुन कुटुंबाच्या सोईसाठी मयत कचरू धोंडीराम ढोले यांच्यानावे होती. वर नमुद शेत जमीन गट गट क २८ मधील १ हे ७७ आर शेत जमीन हि टेंभापुरी मध्यम प्रकल्पासाठी संपादित झालेली असुन अर्जदार क ९ यास सदरील संपादित शेत जमीनीचे प्रकल्प ग्रस्त प्रमाणपत्राची नौकरीकामी आवश्यक्ता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही त्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि.०३/०३/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरुन

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

# बिडकीन येथे वीस वर्षीय तरुणाचा गळफास घेऊन आत्महत्या



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ४ मार्च पैठण तालुक्यातील बिडकीन येथे वीस वर्षे तरुणांचा गळफास घेऊन आज दि.३ मार्च सोमवार रोजी चार वाजे दरम्यान आत्महत्या केली याबाबत सविस्तर माहिती अशी की बिडकीन येथील साठे नगर मधील श्याम सुभाष अवचिंदे (वय २०) वर्ष रा साठे नगर बिडकीन या तरुणाने दोरीच्या साह्याने गळफास घेतल्याचे दिसून आले नातेवाईकांच्या मदतीने शाम अवचींदे यास पुढील कारवाईसाठी ग्रामीण रुणालय बिडकीन येथे दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून मृत घोषित केले श्यामने आत्महत्या का केली याबाबत अद्याप पुष्टी झाली नसून सहाय्यक निरीक्षक निलेश शेळके पुढील तपास करीत आहे.

## जाहीर प्रगटण

Date: ०४/०३/२०२५

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मौजे धामोरी बु, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेत गट नं. ११० मधील अब्दुल रहेमान मदार ताडे यांचे मालकीची व ताब्यातील मधील क्षेत्र ०१ हे. ०८ आर ज्यांच्या चर्तुसिमा :–पुर्वेसः–शेंदुरवादा ते धामोरी बु रस्ता, पश्चिमेस तुपे यांची जमीन, दक्षिणेसः– धनावड यांची जमीन, उत्तरेस जाकीर ताडे यांची जमीन, ही मिळकत असुन (या चतुः सिमेच्या आतील मिळकत त्यातील खाली काही एक राखुन न ठेवता) येणे प्रमाणे सदर मिळकती वरील चर्तुसिमाच्या आतील विक्री करण्याचा ठराव झालेला असुन सदरील मिळकत ही अब्दुल रहेमान मदार ताडे यांची स्वंतत्र असुन सदरील मिळकत निर्वीवाद अथवा निर्जाखमी असल्याचे आश्वासन दिले आहे.

सदरील मिळकती बाबत पोटगी, कर्ज बोजा, गहाण, तारण, दान, वाटणी हिस्सा, ईसारपावती, करारनामा इत्यादी प्रकारे कोणत्याही व्यक्तीचा हितसंबध, हक्क, आक्षेप, उजर असल्यास तसा आक्षेप माझ्या कार्यालयात लेखी कागदपत्रासहीत ०७ दिवसाच्या आत नोंदवावा. मुददीत नंतर आलेले आक्षेप अथवा उजर ग्राहय धरले जाणार नाही मुददीत कोणत्याही प्रकारे आक्षेप अथवा उजर प्राप्त न झाल्यास सदरील मिळकत ही निर्वावाद व दोषमुक्त समजुन खरेदीखत नोंदविल्या जाईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक ०४/०३/२०२५.

ठिकाण गंगापुर

**मार्फत**

**ए.एस. करडे ॲडव्होकेट ॲन्ड नोटरी गंगापुर पो.ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर मो.नं. ९४२१४०८२४१.**

**शेतजमिनीबाबत कुठल्याही प्रकारचा खरेदीचा व्यवहार न करणे बाबत**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार श्री. समाधान कडूबा खैरे, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. पळसखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मौजे पळसखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेतजमीन गट नंबर १९६ मधील ०० हेक्टर ८० आर शेतजमीन दिनांक १७/०४/२०२३ रोजी पूर्वीचे मालक श्री. साहेबराव सुपडू पांढरे यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदीखताने लहान मुलगा संदीप समाधान खैरे यांच्या नावाने विकत घेतलेली आहे. सदरील व्यवहाराची संपूर्ण रक्कम माझे पक्षकार यांनीच दिलेली आहे. नमुद शेतजमिन घेतल्यापासून माझे पक्षकार हेच सदरील शेतजमीन कास्त करीत आहे. परंतु घरगुती वादामुळे मुलगा संदीप समाधान खैरे हा घर सोडून निघून गेला आहे.

तरी सदर जाहीर प्रगटनाद्वारे समस्त जनतेस कळविण्यात येते की, मौजे पळसखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट क्रं. १९६ मधील ०० हेक्टर ८० आर शेतजमिनीबाबत कुठल्याही प्रकारचा खरेदी–विक्री, सौदा, किंवा कुठल्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करू नये, अन्यथा सदरचा व्यवहार हा कायद्याने रद्द समजण्यात येईल.

करिता सदरचे जाहीर प्रगटन दिले असे.

दिनांक:– ०१/०३/२०२५.

मार्फत, — जाहीर प्रगटन देणार.

अॅड. स्वप्निल र. सुरळकर — समाधान खैरे

सोयगाव जि. औरंगाबाद (छ. संभाजीराजीनगर.)

## जाहीर प्रगटन

**मा.व्ही.एन. काटकर दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दि. किरकोळ. अर्ज. कं. १०८/२०२५.

पुढील तारीख २९/०३/२०२५.

अर्जदार : १. अर्चना भ्र. पवनसिंग चौहान, वय ४६ वर्षे, धंदा शेती / घरकाम, रा. बोपेवाडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह.मु. ए विंग, फ्लॅट नं. १६, मुरारजी पेठ, काटकर मंगल कार्यालय, सोलापुर नॉर्थ, ता. व जि. सोलापुर २. राजबिरसिंग पिता पवनसिंग चौहान, वय २० वर्षे, धंदा शिक्षण, रा. बोपेवाडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह.मु. ए विंग, फ्लॅट नं. १६, मुरारजी पेठ, काटकर मंगल कार्यालय, सोलापुर नॉर्थ, ता. व जि. सोलापुर ३. अदिती पिता पवनसिंग चौहान, वय १६ वर्षे, धंदा घरकाम, अ.पा.क जन्मदाती आई अर्जदार क्र. १.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत पवनसिंग दत्तूसिंग चौहान यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. ३ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत पवनसिंग दत्तूसिंग चौहान यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे यांचे वडील नामे पवनसिंग दत्तूसिंग चौहान हे मुळचे बोपेवाडी ता. कन्नड येथील रहिवाशी होते ते महानगर पालिका सोलापुर येथे कार्यरत होते ते आजारी असतांना दि.१५/०४/२०२१ रोजी एकविरा हॉस्पिटल, औरंगाबाद येथे उपचार दरम्यान मरण पावले आहे. मा. न्यायालयाच्या अवलोकनार्थ मयत पवनसिंग दत्तूसिंग चौहान यांचे महानगर पलिका औरंगाबाद यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे. तसेच मयताचे वडील दत्तूसिंग जयसिंग चौहान हे दिनांक २०/१०/२०२३ व आई जयमाला भ्र. दत्तूसिंग चौहान ही दिनांक १७/०७/२०१९ रोजी मरण पावली आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत पवनसिंग दत्तूसिंग चौहान यांचे मृत्यू नंतर भोपेवाडी ता. कन्नड येथे राहण्यास आले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांना मयत पवनसिंग दत्तूसिंग चौहान यांच्या पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत पवनसिंग दत्तूसिंग चौहान हे मौजे बोपेवाडी, ता. कन्नड येथे राहत असतांना मयत झाले आहे व तसेच मयताच्या नावाने जंगम मालमत्ता सुद्धा बोपेवाडी येथे आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ३ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.१६/१२/२०२४ रोजी मौजे बोपेवाडी ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज यापुर्वी इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक :–०३/३/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## शैक्षणिक संस्थांमध्ये गुंतवणूक करण्याचा आग्रह केला

छत्रपती संभाजीनगर : शिक्षण क्षेत्रातील कारकिर्दीला ७५ वर्षे पूर्ण केल्याचे औचित्य साधून हिंदुजा समूहाने आपली प्रमुख संस्था हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्समार्फत भारताच्या भविष्याला आकार देण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्सची सुरुवात शरणार्थींच्या मुलांसाठी सुरु करण्यात आलेले एक सामान्य प्राथमिक विद्यालय म्हणून झाली होती. आज ६००० पेक्षा जास्त विद्यार्थी याठिकाणी शिक्षण घेत आहेत आणि हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्स आता एक डीम्ड युनिव्हर्सिटी बनण्याच्या दिशेने पुढे जात आहे. आज हा समूह हिंदुजा फाउंडेशनच्या माध्यमातून 'रोड टू स्कूल' आणि 'रोड टू लाईवलीहूड' या उपक्रमांमध्ये भारतभर ७,००,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिक्षण प्रदान करत आहे. २०३० सालापर्यंत १ मिलियन विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्याच्या योजनेसह हिंदुजा फाउंडेशन शिक्षणामध्ये परिवर्तनाचा मुख्य स्रोत बनून सातत्याने प्रोत्साहन देत आहे आणि २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या भारताच्या दृष्टिकोनामध्ये प्रमुख योगदान देत आहे.

## ऐतिहासिक हिमायत बाग येथे स्वच्छता मोहीम

छत्रपती संभाजीनगर : पर्यावरणाबाबत जागरुकता आणि सामाजिक जबाबदारीला प्रोत्साहन देण्यासाठी ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूल, टीसीएच आडगाव कॅम्पसतर्फे संभाजी नगर प्लॉगर्सच्या सहकार्याने आज ऐतिहासिक हिमायत बागेत मोठ्या प्रमाणात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमात १०० ऑर्किडियन्सनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला होता. स्वच्छता राखण्याच्या आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उदात्त कार्यात सर्वजण सक्रियपणे सहभागी झाले होते. तरुणांचे भविष्य घडवण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व टीसीएच आडगाव कॅम्पस ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या ईरा शर्मा यांनी याप्रसंगी अधोरेखित केले. त्या पुढे म्हणाल्या की, शिक्षण म्हणजे केवळ शैक्षणिक ज्ञान प्राप्त करणे नव्हे तर; ते आपल्या सभोवतालच्या परिस्थितीप्रती जबाबदारीची भावना विकसित करण्याबद्दलही असते. आमचे विद्यार्थी उद्याचे बदल घडवणारे आहेत आणि अशा उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होऊन ते चांगल्या, स्वच्छ आणि हरित भविष्य घडवण्यासाठी योगदान देत आहेत.

## महाकुंभमेळ्यात तीन गिनीज वर्ल्ड रेकॉर्डची नोंद

मुंबई : उत्तर प्रदेश सरकारच्या प्रयागराज मेळा प्राधिकरणाने भव्य महाकुंभ मेळ्यादरम्यान स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि सांस्कृतिक वारसा यामध्ये उल्लेखनीय कामगिरी करून तीन गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड तयार केले आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रमाणपत्र सुपूर्द करण्यात आले. या प्रसंगी प्रयागराज मेळा प्राधिकरणाचे मेळा अधिकारी श्री. विजय किरण आनंद आणि विश्वविक्रम रणनीतीकार निश्चल बारोट हे देखील उपस्थित होते. या विक्रमी प्रयत्नांच्या नियोजनात आणि अंमलबजावणीत निश्चल बारोट यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत १९,२८७ सहभागींनी योगदान देऊन, अनेक ठिकाणी सर्वाधिक लोकांनी फरशी साफ केल्याचा पहिला गिनीज रेकॉर्ड आहे. या उपक्रमामुळे सार्वजनिक स्वच्छता राखण्याची आणि स्वच्छतेला प्रोत्साहन देण्याची वचनबद्धता बळकट झाली. दुसरा विक्रम म्हणजे अनेक ठिकाणी सर्वाधिक संख्येने सहभागी झालेल्या नदी स्वच्छता मोहिमेचा, ज्यामध्ये ३२९ स्वयंसेवकांनी प्रयागराजच्या पवित्र नद्यांची स्वच्छता करण्यात आणि नमामि गंगे मिशनला पाठिंबा देण्यात भाग घेतला. या उपक्रमाने जलसंवर्धन आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले.

## हायर सादर करत आहेत रंगीत किनौची एसी श्रेणी

छत्रपती संभाजीनगर : हायर अप्लायन्सेस इंडिया या जागतिक पातळीवर सलग १६ वर्षे अव्वल क्रमांकावर असणाऱ्या मेजर अप्लायन्सेस ब्रँडने किनौची एअर कंडिशनर या खास रंगीत एसीच्या सादरीकरणातून होम कुलिंग विभागात नवे मापदंड स्थापित केले आहेत. आधुनिक घरांना नवे रूप देणाऱ्या या प्रीमिअम सीरिजमध्ये काळाच्या पुढे असणाऱ्या सौंदर्याला उत्कृष्ट परफॉर्मन्सची जोड देण्यात आली आहे.किनौची लिमिटेड एडिशन एअर कंडिशनर्समध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाला प्रीमिअम रंगांच्या फिनिशची जोड देत घराच्या सौंदर्याला फक्त गारव्यापुरते मर्यादित न ठेवता एक नवी भर देण्यात आली. भारतीय ग्राहक आता डिझाइनच्या बाबतीत अधिक सजग होत आहे. त्यांच्या जीवनशैलीला आणि वैयक्तिक आवडीनिवडींना साजेशी अशी उपकरणे त्यांना हवी असतात. हाच विचार केंद्रस्थानी ठेवत हायर इंडियाने ही खास श्रेणी सादर केली आहे. कार्यक्षमता आणि स्टाईलचा उत्तम मेळ असणारे हे एअर कंडिशनर घराच्या सौंदर्यात भर घालत अतुलनीय कामगिरी करतील, याची खातरजमाच यातून झाली आहे.

## यूवा तर्फे क्लिप आणि ल्यूमिनो नव्या प्रीमियम पेन्सिली सादर

छत्रपती संभाजीनगर : नवनीत एज्युकेशनच्या यूवा या स्टेशनरी ब्रँडतर्फे यूवा क्लिप आणि यूवा ल्यूमिनो या नव्याकोऱ्या पेन्सिली सादर करण्यात आल्या आहेत. विद्यार्थी, प्रोफेशनल्स आणि कलाकारांसाठी खास तयार करण्यात आलेल्या पेन्सिलींमध्ये उत्तम ग्रिप, स्मूथ लिखाण आणि डार्क फिनिश ही वैशिष्ट्ये आहेत. त्यांची किंमत प्रत्येकी ६ इतकी आहे. क्लिप आणि ल्यूमिनो पेन्सिलींना मेटॅलिक फिनिश पॅकेजिंग देण्यात आले आहे. त्यामुळे या पेन्सिलींना अभिजातता, टिकाऊपणा आणि भक्कमपणा मिळतो. स्मूथ लिखाणासाठी खास डिझाइन करण्यात आलेल्या या पेन्सिली अल्ट्रा-डार्क २बी लीडने तयार करण्यात आल्या आहेत, जेणेकरून सुबक व सुस्पष्ट लिखाण करता येईल. या दोन्ही पेन्सिली त्यांचा उच्च दर्जा व विचारपूर्वक करण्यात आलेल्या डिझाइनसाठी ओळखल्या जातात.

## निश्चित उत्पन्न देणारा नवीन प्लॅन

मुंबई,३ मार्च : आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्स ने आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा नवा दीर्घकालीन बचत प्लॅन सादर केला आहे, जो ग्राहकांना निश्चित उत्पन्नाची खात्री देतो आणि त्यांना गरजेच्या वेळी पैसे काढण्याची सुविधा देतो.या प्लॅनमध्ये ग्राहकांना अनेक लवचिक पर्याय उपलब्ध आहेत. निश्चित उत्पन्न कधी सुरू करायचे, निश्चित उत्पन्नाचा कालावधी, परिपक्वतेच्या म्हणजेच प्लॅनच्या मॅच्युरिटीवेळी ठराविक रक्कम मिळविण्याचे स्वातंत्र्य या प्लॅनमध्ये आहे. याशिवाय, यामध्ये जीवन विमा देखील आहे, जो कुटुंबासाठी आर्थिक सुरक्षा प्रदान करतो.

## बजाज ऑटोने लाँच केली बजाज गोगो इलेक्ट्रिक ऑटोजमधील सर्वाधिक रेंज असलेली सर्वात मोठी ई-ऑटो

पुणे, ०४ मार्च २०२५: जगातील सर्वात व्हॅल्यूएबल २-व्हीलर आणि ३-व्हीलर कंपनी असलेल्या बजाज ऑटो लिमिटेडतर्फे 'बजाज गोगो' हा नवाकोरा इलेक्ट्रिक ऑटो ब्रँड सादर करण्यात आला आहे.

बजाज गोगो झ५००९, झ५०१२ आणि झ७०१२ या तीन व्हेरियंट्समध्ये उपलब्ध आहे. या व्हेरियंट्सच्या नावांमध्ये 'झ' म्हणजे पॅसेंजर, '५०' आणि '७०' हे साइझ निदर्शक असून, '०९' आणि '१२' अनुक्रमे ९ ज्ञथह आणि १२ ज्ञथह क्षमतेची बॅटरी दर्शवतात.

बजाज ऑटोने गेल्या २० हून अधिक वर्षांपासून विश्वासार्ह, ग्राहकांस्नेही उत्पादने आणि भक्कम नेटवर्कच्या बळावर ३-व्हीलर उद्योगातील पर्यावरणपूरक इंधन क्रांतीचे नेतृत्व केले आहे. 'बजाज गोगो'च्या लॉन्चच्या निमित्ताने इलेक्ट्रिक ३-व्हीलर क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत करण्याचे कंपनी उद्दिष्ट आहे.

शाश्वत वाहतुकीचा वेग वाढविणे:

भारतातील इलेक्ट्रिक ३-व्हीलर क्षेत्राची मागील तीन वर्षांत ३०% सीएजीआर या दराने वाढ झाली आहे. इलेक्ट्रिक ३-व्हीलर्सचा हा वेगवान वाढीचा प्रवास पुढेही सुरू राहण्याची अपेक्षा असून, याला भारत सरकारच्या विविध उपक्रमांबरोबरच इलेक्ट्रिक वाहनांच्या किफायतशीर ऑपरेटिंग कॉस्टचा मोठा आधार मिळत आहे.

बजाज ऑटोने आपल्या विद्यमान ई-ऑटो श्रेणीच्या माध्यमातून लॉन्चच्या पहिल्याच वर्षात इलेक्ट्रिक ३-व्हीलर क्षेत्रातील आघाडीच्या दोन कंपन्यांमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. यातून ग्राहकांचा बजाज ऑटोवरील विश्वास, कंपनीची विश्वासार्हता आणि व्यापक नेटवर्क दिसून येते.

## शेतकरी कुटुंबास मारहाण करून केले गंभीर जखमी

# गंगापूर मधील वरखेड शिवारात दरोडा

### रोख रक्कम, सोन्याचे दागिने असा सव्वा लाखाचा ऐवज घेऊन पोबारा

तभा वृत्तसेवा

गंगापुर दि.३: तालुक्यातील शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीतील वरखेड शिवारामध्ये ही घटना घडली असून चोरट्यांनी औटे वस्तीवर सोमवारी (३) पहाटेच्या सुमारास दरोडा टाकला. यात दरोडेखोरांनी शेतकरी कुटुंबास मारहाण करून गंभीर जखमी केले. या दरोड्यात भामट्यांनी रोख रक्कम, सोन्याचे दागिने असा सव्वा लाखाचा ऐवज घेऊन पोबारा केला.

वरखेड शिवारात गट क्रमांक २१३ मध्ये अशोक भानुदास औटे (वय ५५) हे कुटुंबासह वास्तव्यास असून सोमवारी (३) पहाटे ३:३० वाजता चार दरोडेखोरांनी त्यांच्या वस्तीवरील घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला व अशोक औटे त्यांचा मुलगा, गणेश अशोक औटे (४०) सून सोनाली गणेश औटे (३५) नातू रुद्रा गणेश औटे (१४) यांना जबर मारहाण करून जखमी केले तसेच शस्त्राचा धाक दाखवून घरातील सोने, चांदी व रोख रक्कम असा सव्वा लाखाचा ऐवज घेऊन पोबारा केला.

बाप-लेक अतिशय गंभीर जखमी.



यावेळी चोरट्यांनी दरोड्यानंतर औटे कुटुंबाचे मोबाईल हिसकावून शेतात लांब फेकून

भाजप आमदार प्रशांत बंब यांनी दि.२८ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजी नगर पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या पत्रात गंगापूर खुलताबाद पोलिसांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करून बेकायदेशीर धंदे बंद करून व तसेच चोरीच्या घटना वाढल्या असल्यामुळे कारवाईचे मागणी केली आहे.

दिले तसेच त्यांच्या शेतवस्तीवर लावलेल्या सुमारे अर्धा एकर टरबूजाची देखील नासाडी केली. अशोक औटे यांनी सकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास बाजूच्या शेतवस्तीवर जाऊन फोनद्वारे नातेवाईकांना घटनेबद्दल माहिती दिली. दरोडेखोरांनी केलेल्या मारहाणीत औटे कुटुंबातील अशोक व गणेश हे बाप-लेक गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात येऊन त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. शिल्लेगाव पोलिस ठाण्याचे पोनि सलीम चाऊस यांनी सोमवारी सकाळी घटनास्थळी पाहणी केली असून पुढील तपास ल्या गाव पोलीस ठाणे करीत आहे.

## नाथसागर परिसरात आठवड्याभरात तीन मृतदेह सापडल्याने खळबळ

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०४ :- पैठण शासकीय दवाखान्या समोरील गोदावरी पात्रात २७ फेब्रुवारी गुरुवार रोजी शेवगाव येथील एका पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता त्यानंतर नाथसागर धरणामध्ये पंप हाऊस च्या परिसरात तीन दिवसांपूर्वी एका अनोळखी महिलेचे प्रेत दगडाने बांधून धरणाच्या पाण्यात आढळून आल्यानंतर आज पुन्हा सोमवार रोजी सकाळी पैठण पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या नाथ सागर धरण साखळी क्रमांक ४२ परिसरात एका अडीच वर्षीय मुलाचे बांधलेले प्रेत आढळले असून सदरील घटनेची खबर मिळताच पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख, पोलीस उपनिरीक्षक दशरथ बुरुकुल पोलीस पथकासह घटनास्थळ दाखल झाले आहे.

अधिक माहिती अशी की नाथसागर धरण साखळी क्रमांक ४२ परिसरात एका अनोळखी अडीच वर्षाच्या मुलाची कापडात बांधलेले प्रेत पाण्यावर तरंगत असल्याची माहिती धरण नियंत्रण विभागाचे प्रमुख गणेश खरडकर यांनी पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांना दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संजय देशमुख व पथकासह घटनास्थळ दाखल झाले असून पाच दिवसांपूर्वी पैठण शासकीय दवाखाण्यासमोरील गोदावरी पात्रात शेवगाव येथील व्यक्तीचा मृतदेह आढळून येऊन त्याची ओळख पटली होती. त्यानंतर तीन दिवसांपूर्वी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या छत्रपती संभाजीनगर पैठण, जालना पंप हाऊस लगत एका अनोळखी महिलेला बेडशीट मध्ये बांधून कमरेला दगड असल्याच्या अवस्थेत आढळून आले होते. या महिलेचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने या ठिकाणी आणून टाकले होते असा अंदाज एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि ईश्वर जगदाळे यांनी व्यक्त करून तपास सुरू केलेला असतानाच सोमवार रोजी कापडात बांधलेले व अंगावर निळा रंगाचे टी-शर्ट असलेले अनोळखी अडीच वर्षाच्या मुलाचे प्रेत सापडल्यामुळे या महिलेचे या मुलाच्या प्रेताशी काही संबंध आहे का...? या संदर्भात उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरीक्षक संजय देशमुख, सपोनि ईश्वर जगदाळे, पोलीस उपनिरीक्षक दशरथ बुरुकुल, संभाजी झिंजुर्डे यांनी वेगवेगळ्या पद्धतीने तपास सुरू केला. एका पाठोपाठ दोन जणांचे संशयास्पद प्रेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

## सामूहिक विवाहाच्या मंगल क्षणांनी उजळणार गरजूंचे जीवन

छत्रपती संभाजीनगर: येथे आर्थिक अडचणींमुळे विवाहासारख्या महत्त्वाच्या सोहळ्यापासून आर्थिक अडचणींमुळे वंचित राहणाऱ्या कुटुंबांसाठी 'जायंट्स पायोनियर्स सामूहिक विवाह सोहळा - २०२५' आशेचा किरण बनून आला आहे. जायंट्स ग्रुप ऑफ पायोनियर्स यांच्या पुढाकाराने, त्याचप्रमाणे अग्रवाल समाज आणि वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या सहकार्याने १८ एप्रिल २०२५ रोजी हा विवाह सोहळा आयोजित केला जाणार पत्रकारांशी बोलताना शीतल अग्रवाल यांनी सांगितले या वेळी पल्लवी मालानी, आरती सोनी, प्रवीण सोमानी, विनोद अग्रवाल, महेश अग्रवाल आदी उपस्थित होते.



आर्थिक अडचणींमुळे विवाहासारख्या स्वप्नांपासून दूर राहणाऱ्या जोडप्यांसाठी हा सोहळा केवळ एक विवाह नसेल, तर त्यांच्या नव्या आयुष्याची प्रेरणादायी सुरुवात असेल.

समाजातील अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींमुळे आपल्या मुला-मुलींच्या विवाहाचा खर्च करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत, 'जायंट्स पायोनियर्स सामूहिक विवाह सोहळा' त्यांच्यासाठी एक वरदान ठरला आहे. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक जोडप्याला केवळ विवाह सोहळ्याचा आनंदच मिळणार नाही, तर त्यांच्या नव्या संसारासाठी ५१,००० रुपये किमतीचे गृहउपयोगी साहित्य भेट म्हणून दिले जाणार आहे. हा सोहळा म्हणजे केवळ दोन जीवांचं मिलन नाही, तर दोन कुटुंबांचं आणि समाजाचे एकत्रीकरण आहे.

या सोहळ्यासाठी ज्यांचे लग्न जुळले आहे असे जोडपे ज्यामधे मुली चे वय किमान १८ वर्ष आणि मुलाचे २१ वर्ष असेल अशा लग्न जुळलेल्या जोडप्यांची नोंदणी ५ एप्रिल २०२५ पर्यंत सुरू आहे. इच्छुकांनी त्वरित नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. नोंदणीसाठी नितिन मालाणी (९९७०४२४६८६) आणि विनोद अग्रवाल (९७६३२१८७९१) यांच्याशी संपर्क साधता येईल.

या सामूहिक विवाह सोहळ्याद्वारे केवळ विवाहच होणार नाही, तर सामाजिक बांधिलकीचे एक सुंदर उदाहरण समाजासमोर ठेवले जाणार आहे. समाजातील गरजू कुटुंबांना आधार देऊन त्यांना सन्मानाने जगण्याची संधी मिळवून देणे, हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे. या मंगलकार्यात सहभागी होऊन गरजू कुटुंबांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. जायंट्स ग्रुप ऑफ पायोनियर्स हा ३५ तरुण जोडप्यांचा उत्साही गट आहे. ही एक सामाजिक संस्था आहे जी जायंट्स वेलफेअर फाउंडेशनशी जोडलेली आहे. जायंट्सच्या देशभरात आणि परदेशात सुमारे ५०० शाखा असून २५ ते ३० हजार सदस्य आहेत. जायंट्स वेलफेअर फाउंडेशनची स्थापना श्री. स्वर्गीय नाना चुडासमा यांनी केली. सध्या शायना एनसी जायंट्स वेलफेअर फाउंडेशनच्या जागतिक अध्यक्षा आहेत.

## बदलत्या प्रणाली, निरोगी जीवनः भारतातील स्थूलपणामुळे होणाऱ्या वंध्यत्वावर मात करणे : डॉ. स्वरूप बोराडे

छत्रपती संभाजीनगर - डॉ. स्वरूप बोराडे , मेडिकोव्हर हॉस्पिटल्स यांच्या मते , स्थूलपणा हा केवळ जास्त वजनाचा नाही; तो शरीराच्या हार्मोनल संतुलनात व्यत्यय आणतो, ज्यामुळे महिलांमध्ये पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम (पीसीओएस) सारख्या परिस्थिती उद्भवतात आणि पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉनची पातळी कमी होते. अभ्यास दर्शविते की लठ्ठ महिलांना ओव्हुलेशनच्या समस्यांना तोंड देण्याची शक्यता तिप्पट असते, तर लठ्ठ पुरुषांना शुक्राणूंची गुणवत्ता कमी होण्याचा धोका ५०% जास्त असतो. हैदराबाद, बेंगळुरू, मुंबई आणि पुणे सारख्या शहरी केंद्रांमध्ये हा भार विशेषतः जास्त आहे, जिथे जीवनशैलीतील बदल, फास्ट फूड संस्कृती आणि जास्त कामाचे तास यामुळे लठ्ठपणाचे प्रमाण वाढले आहे.



मेडिकोव्हर हॉस्पिटल्समध्ये, वजनाशी संबंधित वंध्यत्वाशी झुंजणाऱ्या तरुण जोडप्यांची संख्या वाढत असल्याचे आपण पाहत आहोत. यावर उपाय म्हणजे केवळ आयव्हीएफ किंवा प्रजनन उपचार नाही तर एक पद्धतशीर बदल - वजन व्यवस्थापनाला पुनरुत्पादक आरोग्यसेवेत एकत्रित करणे. आमचा बहु-विद्याशाखीय दृष्टिकोन स्त्रीरोगतज्ज्ञ, एंडोक्राइनोलॉजिस्ट आणि बॅरिएट्रिक तज्ञांना एकत्रित करून वैद्यकीय वजन कमी करण्याचे कार्यक्रम, चयापचय तपासणी आणि जीवनशैली हस्तक्षेप नैसर्गिक प्रजनन क्षमता पुनर्संचयित करण्यासाठी ऑफर करतो.

जागतिक स्थूलता दिनानिमित्त, संदेश स्पष्ट आहे - स्थूलतेवर उपचार करणे केवळ दिसण्याबद्दल नाही; ते जीवन बदलण्याबद्दल आहे. मूळ कारणाकडे लक्ष देऊन, आपण अधिक जोडप्यांना नैसर्गिकरित्या पालकत्व मिळविण्यास मदत करू शकतो, हे सिद्ध करून की बदलत्या प्रणाली खरोखरच निरोगी जीवनाकडे नेतात.

## आ.अब्दुल सत्तार यांचा लाडू तुला करून केला भव्य सत्कार

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ मार्च

आमदार अब्दुल सत्तार यांनी फर्दापूर गावाच्या विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला.तसेच त्यांची विधानसभेत सलग चौथ्यांदा निवड झाल्याबद्दल फर्दापूर गावकऱ्यांच्या वतीने आ.अब्दुल सत्तार यांचा लाडू तुला करून भव्य सत्कार करण्यात आला.


फर्दापूर येथील चौक परिसरात हा सत्कार सोहळा पार पडला.विविध विकास कामांच्या भूमिपूजन कार्यक्रम निमित्त आ.अब्दुल सत्तार फर्दापूर येथे



आले होते.याप्रसंगी आ.अब्दुल सत्तार यांनी उपस्थितांशी संवाद साधला.तसेच केलेल्या सत्काराला उत्तर देतांना आ.अब्दुल सत्तार यांनी गावकऱ्यांचे आभार मानले.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे,कृउबा समितीचे सभापती केशवराव पा.तायडे,उपसभापती दारासिंग चव्हाण,संचालक नंदकिशोर सहारे,सिल्लोडचे माजी उपनगराध्यक्ष विनोद मंडलेचा,शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण,शहरप्रमुख संतोष बोडखे,गटनेता अक्षय काळे, युवासेनेचे कुणाल राजपूत यांच्यासह माजी सभापती उस्मान पठाण,फिरोज पठाण,भीमा बोराडे,विलास वराडे, शेख जाकेर, रविंद्र बावस्कर,बंडू काळे,इस्माईल पठाण, दिपक आगळे,अनिल बोंढरे,उस्मान पठाण, शे.मुख्तार, विजय तायडे,गुलाब बर्डे,हिरा चव्हाण,मकसूद कादरी,शे.मुस्तफ़ा, हामिद खा पठान आदिंसह गावकरी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (५७) सावधान

हिंदुस्तान हा त्यात राहणाऱ्या हिंदू मुसलमान ख्रिश्चन आदि सर्वांचा आहे; ही इंग्रजांनी व स्वातंत्र्यानंतरच्या सरकारने गळी उतरवलेली विकृत व राष्ट्रघातकी कल्पना जन-हृदयात इतकी दृढमूल झाली होती व आजही आहे की त्यांना हिंदूंचा हिंदुस्तान ही कल्पना वेडगळ वाटते तेव्हा हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना मांडणाऱ्या डॉक्टर हेडगेवार यांना हिटलर म्हणून हिणवत असत तेव्हा श्री. बाबासाहेब खापर्डे म्हणाले होते की डॉ. हेडगेवार जर हिटलर आहेत; तर खिलाफत वाले ही हिटलर आहेत; कारण खिलाफत वाल्यांचीही स्वयंसेवी पथके आहेत. मग यावर खूप आरडाओरडा झाला. तेव्हाही झाला व आताही अशाच तथाकथित गुलामी वृत्तीने आरडाओरडा होतो. म्हणजे गुलामी रक्तात किती भिनली आहे; हे आपल्याला कळते. डॉक्टरांनी सांगितलेल्या कितीतरी गोष्टी आज तंतोतंत खऱ्या ठरत आहेत. स्वातंत्र्यानंतर संघशाखेत जाणाऱ्याला सरकारी नोकरी मिळत नसे. 'नवरा मरो नाही तर नवरी मरो' आपल्याला पिंडाएवढा घास देणाऱ्या सरकारची गुलामी स्वीकारणे; नोकरदारांनी स्वीकारले होते. 'जे पेरावे तेच उगवते' हे त्रिकालाबाधित सत्य इंग्रजांनी ओळखले होते. त्यामुळेच इंग्रजांनी विकृत राष्ट्रीयत्वाचे बियाणे पेरले. ते आज असंख्य विकृत शाखांनी भारलेले आहे. आता ते मोडीत काढण्यासाठी खऱ्या देशभक्त भारतीय नागरिकांनीच गुलामी मनोवृत्तीतून जागे होऊन राष्ट्र सर्वप्रथम म्हणजे सर्वप्रथम

मी भारतीय या न्याय्य हक्कासाठी लढले पाहिजे. व हक्क डावलणाऱ्याला शिक्षा झाली पाहिजे . तेव्हा ह्या स्वधर्माचा स्वीकार करा व गुलामीला तिलांजली द्या. तेव्हा वेळेत सावध व्हा.

सावधान सावधान दक्ष तू सदा रहा

क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात विविध कार्यक्रम घेऊन केला संविधानाचा जागर



सोयगाव,दि.४ मार्च - अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थी,शिक्षक यांच्या सोबत शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील सर्वसामान्य नागरिक यांना भारतीय राज्यघटनेची नव्याने चांगल्या पद्धतीने ओळख व्हावी यासाठी निबंध,पोस्टर व व्याख्यान कार्यक्रम घेऊन जनजागृती करण्यात आली. तसेच संविधानामध्ये नमूद कर्तव्य व अधिकार याबाबत नागरिकांनी आपली जबाबदारी ओळखावी या उद्देशाने आमच्या महाविद्यालयात फेब्रुवारी - २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव घेण्यात आला. या महोत्सवासाठी प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.पंडित नलावडे,प्रा.श्रीकृष्ण परिहार,प्रा. किशोर नाले,दिपक पगारे आदींनी परिश्रम घेतले.

## राज्य क्रीडा महोत्सवात सोयगावच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या संघाने सुवर्ण पदक पटकावले



सोयगाव,दि.४ मार्च : गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली येथे झालेल्या २६ व्या महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बुद्धिबळ महिला संघाने प्रथम क्रमांक पटकावला. बुद्धिबळ संघ (प्रथम) या खेळाच्या महिला गटाने घवघवीत व ऐतिहासिक यश संपादन करीत स्पर्धेत अव्वलस्थान पटकावले. संघात संस्कृती वानखेडे,भाग्यश्री पाटील,तनिष्का बोरामणीकर,सानिया तडवी व संघमित्रा बोदडे यांचा समावेश होता,या यशा बद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य रावसाहेब बारुटे यांनी संघाला शुभेच्छा दिल्या या संघाला डॉ.निलेश गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## एमजीएममध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या बेसिक अँड अप्लाइड सायन्सेस विभागाच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयवार आधारित 'क्विझार्ड्री २.०' प्रश्नमंजुषा, प्रकल्प आणि पोस्टर प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी, रसायन तंत्रज्ञान संस्था जालनाचे संचालक प्रा.डॉ.एस.टी.म्हस्के,एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ,संचालक डॉ.अण्णासाहेब खेमनर, प्रा.डॉ.क्रांती झाकडे,सर्व विभागप्रमुख,प्राध्यापक,विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. 'क्विझार्ड्री २.०' प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये एसबासच्या ७ विभागासह विद्यापीठाच्या एसओईटी, जेएनईसी, यूडीआयसीटी, जीवायपी आणि आयबीटी आदि विभाग आणि संस्थांमधील ३० संघांनी आपला सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरी केली.



## एकनाथ बेगडे यांचे निधन

सोयगाव, दि.४ मार्च : सोयगाव तालुक्यातील गोंदेगाव येथील रहिवासी असलेले एकनाथ सुखदेव बेगडे उर्फ एकनाथ महाराज वय ६५ वर्षे यांचे रविवारी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांचेवर गोंदेगाव येथील स्मशानभूमीत रात्री सात वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुलं,दोन मुली,सुन,जावई,नातवंडे असा मोठा परिवार आहे.अभाविप महाराष्ट्र प्रदेश पुर्व प्रदेश मंत्री स्वप्निल बेगडे यांचे ते वडील होते.



## मिराबाई कुमावत यांचे निधन

गंगापूर दि.३: येथील मीराबाई जगन्नाथ( बघडाणे) कुमावत रा.गंगापुर यांचे आज रोजी अल्पशा आजाराने निधन झाले . त्यांचा अंत्यविधी अमरधाम गंगापूर, येथे करण्यात आला.त्या किशोर बघडाणे (कुमावत) व अनिल (बघडाणे) कुमावत यांच्या मातोश्री होत.



## यशोधराबाई पोहेकर यांचे निधन

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०४:- दिलीपकाका पोहेकर यांच्या पत्नी यशोधराबाई दिलीपराव पोहेकर वय ७४ वर्षे यांना कालापहाड येथील राहत्या घरी सोमवारी सायंकाळी देवाज्ञा झाली.त्यांनी देहदानाचा संकल्प करून तसा अर्ज दाखल केला होता.मंगळवारी सकाळी १० वाजता त्यांचा देह शासकीय रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर यांचेकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी त्यांना शेवटचा निरोप देण्यासाठी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## अग्रलेख...

# भूमिकाभयाचे ओझे!

कोणत्याही निवडणुकीत एखाद्या राजकीय पक्षास मिळणारा मतांचा कौल हे मतदारांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब असते. ज्या पक्षाकडून मतदारांच्या काही अपेक्षा असतात आणि जो पक्ष या अपेक्षा पूर्ण करेल अशी मतदारांची भावना असते, त्या पक्षाला जनाधार मिळतो, हे स्पष्ट आहे. त्यामुळेच मतदारांचा कौल किंवा जनाधार लक्षात घेऊन राजकीय पक्षांनी वारंवार चिंतन व आत्मपरीक्षण करणे गरजेचे असते. ज्या पक्षांनी महत्प्रयासाने ऐक्याची मोट बांधून आघाडी स्थापन केली व सत्तेसाठी सक्षम पर्याय ठरण्याचा दावा मतदारांसमोर केला, त्या पक्षांनाही मतदारांनी स्पष्टपणे झिडकारल्यानंतर तरी त्यांनी आत्मपरीक्षण, चिंतन आणि मतदारांनी दिलेल्या कौलाची मीमांसा करावी आणि कोणत्या अपेक्षापूर्तीच्या भावना पूर्ण करण्यात आपण कमी पडत आहोत, याचा आढावा घेऊन त्या त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत, ही साधारणतः पराभूत पक्षांकडून मतदारांची अपेक्षा असते. महाराष्ट्रातील विरोधी पक्षांच्या बहुधा हेच लक्षात येत नसावे. मतदारांस गृहीत धरणे आणि मतदार आपल्या पाठीशी उभे आहेत या भ्रमात वावरणे हे राज्यातील महाविकास आघाडीच्या अनेक नेत्यांचे गुणविशेष ठरले आहेत. आपणच राज्यातील जनतेचे एकमेव प्रतिनिधी आहोत, ही अनेक नेत्यांची समजूत विधानसभा निवडणुकीत मतदारांनीच धुळीस मिळविली. त्यामुळे मतदारांच्या अपेक्षांची नाडी या नेत्यांना ओळखता आली नाही, हे तेव्हाच स्पष्ट होऊनही पराभवानंतरच्या आत्मचिंतनातून त्याची कारणमीमांसा करण्याचे धाडस या नेत्यांनी दाखविले नसल्याने, महाराष्ट्रातील विरोधकांच्या महाविकास आघाडीचे तारू पुरते भरकटल्यागत झाले आहे. तसे नसते, तर महायुतीचे स्पष्ट बहुमताचे भक्कम सरकार सत्तेवर आल्यानंतर होत असलेल्या पहिल्याच अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधकांनी काही ठोस सकारात्मक भूमिका घेतली असती. विधायक मुद्द्यांवर विरोधकांना सहकार्य करण्याचा समंजसपणाही दाखविला असता आणि राज्याच्या हिताच्या मुद्द्यांवर सहमतीचे राजकारण करण्याचे धोरण कृतीतून स्पष्ट केले असते.

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस होणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या चहापान बैठकीवर बहिष्कार घालणे ही राज्यातील विरोधी पक्षांनी पाडलेली प्रथा यंदाही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पुरती पाळली. या बहिष्काराची कारणे देताना विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मांडलेले मुद्दे पाहता, मतदारांच्या अपेक्षा आणि राजकीय भूमिका यामध्ये असलेली दरी बुजविण्याच्या भावनेचे फारसे दर्शन होत नाही. राजकारण आणि सामाजिक स्थिती यामध्ये असलेली सूक्ष्म भेदाची रेघ पुसून टाकण्याची आजची खरी गरज सध्याच्या राजकारणात पाहावयास मिळत नाही, हे बहुधा त्याचे कारण असावे. ही बाब खरी आहे, की राज्यातील सामाजिक वातावरण सध्या फारसे स्वच्छ नाही. जातीय तेढ, वेगवेगळ्या जातीय मुद्द्यांवरून सुरू असलेले कुरघोडीचे राजकारण, सामाजिक अस्वस्थता, गुन्हेगारी व त्यामुळे समाजात पसरलेली असुरक्षिततेची भावना हे मुद्दे राजकारणविरहित भूमिकेतून व सामाजिक भावनेतून हाताळले गेले पाहिजेत. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात जेव्हा अशा समस्या उद्भवल्या होत्या, तेव्हा त्यांचे निराकरण करण्यात त्या सरकारला यश तर आले नाहीच; पण ते अपयश झाकण्यासाठी महाविकास आघाडीचे काही नेते तेव्हाच्या विरोधकांवर महाराष्ट्रद्रोहाचा आरोप करत असत, हे महाराष्ट्राने पाहिले आहे. जनतेच्या सुरक्षिततेच्या किंवा सामाजिक समस्यांचा कोणताही मुद्दा जेव्हा जेव्हा तत्कालीन विरोधी पक्षनेते या नात्याने देवेंद्र फडणवीस यांनी जबाबदारीने उचलला होता, तेव्हा तेव्हा त्यांच्यावर राजकारण करीत असल्याचा निरर्थक आरोप केला जात होता, हेही महाराष्ट्राने पाहिले आहे. मुंबईच्या उपनगरातील साकीनाका येथे एका महिलेवर निर्घृण, पाशवी बलात्कार झाला. त्या विकृत कृत्याने उभा महाराष्ट्र हादरला होता. त्या वेळीही अशा गुन्ह्याचे राजकारण करू नका, असा सल्ला देत तत्कालीन सत्तेच्या प्रवक्त्यांनी घेतलेली कातडीबचाऊ भूमिकाही महाराष्ट्राने पाहिली होती. ज्या ज्या वेळी महाराष्ट्रावर संकटे ओढवली, नैसर्गिक आपत्ती कोसळल्या, तेव्हा तेव्हा सरकारला जाग आणण्याच्या तत्कालीन विरोधकांच्या भूमिकेस राजकारणाचे रंग चढविले गेले. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. ते प्रश्न तर सुटले नाहीतच; पण केवळ विरोधकांचा आवाज बंद करण्यासाठी व त्यांच्या भूमिकेबाबत जनतेमध्ये संभ्रम पसरविण्यासाठी तत्कालीन सत्ताधीशांच्या प्रवक्त्यांनी केलेली वक्तव्ये व काही कृतींमुळे राज्याच्या राजकीय संस्कृतीसमोर प्रश्नचिन्हे उभी राहिली होती. काही संवेदनशील प्रश्न सामंजस्याने व सत्ताधाऱ्यांसोबत सहकार्याने सोडवायचे असतात. त्याचे राजकारण करावयाचे नसते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात जेव्हा विरोधकांनी सामंजस्याने समस्या सोडविण्यासाठी सहकार्याची भूमिका घेतली, तेव्हा त्यांच्यावर राजकारण करत असल्याचा ठपका ठेवून आपली निष्क्रियता झाकण्याचा प्रयत्न केला गेल्याने जनतेचा अपेक्षाभंग झाला, हे विरोधकांच्या सद्य:स्थितीचे कारण आहे. मात्र, त्याचा सुगावादेखील लागला नसावा, अशीच जुनी भूमिका आजच्या राजकीय वर्तनातून उमटताना दिसते.

चहापान बैठकीवरील बहिष्काराचा निर्णय आणि सोमवारी अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असताना राज्यपालांच्या अभिभाषणाआधी विरोधकांनी घेतलेली कथित आक्रमक भूमिका पाहता, जनतेच्या नेमक्या अपेक्षांचे प्रतिबिंब त्यामध्ये शोधावेच लागते. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांत राज्याचे सामाजिक स्वास्थ्य बिघडेल अशा अप्रिय घटना घडल्या हे खरे आहे. असे काही झाले की, सरकारवर टीकेची झोड उठविणे म्हणजे विरोधकाची भूमिका बजावणे अशी एक समजूत अलिकडे रूढ होत चाललेली दिसते. गेल्या तीन-चार वर्षांत महायुतीचे सरकार सत्तेवर असताना घडलेल्या व सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्या घटनांबाबत विरोधकांनी घेतलेली ही भूमिका म्हणजे, या घटनांच्या मुळाशी जाण्याच्या प्रयत्नांशी प्रतारणा म्हणावी लागेल. पुण्याच्या बसस्थानकातील बलात्काराच्या घटनेनंतर महाराष्ट्रात वादळ माजले. अशा घटनांकडे सामाजिक प्रश्न म्हणून पाहणे योग्य ठरेल. समाजाच्या काही घटकांमधील विकृतींची ही परिणती असते. राज्याच्या एका शहरातील एका बसस्थानकाच्या एका एकाकी कोपऱ्यात घडलेल्या या गुन्ह्यासाठी सरकारवर शरसंधान करून सरकारला जबाबदार धरणाऱ्या याच नेत्यांनी साकीनाका बलात्काराच्या घटनेवरील विरोधकांच्या आक्रमक भूमिकेस केवळ राजकारण ठरविले होते, याची या निमित्ताने आठवण होणे अपरिहार्य आहे. महाराष्ट्र आता विकासाच्या एका नव्या टप्प्यावर वाटचाल करू लागला आहे. आरोग्य, रोजगाराच्या नव्या संधी, पायाभूत सोयीसुविधांचे बळकटीकरण व सर्व समाजघटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याच्या सरकारच्या भूमिकेचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. शेतकरी असल्याचा अभिमान वाटावा, अशी सुविधांची खैरात शेतकऱ्यांवर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरू पाहात आहे. पीक विमा, पीक कर्ज, सुनिश्चित वीजपुरवठा, सिंचनाच्या विविध योजना, गाळमुक्त धरणांबरोबर गाळयुक्त शिवार योजनेतून सुपीक शेतजमिनीचे प्रयोग, पाणलोट योजनेतून शाश्वत भूजल व्यवस्थापनाच्या योजना, महिलांच्या सक्षमीकरणाच्या योजना, रोजगार वृद्धीसाठी विशेष साह्याच्या योजना, शैक्षणिक क्षेत्रातील नवे प्रयोग, परकीय गुंतवणूकदारांना आकृष्ट करून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी व रोजगारवृद्धीसाठी केले जाणारे प्रयोग ही विकासाची नवी वाटचाल आहे. महाराष्ट्राच्या मतदारांना राज्याच्या स्वास्थ्यासाठी याच प्रयोगाची नेमकी अपेक्षा आहे. याच भावनेतून मतदारांनी महायुतीला सत्ता राबविण्याचा कौल दिला असल्याने, विरोधकांनी मतदारांची ही भावना लक्षात घ्यावयास हवी. विकासाच्या या वाटचालीत सत्ताधाऱ्यांच्या हातात समंजसपणे हात घालणे ही महाराष्ट्राची आजची गरज असताना, बहिष्कारासारख्या निरर्थक प्रथांचे पालन करून विरोधकासाठी विरोध करण्याची परंपरा आता संपवायला हवी. ती काळाची गरज आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाने देशाच्या राजकारणास अनेकदा दिशा दिली आहे. त्या दिशेने वाटचाल करून देशाने प्रगतीचा अनुभवही घेतला आहे. त्या दिशेकडे महाराष्ट्रानेच पाठ फिरविली, तर होणारी हानी केवळ राजकारणाची नसेल. ती राज्यकारणाची हानी ठरेल. म्हणून राजकारणविरहित सामंजस्याचे राजकारण करावे, ही जनतेची अपेक्षा विरोधकांनी लक्षात घ्यावयास हवी.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# ट्रम्प यांचे स्वप्न बृहन् अमेरिकेचे

**लेखांक २ रा**

ग्रीनलँड अमेरिकेला विकत देण्यास डेन्मार्कने नकार दिल्यामुळे अमेरिकेला अतिशय राग आला आहे. कारण स्पष्ट आहे. कुठे अमेरिकेसारखी जगातील एकमेव बलाढ्य सत्ता आणि कुठे डेन्मार्कसारखे य:कश्चित आणि चिमुकले राष्ट? त्याचे खरे तर अहोभाग्य की अमेरिकेसारखे गिऱ्हाईक स्वत:हून चालत आले आणि त्याने ग्रीनलँडला मागणी घातली; तीही मागाल ती किंमत द्यायचे मान्य करून! तरीही नकार देण्याचा उद्धटपणा डेन्मार्कने करावा? ते अमेरिकनांना विशेषत: डोनाल्ड ट्रम्प यांना कसे बरे सहन होईल? पण असे काय आहे या ग्रीनलँडमध्ये?

हे महाकाय बेट आर्क्टिक आणि अटलांटिक महासागर यांच्यामध्ये आणि कॅनडालगतच्या बेट समूहाच्या पूर्वेला आहे. आज ग्रीनलँड हा डेन्मार्कचा स्वायत्त प्रदेश आहे. तसा हा भूभाग कॅनडाला लागून आहे. पण राजकीय आणि सांस्कृतिक दृष्टीने पाहिले तर तो युरोपशी सांधलेला आहे. ग्रीनलँडच्या नैर्ऋत्य भागातच लोकवस्ती असून उरलेले बेट जवळजवळ मानवविरहितच आहे. जेमतेम ५ नगरपालिका, एक नॅशनल पार्क आणि एकच विमानतळ! यापैकी विमानतळाचे व्यवस्थापन युनायटेड स्टेट्स एअर फोर्सकडे (अमेरिकेकडे) आहे. ग्रीनलँड जगातील सर्वात मोठे बेट मानले जाते, पण त्याची लोकसंख्या ६० हजारांपेक्षाही कमी आहे.

तीन चतुर्थांश ग्रीनलँड कायमस्वरूपी बर्फाच्छादित असते. या बर्फाचे वजन एवढे आहे की, मधला भूभाग समुद्रसपाटीपासून ३०० मीटर खाली दबला गेला आहे आणि समुद्राच्या किनाऱ्यालगतचा भूभाग वर उंच उचलला गेला आहे. ही एक तरंगती कढईच झाली की! अशा या ग्रीनलँडची भुरळ कुणाला पडणार नाही? सध्या डेन्मार्कने लष्करी सामर्थ्य वाढविण्यास सुरुवात केली असून फ्रान्सने डेन्मार्कची बाजू घेतली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडाची निवड का केली? पहिले कारण असे की, कॅनडा आणि अमेरिकेच्या सीमा लागून आहेत. बेकायदेशीरपणे स्थलांतर करणारे घुसखोर कॅनडाच्या सीमेवरून अमेरिकेत प्रवेश करतात. त्यामुळे येथे गुन्हेगारी वाढविल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला आहे. यामुळे बेरोजगारी वाढली आहे आणि त्याचवेळी असुरक्षितताही वाढते आहे.

दुसरे प्रमुख कारण म्हणजे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांचे जागतिक स्तरावर खलिस्तानी चळवळ्यांसमोर सपशेल लोटांगण घालणे हे आहे. म्हणून ट्रम्प यांनी जाणूनबुजून कॅनडाला अमेरिकेचे ५१ वे राज्य म्हणून आणि ट्रुडो यांचा उल्लेख 'कॅनडाचे पंतप्रधान ट्रुडो' असा न करता अमेरिकेच्या '५१ व्या राज्याचे गव्हर्नर ट्रुडो 'असा करायला सुरुवात केली. ही गंमत म्हणायची की हे विधान गांभीयनि घ्यायचे? पण संतापलेल्या कॅनडामध्ये उत्तरादाखल अलास्काला वेस्ट कॅनडा, ग्रीनलंडला ईस्ट कॅनडा, खुद्द अमेरिकेला साऊथ कॅनडा, मेक्सिकोच्या आखाताला कॅनडाचे आखात, पनामा कालव्याला कॅनडा कॅनाल दाखविणारा नकाशा प्रसिद्ध झाला आहे. पनामा कालव्यावरही ट्रम्प यांना अमेरिकन




वर्चस्व हवे आहे. कारण पनामा कालवा जसा उत्तर आणि दक्षिण अमेरिका खंडांना जोडतो, तसाच तो अटलांटिक आणि पॅसिफिक महासागरांमधील एक महत्त्वाचा व्यापारी मार्गदेखील आहे. १९७७ पर्यंत या कालव्याचे नियंत्रण अमेरिकेकडे होते. नंतर अमेरिकेने या कालव्याचा ताबा पनामाला दिला. गरज पडली तरच या कालव्याच्या संरक्षणासाठी अमेरिका आपले सैन्य पाठवील, असे ठरले होते. मात्र आता ट्रम्प यांनी या कराराला मूर्खपणा म्हणून संबोधले आहे. ते म्हणतात की, पनामा कालव्यात चिनी जहाजांची संख्या वाढते आहे. त्याचवेळी पनामा अमेरिकन जहाजांवर खूप जास्त कर लादतो आहे. अशा स्थितीत अमेरिकेच्या सुरक्षेसाठी आणि आर्थिक हितासाठी त्याचे नियंत्रण परत अमेरिकेकडे असणे आवश्यक आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या यादीतील नवीन म्हणावे असे नाव मेक्सिकोचे आहे. ट्रम्प यांनी गल्फ ऑफ मेक्सिकोचे नाव बदलून 'गल्फ ऑफ अमेरिका' करा, असे सुचवले आहे. मेक्सिकोला अमेरिकेकडून खूप फायदा होतो आहे, असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. मेक्सिकोसोबतच्या व्यापारात अमेरिकेचे नुकसान होते. मेक्सिकोमध्ये गुन्हेगारी शिगेला पोहोचली आहे, असे त्यांनी अनेकदा जाहीरपणे सांगितले आहे. त्यामुळे मेक्सिकोची जबाबदारी अमेरिकेने स्वत:च्या हातात घेण्याची वेळ आली आहे, असे डोनाल्ड ट्रम्प ठासून सांगताहेत. त्यांना आजची युद्धात नष्टप्राय झालेली गाझापट्टीही पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी हवी आहे. कॅनडा, ग्रीनलँड आणि मेक्सिको अमेरिकेत सामील झाल्यास अमेरिकेचे एकूण क्षेत्रफळ २.३४ कोटी चौरस किलोमीटर होईल आणि अमेरिका क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा देश बनेल. सध्या सर्वात मोठा देश रशिया आहे, त्याचे एकूण क्षेत्रफळ १.७१ मिलियन चौरस किलोमीटर आहे.

अमेरिका आणि भारत या दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध अधिक वृद्धिंगत करावेत या मताचे ट्रम्प आणि मोदी हे दोन्ही नेते आहेत. दोन्ही बाजूने (टेरिफ) आयात शुल्कात कपात करावी आणि आर्थिक भागीदारी करार व्हावा यासाठी द्विपक्षीय चर्चा करण्याचे आवाहन ट्रम्प यांना केले होते. टेरिफ हा सीमा कर परदेशातून आयात केलेल्या वस्तूंवर लावतात. टेरिफमुळे आयात केलेल्या विदेशी वस्तू महाग होतात व ग्राहक स्वदेशी वस्तू घेण्यास प्रवृत्त होतो. अशाप्रकारे स्वदेशी उत्पादनाला चालना आणि संरक्षण मिळते. टेरिफमुळे सरकारचे उत्पन्नही वाढते, ते वेगळेच. अमेरिकन उत्पादनांवर सर्वाधिक (टेरिफ) कर लावणाऱ्या देशांमध्ये भारताचा समावेश आहे. वाटाघाटीत याबाबत भारताला नमते घ्यावे लागेल, हे स्पष्टच होते. कोणताही देश अमेरिकन वस्तूंवर जेवढा कर लावेल, अमेरिका त्या देशातील वस्तूंवरही तेवढाच कर लावेल. ही 'टिट फॉर टॅट' (जशास तसे) योजना ट्रम्प यांनी स्वीकारली आहे. आजवर विकसनशील आणि अविकसित देशांना आर्थिक मदत व्हावी म्हणून अमेरिकेने ही योजना अंमलात आणली नव्हती. अमेरिकेचे हे वर्तन जागतिक नेत्याला साजेसे होते. ट्रम्प यांचे दुसऱ्या कार्यकाळातले धोरण याउलट दिसते आहे. दुसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या काही दिवसांतच अशी काही धोरणे अधिक धडाडीने राबविली जात आहेत. यामुळे अमेरिकेचे जागतिक राजकारणातील स्थान धोक्यात येण्याची शक्यता आहे. केवळ व्यापारी आणि निव्वळ व्यवहारी धोरण स्वीकारण्याचे अमेरिकेने ठरविले आहे, असे दिसते. युक्रेनबाबत घेतलेल्या यू टर्नमुळे तर अमेरिकेची विश्वसनीयताच शिल्लक राहणे कठीण आहे. अमेरिकेला कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) उद्योगाला चालना द्यायची आहे त्यासाठी ट्रम्प अणुऊर्जेचे उत्पादन दुपटीने वाढवू पाहताहेत. भारतही अमेरिकेच्या साह्याने स्वतःच्या अणुऊर्जा क्षेत्राचा जलद विस्तार करू पाहतो आहे. भारत सरकारने अलिकडेच अमेरिकेसाठीच्या अण्वस्त्र कायद्यात सुधारणा करण्याचे जाहीररीत्या मान्य केले आहे. जसे की, नुकसानाची जबाबदारी परकीय कंपनीवरच टाकणारी कलमे रद्द करण्याला भारताने मान्यता दिली आहे. केवळ अमेरिकन संरक्षण सामग्रीच नव्हे तर भारताला तंत्रज्ञान हस्तांतरण आणि सह-उत्पादनासाठी अधिक अनुकूल अटी हव्या आहेत. या अटी अमेरिकेला मान्य नाहीत. अमेरिकेला शह देण्यासाठी तंत्रज्ञान हस्तांतरणासह लष्करी सामग्री पुरवू, असा प्रस्ताव रशियाने भारतासमोर ठेवला आहे. अहो, 'अमेरिका फर्स्ट'प्रमाणेच 'इंडिया फर्स्ट' ही भारताची भूमिका आहे. यात चूक काय आहे?

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# धगधगते मणिपूर!

मणिपूर येथील संघर्षाला जातीयतेचे नाव देऊन काँग्रेसने मोदी सरकार आणि भाजपाला कोंडीत पकडण्याचा अनेकदा प्रयत्न केला. सूडभावनेने काँग्रेस पक्ष एवढा वैफल्यग्रस्त आणि बेताल झाला आहे की, त्यास देशाची अखंडता, एकता व सुरक्षिततेचेही भान राहिले नाही. काँग्रेस पक्षाची ही मानसिकता अनेकदा आपल्या देशासाठी अडचणीची ठरली आहे. तरीही हा पक्ष जिवंत आहे. या पक्षाचा देशहितविरोधी उपद्?व्याप अजूनही सुरू आहे. मणिपूरमधील संघर्ष हा जातीयवादी आणि आरक्षणाशी संबंधित असल्याचे चित्र रंगविले गेले. हा संघर्ष तेथील मैतेई आणि कुकी या जनजातीमधील आरक्षण आणि जमिनीच्या ताब्याचा असल्याचे सांगून महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुढे करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह यांना लक्ष्य करण्यात आले. हाच धागा पकडून विरोधकांनी संपूर्ण देशाला भ्रमित करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये काँग्रेस पक्ष आघाडीवर आहे. परंतु, या संघर्षामागील खरे कारण फारच विदारक आहे. सरकारच्या हाती येत असलेल्या पुराव्यावरून मणिपूरला अशांत करण्यामागे विदेशी शक्तीचा हात असल्याचे दिसून येत आहे. ड्रग माफिया, खलिस्तानी गट, जिहादी गट आणि अन्य देशविरोधी शक्तीचा या मागे हात असल्याचे पुरावे हाती लागत आहेत. विशिष्ट 'टूलकिट'द्वारे मणिपूरमधील संघर्ष अधिकाधिक तीव्र करण्याचे प्रयत्न केले गेले. उपरोक्त शक्तींनी या संघर्षाला खतपाणी घालून काश्मीरप्रमाणेच मणिपूर पेटविण्याचा प्रयत्न केला. ज्याप्रकारे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघाकडे नेऊन अधिक चिघळवला, त्याचप्रमाणे काँग्रेस आणि परकीय शक्ती मणिपूरला अस्थिर करून भारतामध्ये पुन्हा एकदा अराजकता माजविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. भविष्यामध्ये भारतापुढील हा एक गंभीर धोका आहे, हे नागरिकांनी ओळखले पाहिजे. हे फक्त सामाजिक अथवा राजकीय संघर्ष नाही तर देशासाठी फार मोठे एक षडयंत्र आहे, हे आम्ही समजून घेतले पाहिजे. ही बाब आपल्या देशाच्या सुरक्षिततेसाठी अतिशय धोकादायक ठरू शकते, हेही धान्यात घ्यायला हवे. काँग्रेस पक्षाला देशाच्या सुरक्षिततेशी काहीएक देणेघेणे नाही. या पक्षाला फक्त आणि फक्त सूडाचे राजकारण करायचे आहे. सत्तेसाठी वाट्टेल ते करण्याची या पक्षाची परंपरा राहिली आहे. आपल्या परंपरेशी काँग्रेस पक्ष इमानेइतबारे वागत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाला निव्वळ शिव्या देऊन आपल्या देशाची सुरक्षितता आणि अखंडता राखली जाऊ शकते का? या प्रश्नाचे उत्तर भविष्यामध्ये काँग्रेसला जनतेस द्यावे लागेल. मणिपूरचा भौगोलिक



परिसर अमली पदार्थाच्या तस्करीसाठी सोयीचा असल्याने आंतरराष्ट्रीय ड्रग माफिया व ख्रिस्ती मिशनरी संस्थांनी तेथे आपले घट्ट जाळे निर्माण करून पाय रोवले आहेत. मानवतेच्या गोड मुखवट्याच्या आड धर्मांतराचे भले मोठे जाळे निर्माण केल्याचा आरोप होत आहे. त्यासाठी दुर्गम भागातील भोळ्या आणि असहाय समुदायांना लक्ष्य केले जाते. शिक्षण, मदत आणि पैशाचे आमिष दाखवून हजारो हिंदूचे धर्मांतरण केले जात आहे, ही वास्तविकता आहे. मागील १०० वर्षांहून अधिक काळ मणिपूर ख्रिस्ती प्रचारकांच्या कारवायांचे केंद्र राहिले आहे. मणिपूरमधील संघर्ष हा केवळ जातीयवादाचा परिणाम नसून तो धर्मांतरण, आंतरराष्ट्रीय तस्करी आणि परकीय शक्तीचा हात असल्याचे दिसून येत आहे. या बाबी प्रामुख्याने तपासल्या गेल्या तर एक फार मोठे षडयंत्र उघडकीस येण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही. जवळपास मागील दोन वर्षांपासून मणिपूरमध्ये संघर्षाची आग धगधगत आहे. मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर तेथे राष्ट्रपती राजवट लावण्यात आली आहे. मणिपूरमध्ये शांततेसाठी केंद्र सरकार सर्वोपरी प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नांना अधिक तीव्र गती देण्याची आवश्यकता आहे. मणिपूरमध्ये विदेशी शक्तीची पाळेमुळे खणून सर्वप्रथम ती नष्ट करण्याची आवश्यकता आहे. या विदेशी शक्तीच्या मुसक्या आवळून त्यांची रसद कापली गेली तर मणिपूर शांत होण्यास वेळ लागणार नाही. याच विश्वासाने केंद्र सरकार पुढील वाटचाल करीत आहे. त्यावर विश्वास ठेवून जनतेनेही सरकारला पाठबळ द्यायला हवे. अन्यथा मणिपूरचे काश्मीर व्हायला वेळ लागणार नाही.

९८८१७१७८५६

## दखल

**प्रबोध नरसापूरकर**

# युरोप आणि भारत : वाढत्या संबंधाचे महत्त्व

युरोपियन आयोगाच्या अध्यक्षांनी नुकतेच संपूर्ण आयुक्त मंडळासह भारत दौरा केला. या दौऱ्याने भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील वाढत्या संबंधांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात बदल होत असताना, ट्रान्सअटलांटिक युती, व्यापार धोरणे आणि सुरक्षा बांधिलकींमध्ये निर्माण होणाऱ्या अडचणींमुळे, भारत आणि युरोप दोघांनीही आपली भागीदारी अधिक मजबूत करण्याची गरज ओळखली आहे. भारतासाठी, युरोपियन युनियनसोबत व्यापार, सुरक्षा आणि तंत्रज्ञान संबंध दृढ करणे म्हणजे आर्थिक स्थिरता, धोरणात्मक विविधीकरण आणि चीन व अमेरिकेला भू-राजकीय प्रतिभार प्रदान करणे होय. हा दौरा सहकार्य वाढवण्याची आणि दीर्घकाळचे व्यापार आणि गुंतवणूक अडथळे दूर करण्याची संधी देणारा आहे . युरोपियन युनियनची थोडक्यात माहिती घ्यायची झाल्यास ही २७ सदस्य राष्टांची एक आंतरराष्टीय राजकीय आणि आर्थिक संघटना आहे, जी प्रामुख्याने युरोपमध्ये स्थित आहेत. या संघाचे एकूण क्षेत्रफळ ४२,३३,२५५ चौरस किलोमीटर (१,६३४,४६९ चौरस मैल) आहे आणि अंदाजे एकूण लोकसंख्या ४४.९ कोटींपेक्षा जास्त आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्हाईट हाऊसमध्ये पाच आठवड्यांपूर्वी झालेल्या पुनरागमनामुळे जागतिक राजकारणात निर्माण झालेल्या महत्त्वपूर्ण बदलांच्या पृष्ठभूमीवर व्हॉन डर लेयेन दिल्लीत दाखल झाल्या. जरी त्यांचा हा दौरा ट्रम्प यांच्या निवडीपूर्वी नियोजित केलेला असला, तरी भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्याच्या त्यांच्या मोहिमेला आता अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. व्हॉन डर लेयेन यांनी युरोपियन आयोगाच्या अध्यक्ष म्हणून त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारताला पहिले आंतरराष्टीय गंतव्यस्थान निवडणे, हा एक हेतुपुरस्सर घेतलेला निर्णय होता. ट्रम्प यांच्यामुळे निर्माण झालेल्या अस्थिर जागतिक परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी धडपडणाऱ्या भारतासाठी, युरोप एक महत्त्वाचा भागीदार म्हणून पुढे आला आहे. ट्रम्प यांच्या व्हाईट हाऊसमध्ये परतण्यामुळे बदललेल्या परिस्थितीमुळे, भारत आपली भू-राजकीय भूमिका अधिक मजबूत करण्याचा विचार करू शकतो. या दौऱ्याने इंडो-पॅसिफिक प्रदेशात नियम-आधारित आंतरराष्टीय व्यवस्था सुरक्षित करण्याच्या सामायिक हितावर भर दिला आहे.

'धोरणात्मक स्वायत्तते'वर परंपरागत भर देऊनही, ब्रुसेल्स (ईयूचे मुख्यालय असलेले शहर) आणि दिल्ली या दोन्ही शहरांनी आपल्या जागतिक धोरणांचा आधार म्हणून अमेरिकेसोबतच्या भागीदारीवर नेहमीच अवलंबून राहिल्या आहेत. अमेरिका सोडून देणे दोघांनाही परवडणारे नसले, तरी ट्रम्प यांच्या अनिश्चित धोरणांना प्रतिसाद म्हणून भारत आणि युरोप दोघांनीही आपले संबंध अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. ट्रम्प केवळ युक्रेन आणि रशियाबाबतचे अमेरिकेचे धोरण बदलत नाही आहेत तर ते दीर्घकाळच्या युतींमधूनही माघार घेत आहेत आणि जागतिक आर्थिक व्यवस्था उलथवून टाकत आहेत. त्यांच्या धोरणात रशिया आणि चीनसारख्या प्रतिस्पर्धी शक्तींशी सौदे करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. आतापर्यंत, अमेरिकेच्या धोरणातील अस्थिरतेचा सामना करण्यासाठी भारताच्या धोरणात रशियासोबतचे संबंध राखणे आणि ब्रिक्ससारख्या मॉस्को-नेतृत्वाखालील युतींमध्ये सहभागी होणे यांचा समावेश होता. तथापि, रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन ट्रम्प यांच्याशी स्वतंत्र करार करण्यास उत्सुक आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यातील महासत्तांचे राजकारण पुन्हा एकदा बदलत आहे. गेल्या शतकात, या तीन महासत्ता कधी मित्र, कधी शत्रू, तर कधी हितशत्रू अशा वेगवेगळ्या भूमिकांमध्ये राहिल्या आहेत. भारत कोणत्याही संबंधांना गृहीत धरू शकत नाही. या वास्तवामुळे भारताच्या धोरणात्मक भागीदारीचा विस्तार करणे आवश्यक आहे आणि युरोप हा भारताच्या धोरणात्मक नियोजनातील एक महत्त्वाचा दुवा आहे, जो अजून जोडायचा आहे. व्हॉन डर लेयेन यांच्या भेटीमुळे दिल्लीला युरोपियन युनियनसोबतचा संवाद पुन्हा सुरू करण्याची एक उत्तम संधी मिळाली आहे. युरोपियन युनियन हे अमेरिका आणि चीननंतर जगातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे अर्थकारण आहे आणि विज्ञान, तंत्रज्ञान, प्रगत उद्योग, भांडवल आणि मोठ्या ग्राहक बाजाराचा एक महत्त्वाचा स्रोत आहे.

खालील आकड्यांवरून भारत-युरोपियन युनियन संबंधांचे महत्त्व अधोरेखित होते. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील संबंध विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण आहेत, विशेषतः आर्थिक आणि व्यापारिक क्षेत्रात.

**आर्थिक आणि व्यापारिक संबंध :** २०२३ मध्ये भारताच्या एकूण व्यापारात युरोपियन युनियनचा वाटा १२.२ टक्के होता, जो अमेरिका आणि चीन दोघांपेक्षाही जास्त आहे. यामुळे युरोपियन युनियन भारताचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार बनला आहे. अमेरिकेनंतर (१७.६ टक्के) भारतीय निर्यातीसाठी युरोपियन युनियन हे दुसरे सर्वांत मोठे ठिकाण आहे (एकूण १७.५ टक्के), तर चीन चौथ्या क्रमांकावर आहे (३.७ टक्के). गेल्या दशकात युरोपियन युनियन आणि भारत यांच्यातील वस्तूंच्या व्यापारात जवळपास ९० टक्के वाढ झाली आहे. २०२३ मध्ये युरोपियन युनियन आणि भारत यांच्यातील सेवा व्यापार ५९.७ अब्ज युरोपर्यंत पोहोचला, जो २०२० मध्ये ३०.४ अब्ज युरो होता. २०२२ मध्ये भारतातील परकीय गुंतवणूक साठ्यात युरोपियन युनियनचा वाटा १०८.३ अब्ज युरोपर्यंत पोहोचला, जो २०१९ मध्ये ८२.३ अब्ज युरो होता, ज्यामुळे युरोपियन युनियन भारतातील एक प्रमुख परकीय गुंतवणूकदार बनले आहे. हे प्रमाण महत्त्वाचे आहे, परंतु चीन (२४७.५ अब्ज युरो) किंवा ब्राझील (२९३.४ अब्ज युरो) मधील युरोपियन युनियनच्या परकीय गुंतवणूक साठ्यापेक्षा खूपच कमी आहे. सद्य:स्थितीत सुमारे ६,००० युरोपीय कंपन्या भारतात कार्यरत आहेत. युरोपियन युनियनकडून थेट परकीय गुंतवणूक सुद्धा (एफडीआय) लक्षणीय आहे, जी भारताच्या औद्योगिक विकासाला, रोजगार निर्मितीला आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला आधार देते.

**मुक्त व्यापार करार (एफटीए) :** भारत आणि युरोपियन युनियनने २००७ मध्ये मुक्त व्यापार करारासाठी (एफटीए) वाटाघाटी सुरू केल्या. बाजार प्रवेश, बौद्धिक संपदा अधिकार आणि गुंतवणूक संरक्षणाशी संबंधित समस्यांमुळे वाटाघाटींमध्ये काही वेळा अडथळे आले असले तरी, ईयू-भारत एफटीए हे एक महत्त्वाचे दीर्घकालीन ध्येय आहे. दीर्घकाळच्या कोंडीनंतर २०२१ मध्ये वाटाघाटी पुन्हा सुरू झाल्या, ज्यामध्ये शुल्क कपात, गुंतवणूक संरक्षण आणि नियामक एकत्रीकरणावर लक्ष केंद्रित केले जात आहे. युरोपियन युनियन भारतात अधिक बाजार प्रवेश शोधत आहे, तर भारत निर्यात आणि गुंतवणुकीला चालना देण्यासाठी व्यापार अडथळे कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे.

**भारत-युरोपियन युनियन यांच्यातील महत्त्वाचे उपक्रम :** धोरणात्मक सहकार्य आणि जागतिक प्रशासन- ईयू भारत धोरणात्मक भागीदारी आणि २०२५ पर्यंतचा रोडमॅप : व्यापार, गुंतवणूक, डिजिटलायझेशन, हवामान बदल, सुरक्षा, जागतिक प्रशासन आणि हवामान लवचीकता मजबूत करणे, शाश्वत वाढ आणि तांत्रिक प्रगती सुनिश्चित करणे, स्वच्छ ऊर्जा, कनेक्टिव्हिटी आणि सुरक्षेवर लक्ष केंद्रित करणे, प्रमुख आर्थिक क्षेत्रांमध्ये भारत-ईयू सहकार्य वाढवणे.

**ईयू-भारत स्वच्छ ऊर्जा आणि हवामान भागीदारी :** शाश्वत ऊर्जेसाठी नूतनीकरणक्षम ऊर्जा, स्मार्ट ग्रिड आणि स्वच्छ तंत्रज्ञान वित्तपुरवठा यामध्ये सहकार्य वाढवणे. हवामान अनुकूलन आणि शमन यांना समर्थन.

## वाचक पत्रे

### पाकच्या पंतप्रधानांनी स्वतःचे नाव बदलावे

नुकतेच पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी भारताला दिलेले आव्हान अतिशय हास्यास्पद आहे. म्हणे, येत्या काळात भारताच्या अर्थव्यवस्थतेस मागे नाही टाकले तर स्वतःचं नाव बदलून टाकीन. या महाशयाच्या विधानानंतर संपूर्ण जगातून अर्थतज्ज्ञांची आकडेवारी समोर आली. ही आकडेवारी सांगते की, जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या विशाल भारताचा जीडीपी शून्यावर आला तरी (जे कदापि शक्य नाही ) भारताला मागे टाकायला पाकिस्तानला अजून ७६ वर्षे लागतील. जे पाकच्या पंतप्रधानांच्या हयातीत शक्य नाही. त्यामुळे त्यांनी आता स्वतःचे नाव बदलण्याची प्रक्रिया सुरू करावी.

पाकिस्तानात आजच्या घडीला अन्नधान्याचा प्रचंड तुटवडा आहे. देशातील निम्मी जनता एक वेळ उपाशी असते. आणि त्या तुलनेत भारताचा विचार केल्यास देशातील धान्य कोठारे समृद्ध आहेत. भारत सरकार ८० कोटी लोकांना मोफत धान्य देते. कुठेतरी तुलना होईल का? विभाजनावेळी भारताने दिलेल्या पंचावन्न कोटी रुपयांच्या मदतीने संसार थाटणारा पाकिस्तान आज चीनच्या तुकड्यावर जगत आहे. त्यामुळे आधीच भिकेचे डोहाळे लागलेल्या पाकिस्तानने भारताला आव्हान देण्याचा हास्यास्पद प्रकार करू नये.

**अखिल देशपांडे**/अकोला

### प्रयागराजमधील गंगेच्या शुद्धीकरणावर आरोप

प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात ६० कोटींपेक्षा जास्त लोकांनी त्रिवेणी संगमात स्नान केले. महाकुंभानंतर गंगा नदीच्या शुद्धतेवर अनेक आरोप झाले, त्यापैकी काही आरोप आणि त्यातील सत्यता खालीलप्रमाणे आहे.

काही लोकांनी असा आरोप केला की, सरकारने गंगेच्या शुद्धतेचे खोटे आकडे सादर केले आहेत. प्रत्यक्षात, सरकारने गंगेच्या पाण्याची वेळोवेळी तपासणी केली आहे आणि त्याचे निष्कर्ष सार्वजनिक केले आहेत. काही लोकांच्या मते, महाकुंभामुळे गंगेचे प्रदूषण वाढले आहे आणि त्यावर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही. परंतु, सरकारने महाकुंभ काळात प्रदूषण नियंत्रणासाठी अनेक उपाययोजना केल्या होत्या. काही लोकांनी असा आरोप केला की, सरकारने गंगेच्या शुद्धतेसाठी केलेले प्रयत्न फक्त देखावा होते, प्रत्यक्षात नदीत कोणतेही बदल झाले नाहीत. परंतु, सरकारी प्रयत्नांमुळे गंगेच्या पाण्यात बऱ्याच प्रमाणात सुधारणा झाली आहे.

गंगा नदीच्या शुद्धतेसाठी सरकारने अनेक प्रयत्न केले आहेत, तसेच अजूनही त्याबद्दलचे प्रयत्न सुरू आहेत. गंगा नदीच्या पाण्यात अशी काही तत्त्वे आहेत की त्यामुळे गंगा नदीचे पाणी आपोआप शुद्ध होते व ते पाणी कितीही दिवस ठेवले तरी दूषित होत नाही, असे मत काही शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे. महाकुंभ काळात मोठ्या संख्येने लोक एकत्र आल्यामुळे नदीचे प्रदूषण वाढले असावे असा अंदाज होता पण तसे घडले नाही. पद्मश्री पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ डॉ. अजय सोनकर यांच्या मते आता गंगा नदीचे पाणी केवळ आंघोळ करण्यासाठीच नव्हे, तर ते पिण्यायोग्य देखील आहे. सरकारने 'नमामि गंगे' या योजनेअंतर्गत अनेक प्रकल्प सुरू केले आहेत, ज्यामध्ये सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे, घनकचरा व्यवस्थापन आणि नदीकाठची स्वच्छता यांचा समावेश आहे.

औद्योगिक कचरा आणि सांडपाणी नदीत मिसळण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने कडक नियम लागू केले आहेत. गंगा नदीच्या शुद्धतेसाठी जनजागृती केली जात आहे. सरकारने नदीच्या शुद्धतेसाठी अनेक प्रयत्न केले आहेत. अजूनही खूप काम बाकी आहे आणि यासाठी सरकार आणि नागरिकांचे एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

### अर्थसंकल्पात 'शकुंतला' आहे का?

अचलपूर ते मूर्तिजापूर अशी एकेकाळी दिवसातून तीन वेळा धावणारी नॅरोगेज रेल्वे, गेल्या सहा वर्षांपासून अचानक बंद केली. ती पुन्हा सुरू व्हावी, एवढेच नव्हे तर ब्रॉडगेज व्हावी म्हणून परिसरातील शकुंतला रेल्वे बचाव ही मोजक्या नागरिकांची समिती सरसावली. गेल्या सहा वर्षांत ३० आंदोलने केलीत. राष्ट्रपतींपासून तर केंद्रीय मंत्र्यांपर्यंत अर्ज, विनंत्या झाल्यात. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जिव्हाळ्याने प्रश्न हाताळून त्वरितच संबंधित मंत्र्यांना ही व्यथा कळकळीने लिहून पाठविली. मात्र रेल्वे मंत्रालयाने अद्याप प्राथमिक सर्व्हे होऊन देखील दखल घेऊन डीपीआर तयार केला नाही ही खंत या परिसरातल्या शेकडो गावांची आहे. मूर्तिजापूर-अचलपूर-चांदूर बाजार व भविष्यात थेट बैतुलपर्यंत ही ब्रॉडगेज झाली तर हजारो रोजगार, व्यापार व परिसराचा अभूतपूर्व विकास होऊ शकतो. समस्या सोडविण्यासाठी शासन गंभीर नाही हे बघून संपूर्ण परिसरात बेचैनी वाढत आहे. विशेष प्रकल्प म्हणून शासनाने अग्रक्रमाने प्राधान्य देऊन शकुंतला मार्गस्थ करावी अशी आशा नागरिक करीत आहेत.

**राजा धर्माधिकारी**/परतवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com





नांदेड- शहरातील वाहतुक समस्या सोडविण्यासाठी पोलीसांसह महापालिकेने अतिक्रमण धारकांवर कारवाई करत अतिक्रमण हटवीले. जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, अप्पर पोलीस अधिक्षक सुरज गुरव, वाहतुक शाखेचे पोलीस निरिक्षक साहेबराव गुट्टे व महापालिकेच्या अतिक्रमण हटाव पंथकाने ही संयुक्त कारवाई केली.

# भावंडांनी ठेवला आयुष्यातला पहिला रोजा

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०४ मार्च**

अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या इस्लाम धर्मात महत्त्व प्राप्त असणाऱ्या रमजान महिन्यास प्रारंभ झाला असून तामसा रोडवर स्थायिक असलेले शेख.उबेद व शेख नवेद या दोन्ही भावांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) ठेवला असून एवढ्या रखरखत्या उन्हात एकीकडे अंगाची लाही - लाही होत असताना तब्बल तेरा तासच्या वरचा रोजा ठेवला असून त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी, तसेच आजी - आजोबा जे की, सौदी अरेबिया येथे उमराहासाठी गेले आहेत त्यांच्याकडून पण शुभेच्छा व कौतुकाचा वर्षाव होत आहे. पत्रकार शेख जुनेद यांचे ते मुलं आहेत. २ मार्चपासून पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून दिव्य कुराण याच महिन्यात



अवतरीत झाल्याने मुस्लिम बांधव या महिन्यात रोजा ठेवून अल्लाह प्रति आपली कृतज्ञता व्यक्त करत असतात. या महिन्यात मोठ्या भाव भक्तीने उपवास व नमाज अदा केली जाते तसेच दान ही मोठ्या प्रमाणावर होत असते. काही वर्षांपासून रमजान हे महिना भर उन्हाळ्यात येत आहे. सूर्योदय ते सूर्यास्त पर्यंत तब्बल १३ तासाचा उपवास असतो त्यातच शेख उबेद व शेख नवेद यांनी उपवास ठेवल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### रेल्वे व्यवस्थापकांकडून पुन्हा आश्वासनाची खैरात...!

**उमरी**-हैदराबाद रेल्वे विभागाचे जनरल मॅनेजर अरुणकुमार जैन आणि डिविजनल रेल्वे मॅनेजर लोकेश वैष्णवी यांच्यासह रेल्वे विभागातील असंख्य अधिकाऱ्यांनी नुकतीच उमरीत येऊन रेल्वेस्थानकाची पाहणी केली. रेल्वे संदर्भात त्यांचे अधिकारी व संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या. रेल्वे प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्या. उमरीकरांनी दिलेले निवेदन घेतले. नवीन रेल्वे येथे थांबण्यासंदर्भात पुन्हा एकदा आश्वासनाची खैरात वाटली आणि निघून गेले. गेल्या अनेक वर्षापासून रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी येतात आणि निवेदन घेऊन जातात. मात्र आतापर्यंत उमरी रेल्वे स्थानकावर एकाही नवीन रेल्वे गाड्यांना थांबा मिळाला नसल्याने प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरवेळी प्रमाणे यावेळी देखील अधिकाऱ्यांनी निवेदन घेतले आणि निघून गेल्याने नवीन रेल्वे गाड्यांना आता तरी थांबा मिळेल काय ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. रेल्वे संदर्भात समष्या सोडविण्यासाठी समितीवर गेलेले सदस्य देखील काहीच काम करीत नाहीत. मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यात उमरी तालुक्याचा मोठा इतिहास आहे. क्रांतीवीरांचे गाव म्हणून उमरीची ओळख आहे. गोरठा येथील संतकवी दासगणू महाराज, उमरीतील संत सदानंद बाबा महाराज, ईकळीमाळ येथील संत श्री पर्वता महाराज यांचे संजीवन समाधीस्थळ या भागात आहे. या संदर्भात तसा फलक उमरी रेल्वेस्थानकावर लावण्यात आला आहे. केवळ फलक लावण्यात आला. मात्र गेल्या अनेक वर्षापासून उमरी रेल्वेस्थानकावर एकाही नवीन रेल्वे गाड्यांना थांबा देण्यात आला नाही. हे मात्र विशेष नगरसोल नरसापुर, अमरावती तिरुपती, विशाखापट्टणम, अजमेर, यासह अन्य नवीन रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा अशी गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी आहे. परंतु दरवेळी आलेल्या रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निवेदन घेऊन जाण्याशिवाय काहीच केले नाही. आतापर्यंत दिलेल्या निवेदनाचा काहीच उपयोग झाला नाही. आतातरी काय होईल..? निजामाबाद ते नांदेड आणि नांदेड ते निजामाबाद धावणाऱ्या सवारी रेल्वे गाडीतील समस्या अद्यापही कायम आहे. निजामाबाद पंढरपुर आणि पंढरपूर ते निजामाबाद ही रेल्वे दुर्लक्षित आहे. तिरुपती ते निजामाबाद धावणारी रॉयलसीमा एक्सप्रेस नांदेडला कधी येणार आहे. नवीन रेल्वे गाड्यांना उमरीत कधी थांबा मिळणार आदी प्रश्न कायमच राहिले आहेत. हे प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत. अशी मागणी होत आहे. प्रारंभी उमरीकरांच्या वतीने वरिष्ठ अधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर निवेदन देण्यात आले. निवेदन घेतले आणि आधिकारी निघून गेले.

### अडचणी सोडवण्यासाठी प्रशासन आजपासून थेट प्रत्येक गावात : सुरेखा स्वामी


**धर्माबाद**-ग्रामीण भागातील गावकऱ्यांचा व शेतकऱ्याचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला पांदण रस्त्याचे प्रलंबित प्रश्न शेतकऱ्यांना



शेतमाल ने आण करण्यासाठी होणारी अडचण लक्षात घेता महसूल विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत मुख्यमंत्री महोदयाच्या शंभर दिवसाचा कृती कार्यक्रमांतर्गत प्रत्येक गावातील स्मशानभूमी पाहणी आणि पांदण रस्ते पाहणी करून अडचणी उद्भवल्यास त्या तात्काळ त्या ठिकाणी सोडवण्यासाठी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी तसेच भूमी अभिलेख विभागाच्या कर्मचारी यांचे पथक गठित करून मार्च महिन्यात उद्यापासून धर्माबाद तालुक्यातील प्रत्येक गाव खेड्यामध्ये हे पथक जाणार आहे . गावकऱ्यांना नम्र निवेदन आहे की त्यांनी या पथकाला भेटून आपल्या अडचणी सांगाव्यात. जास्तीत जास्त रस्ते लोकसहभागातून मोकळे झालेले रस्ते मजबुती करण्यासाठी देखील प्रस्तावित करावेत असे आव्हान धर्माबाद तालुक्याचे तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी केले आहे. गाव तिथे स्मशानभूमी आणि पक्के रस्ते यासाठी हे शासन कटिबद्ध असून मुख्यमंत्र्यांचा शंभर दिवसाचा कालावधी पूर्ण होत असतानाच महाराष्ट्रातल्या प्रत्येक गाव खेड्यामध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. यामधून शेतकऱ्यांचा सर्वात मोठा प्रश्न असलेला शेतीकडे जाणारा पांदण रस्ता अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना स्वतःचा माल ने आण करण्यासाठी गाव नकाशावर नोंदी नसलेले अनेक रस्ते आहेत परंतु शेतकऱ्यातील आपापसात तंटे निर्माण होऊन या ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणारा रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे सर्व संमतीने प्रत्यक्ष शेतकऱ्यांनी यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे. कारण मजबूत रस्ते झाले तर विविध पीक घेऊन शेतकरी समृद्ध होऊ शकतो असेही मत तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी व्यक्त केले आहे. सदरील पथकामध्ये धर्माबाद तालुक्यातील नायब तहसीलदार गावंडे, पंडित राठोड, शिवाजी जाकापुरे, कृष्णा सातपुते, मंडळ अधिकारी तेजस कुलकर्णी, वर्षा कुलकर्णी, अनिल लोहटे, अनिता गोपीनवार व भुमिअभिलेख विभागाचे सचिन आढाव, ईंदू गजभारे, आदबसिंग सिंग जारवाल,शिल्पा पैडीवार, यांचा समावेश असलेले महसूल विभागाचे पथक असल्याची माहिती तहसीलदार श्रीमती सुरेखा स्वामी यांनी दिली आहे उद्यापासून हे पथक तालुक्यातील सर्व गावांमध्ये दिलेल्या नियोजनानुसार पोहोचणार आहे.

### सायलू मुक्केरवार यांचे निधन

**कुंडलवाडी**-शहरातील नरागल्ली येथील रहिवाशी सायलू गंगाधर



मुक्केरवार (५५) यांचा दि.४ मार्च रोजी सकाळी ७ वाजताच्या दरम्यान स्वतःच्या शेतातील तंबाखूच्या भट्टीतून निघणाऱ्या धुराने श्वास कोंडून मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,एक मुलगी, सून, नातू असा परिवार असुन त्यांच्या मृत्युने शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सायलू हे कुंडलवाडी येथील म. रा. विद्युत वितरण कंपनीचे अभियंता सुरेश गड्डवार यांचे मामा होते.

# पीओपीच्या मुर्तिवर बंदी घातल्याने मुर्तिकारागिरांवर उपासमारीची वेळ

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०४ मार्च**

पिओपीच्या मुर्ती कारागीरवर उपासमारीची वेळ, पिओपिच्या गौरी,गणपती मुर्तीवर शासनाने बंदी घातली या निर्णयाने अनेक मुर्तीकारागीर व मुर्तीमजूरावर उपासमारीची वेळ येण्याचे नाकारता येत नाही शासनाने तात्काळ निर्णय रद्द करावा अशी मागणी लोहा येथील गौरी गणपती मुर्ती कारागीर संघटना पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती पिओपिवरील बंदी रद्द करण्यात यावी असा बैठकीत निर्णय घेण्यात आला.

सर्वोच्च नायलायने घातलेल्या पीओपी(प्लास्टर ऑफ पॅरिस) च्या मूर्तीवर बंदी घातली आहे.



या बंदीमुळे देशात सर्वच ठिकाणी मूर्तीकारागीरात असंतोष पसरला आहे. मूर्तिकार व मुर्ती मजूरावर आगामी काळात उपासमारीची वेळ येण्याची शकेता. या निर्णयाच्या अटी रद्द कराव्यात या साठी लोहा शहरातील तुळजाई मंगलकार्यालय येथे कुंभार समाजाच्या वतीने व शहरातील मूर्तिकार यांच्या संयुक्त विद्यमाने नगरपरिषद माजी नगरसेवक दत्तात्रय कांबळे(पेन्टर), प्रसिध्द मूर्तिकार आनंद पलये यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये ५६ मूर्तिकार संचालक या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीमध्ये गेल्या महिन्यामध्ये नाययालयाने दिलेल्या पीओपीच्या मुर्त्यावर बंदी घातली असल्याने मूर्तिकार मात्र या निर्णयावर नाराज असल्याचे मुर्तीकारातुन बोलले जाते यावेळी पिराजी जोरुळे, अंकुश जोरुळे,गंगाराम पलये,ईश्वर जोरुळे,भगवान सळवने, सोनाजी सळवने, कल्याण बंगरुळे, ज्ञानेश्वर जोरुळे, सचिन जोरुळे, बंटी जोरुळे, रवि बंगरुळे, बाळा प्रसाद पारडे, रामकिशन सळवणे, विठ्ठल जोरुळे, बंडु वडजे, तानाजी जोरूळे, अकाश जोरूळे, गोविंद जोरुळे, देविचद पिसोळे, जोरूळे कृष्ण, व्यकटेश जोरुळे, दिपक जोरुळे आर्दीची उपस्थित होती.

# बुद्धगया येथील आंदोलनाला नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट मुदखेडचा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०४ मार्च**



संपूर्ण देशातील बौद्ध समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या बुद्धगया बौद्ध विहार हे गेल्या ७५ वर्षापासून ब्राह्मणाच्या अधिपत्याखाली असून यासाठी बुद्धगया येथे अनेक दिवसापासून आंदोलन चालू आहे याच आंदोलनाला पाठिंबा म्हणून अनेक देशासह जिल्ह्यातील बौद्ध समाजाच्या वतीने शासनाचा निषेध करत बुद्धगया ब्राह्मण मुक्तीसाठी दि. ३ मार्च रोजी नालंदा चारी चॅरिटेबल ट्रस्ट व मुदखेड येथील बौद्ध उपासक उपासिका यांच्यावतीने तहसीलदार तहसील कार्यालयाच्या मार्फत शासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी डॉ. खेम धम्मो महाथेरो मूळावा, डॉ. सत्यपाल महाथेरो संभाजीनगर, पययानंद थेरो लातूर, डॉ. इंदवंश महाथेरो औरंगाबाद, भिकुनी चारुशीला थेरी नांदेड, शीलरत्न थेरो नांदेड, पयारतन थेरो, महाकाशप थेरो, भिख्खू गगनबोधी मुदखेड, यांच्यासह बौद्ध उपासक उपासिका यांची उपस्थिती होती.

# कत्तलीसाठी गोवंश विक्री करणाऱ्या एकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०४ मार्च**

गोवंश जातीच्या जनावराची कत्तल करून त्याची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळाल्या वरून येथील पोलिसांनी एकास ताब्यात घेतले असून दुसरा आरोपी फरार झाला आहे .

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील कुरेशी गल्लीत मुनवर मशिद शेजारी असलेल्या शाहिद इब्राहिम कुरेशी (२६) आणि इब्राहिम करीम कुरेशी हे राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू असतांनाही आपल्या रहात्या घरासमोरील ओसरीवर गोवंश जातीचे मांस विक्री करतांना आढळुन आले. पोलीस आल्याचे पहाताच यातील आरोपी इब्राहिम करीम कुरेशी हा पळुन गेल्याची माहिती आहे. तर घटनास्थळी असलेल्या आरोपी शाहिद इब्राहिम कुरेशी यास पोलिसांनी ताब्यात घेतले व त्याच्या कडील मुद्देमाल जप्त केला आहे. पो.हे .कॉ. शंकर लालु चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे घटनास्थळी स.पो. नि. ज्ञानेश्वर शिंदे यांनी भेट दिली अधिक तपास पो. हे.कॉ.अ. गफुर हे करीत आहेत.

# वनपरीक्षेत्राधीकाऱ्याच्या उदासीनतेमुळे इस्लापूरचा जंगल सफारी प्रकल्प तीन वर्षापासून रखडला

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०४ मार्च**

तालुक्यातील इस्लापूर (सहस्त्रकुंड) वनपरिक्षेत्र कार्यालया अंतर्गत प्रसिद्ध हरीण खराब आहे. यामध्ये हजारोच्या संख्येने मुक्त संचार करणारे वन्य प्राण्यांच्या संरक्षणार्थ प्रस्तावित बहुचर्चित सफारी प्रकल्पाला २०२२ मध्ये मंजुरी मिळाली असताना सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या नाकर्तेपणामुळे प्रकल्पाचे काम बंद असल्याने वन्य प्राण्यांना शिकाऱ्यांच्या भक्षस्थानी पडावे लागत असून अशा गैर जवाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाहीची मागणी वन्यप्रेमी व पर्यावरण प्रेमी करत आहेत.

किनवट पासून ४५ किमी अंतरावर असणारे इस्लापूर (सहस्त्रकुंड) धबधबा आणि हरीण खरबा मुळे प्रसिद्ध आहे. शेकडो एकर मध्ये पसरलेल्या हरीण



खरबा मध्ये हरीण, काळविटे, निलगाय, कोल्हे असे कितीतरी वन्य प्राणी मुक्त संचार करत असतात तर उन्हाळ्यामध्ये पाण्यासाठी आणि चाऱ्यासाठी भटकंती करत रस्त्यावरही दिसतात हे पर्यटक व प्रवाशांकरीता अत्यंत दर्शनीय आहे. परंतु अपघात आणि होणाऱ्या अवैध शिकारी मुळे प्राण्यांची संख्या कमी होत असल्याने २०२२ मध्ये तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी प्रकाश शिंदे यांनी सदर खरब क्षेत्रात जंगल सफारी पार्क बनवण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला त्यामध्ये इलेक्ट्रिकल व्हेईकल पाथवे, शेड, चार्जिंग स्टेशन, उपहारगृह, वॉच टॉवर्स, स्वच्छतागृह, मुख्य प्रवेशद्वार, मजबूत रस्ते पाळीव प्राणी पाहण्यासाठी विविध देखावे यासह अनेक सुविधा करिता कोट्यावधी रुपयांचा निधीच्या प्रकल्पाला मंजुरी मिळाली कामाला सुरुवातही झाली. परंतु दुर्दैवाने वनपरिक्षेत्र अधिकारी प्रकाश शिंदे यांची प्रशासकीय बदली झाली. परंतु त्यानंतर कार्यभार स्वीकारणाऱ्या सध्याच्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी प्रकल्पा बाबत उदासीनता दाखवत बगल दिल्याने काम बंद पडले. वन्यप्रेमी नागरिकांनी पाठपुरावा करूनही परिक्षेत्र अधिकारी यांना प्रतिसाद देत नसल्याने व्यतीत होऊन त्यांनी प्रसार माध्यमांकडे धाव घेतली. याबाबत अधिक माहिती करिता वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन धनगे यांना संपर्क साधला असता सुरुवातीला त्यांनी बोलण्याचे टाळले त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींचा फोन ब्लॉक केला त्यावरून त्यांची कर्तव्य दक्षता लक्षात तर येथेच उलट त्यांच्या निष्क्रिय कारकिर्दीमुळे परिक्षेत्रामध्ये अवैध वृक्षतोड, शिकारी, तस्करी यांना उत आला आहे. अवैध धंदेवाल्यांशी त्यांची अर्थपूर्ण मैत्री असल्याचा आरोपही होत आहे. परंतु वनपरिक्षेत्र अधिकारी कोणालाही जुमानत नसल्याने इस्लापूर वनपरिक्षेत्रामध्ये साहेब प्रतिसरकार तर चालवत नाही ना असा प्रश्न उभा टाकत आहे. अशा निष्क्रिय व कर्तव्य शून्य अधिकाऱ्यांमुळे प्रशासनाची घडी पूर्णता विस्कटली आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची मागणी वन्यप्रेमी व पर्यावरण प्रेमी नागरिकांतून होत आहे.

# वाडी, वस्ती, तांड्यावर पाणी देता का..? पाणी... : विशाल पवार

## बेंबरा तांडा येथे गेल्या २२ दिवसापासून पाणीपूरवठा बंद

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०४ मार्च**

सद्या उन्हाळी महिना चालू असल्यामुळे सुर्य आग ओगत असताना देगलूर तालुक्यातील बेंबरा ग्रामपंचायत आंतर्गत बेंबरा तांडा येथील नागरिकांना पाण्यासाठी भर उन्हात पायपीट करावे लागत असल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून याकडे लोकप्रतिनिधी व ग्रामसेवक तसेच प्रतिनिधींचा अक्षम्य दुर्लक्ष होत असून गावातील पाणीटंचाईच्या झळा नागरिकांना सोसाविया लागत असून त्या गावातील नागरिकांचा स्थानिक लोकप्रतिनिधी सह तालुका स्तरीय लोकप्रतिनिधी विषयी तीव्र संताप व्यक्त करताना चे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यानच्या काळात गेल्या अनेक वर्षा पासून



ग्रामपंचायत ताबा असलेल्या एका विहिरीतून पाणी पुरवठा केला जातं होता या गावात गेल्या २० ते २२ दिवसापासून पाणी टंचाई झळयाचे चित्र नेहमीच पाहवयास मिळत आहे. पाण्या अभावी नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून करुन जवळच असलेल्या घुळा तांडा (तेलंगणा) येथून २-३ किलोमीटर अंतरावर पाणी घेऊन यावा लागत आहे.तसेच येथुन सायकल,दुचाकी,आटो,पीक अप, एवढं च नव्हे तर चक्क महिलांना दोन - दोन घागरी डोक्यावर पाणी आणत आहेत.सदरील पाणी पुरवठा तात्काळ दूर कराव असे निवेदन उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांना गावाकऱ्याच्या वतीने देण्यात आले आहे.

तेलगाणा सीमेवरील बेंबरा तांडा येथे गेल्या बावीस दिवसापासून होत आसलेल्या पाणी टंचाई ची प्रशासने,लोकप्रतिनिधी ने तात्काळ दखल घेऊन पाण्याची सोय करून द्यावी अन्यथा पाण्यासाठी संविधानिक पद्धतीने जनआंदोलन उभा करण्यात येईल.

# प्रलंबित ई-चलन भरणा करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०४ मार्च**


प्रादेशिक परिवहन कार्यालयातून वाहन धारकांना देण्यात आलेले प्रतिवेदन हे मोठया प्रमाणात प्रलंबित आहे. प्रलंबित प्रतिवेदन, ई-चलन हे तीन महिण्यानंतर कोर्टात पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार या कार्यालयाकडून प्रलंबित प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आले. न्यायालयाकडून वाहनमालक, चालक यांना या संदर्भात जामीनपात्र व अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात येणार आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघे जागीच ठार

## किनवट राष्ट्रीय महामार्गावरील घटना

**तभा वृत्तसेवा**
**माहूर ,दि. ०४ मार्च**

तालुक्यातील पानोळा येथील काही जण दि.०३ मार्च रोजी दर्शनासाठी विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील पांगरी येथील महादेव मंदिरावर गेले होते.माहूर तालुक्यातील वडसामार्गे दुचाकीवरून परतीच्या प्रवासात निघालेल्या यातील दोघांना रात्री अंदाजे १० वाजताच्या सुमारास किनवट रोड,राष्ट्रीय महामार्गावरील उमरा ते आसोली फाटा दरम्यान अज्ञात वाहनाने जोरदार धडक देऊन चिरडल्याने एकाचे मुंडके धडावेगळे तर तर दुसऱ्याच्या शरीराचा एक भाग अक्षरशः चेंदामेंदा झाल्याने दोघांचाही जागेवरच मृत्यू झाल्याची अतिशय



धक्कादायक अशी अपघाताची घटना घडली.मन सुन्न करणाऱ्या या दुर्घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

माहूर तालुक्यातील पानोळा येथील काही जण विदर्भातील पांगरी येथे महादेवाच्या दर्शनासाठी गेले होते. यातील प्रकाश परसराम जाधव वय ५२ वर्षं व भारत धनसिंग राठोड वय ५५ वर्षं हे दोघे रात्री दुचाकी क्रमांक एम. एच. २९ एफ १२४२ वरुन परतीच्या प्रवासाला निघाले होते.रात्री १० वाजताच्या सुमारास माहूर किनवट राष्ट्रीय महामार्गावरील उमरा ते आसोली फाटा दरम्यान त्यांच्या दुचाकीला कोणत्यातरी अज्ञात वाहनाने जोरदार धडक देऊन उडवून देत अक्षरशः चिरडून टाकले.धडक इतकी जबर होती कि, दुचाकीवरील प्रकाश जाधव यांचे शीर धडापासून वेगळे झाले व त्यांचा जागीच मृत्यू झाला. भारत राठोड यांचे अर्ध्या शरीराचा अक्षरशः चेंदामेंदा झाल्याने ते गंभीर जखमी झाल्याने अत्यवस्थ अवस्थेत खाली पडले. रुग्णवाहिकेतून माहुर येथिल ग्रामीण रुग्णालय दाखल केले असता तेथे डॉ. अक्षय सांगळे आणि आष्टा येथील डॉ.संदेश राठोड यांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच माहूरचे प्रभारी पोलिस निरीक्षक शिवप्रकाश मुळे आणि सिंदखेड पोलिस ठाण्याचे सपोनि. रमेश जाधवर यांनी घटनास्थळी धाव घेतली.

# मांजरम येथे घराला आग

## शेती उपयोगी अवजार जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. ०४ मार्च**

तालुक्यातील मांजरम येथील भरवस्तीत असलेल्या घराला पहाटेच्या वेळी अचानक आग लागून घरातील साठवून ठेवलेली शेती उपयोगी अवजारे आगी त जळून पुर्ण खाक झाले आहे.

दि.२५ फेब्रुवारी पहाटेच्या सुमारास संपुर्ण गांव साखर झोपेत असतांना अचानक पणे घराला आग लागली होती. याच वेळी घरा शेजारी आसलेल्या नागरिकांनी पाणी टाकून आग आटो क्यात आणण्याचा खूप प्रयत्न केले. परंतु घरातील साठ वून ठेवलेले प्लास्टिकचे, रबरी व लाकडी साहित्यामुळे आगीने तात्काळ रौद्ररूप धारण केल्याने आग



आटोक्या त येवू शकली नाही. या वेळी या घटनेची माहिती त्यांचे पुत्र गिरीश नारायण पांडे यांनी नायगांव तहसील कार्या लयात दिली असून. तात्काळ तलाठ्याने सदरील घटनेचा पंचनामा केला. या आगीत जवळपास दोन ते अडीच लाख रूपयांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

## स्त्रीशक्ती

# महाकुंभ : महिला केंद्रस्थानी, ऐतिहासिक बदलाचे प्रतीक



प्रा महाकुंभ २०२५ हा केवळ जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक मेळावा म्हणून नव्हे तर धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात महिलांच्या वाढत्या सहभागाचा दाखला म्हणून इतिहास घडवत आहे. आतापर्यंत ५५ कोटींहून अधिक भाविकांनी कुंभमेळ्यात उपस्थिती दर्शविली असून यात महिलांची संख्या प्रचंड आहे. महिलांचा मोठ्या संख्येत वाढता सहभाग या कार्यक्रमात लिंग प्रतिनिधित्व आणि सामाजिक बदलामध्ये लक्षणीय बदल दर्शवित आहे.

**महाकुंभ २०२५ हा केवळ जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक मेळावा म्हणून नव्हे तर धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात महिलांच्या वाढत्या सहभागाचा दाखला म्हणून इतिहास घडवत आहे. आतापर्यंत ५५ कोटींहून अधिक भाविकांनी कुंभमेळ्यात उपस्थिती दर्शविली असून यात महिलांची संख्या प्रचंड आहे. अमहिलांचा मोठ्या संख्येत वाढता सहभाग या कार्यक्रमात लिंग प्रतिनिधित्व आणि सामाजिक बदलामध्ये लक्षणीय बदल दर्शवितो.**

प्राध्यापक बद्री नारायण आणि सहयोगी प्राध्यापिका डॉ. अर्चना सिंह यांच्या नेतृत्वाखाली गोविंद वल्लभ पंत समाज विज्ञान संस्थेची एक संशोधक चमू या सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण करीत आहे. या चमूतील सदस्य महाकुंभाच्या विविध प्रवेश स्थळांवर आणि स्नान घाटांवर उपस्थित राहून कुंभमेळ्यात येणाऱ्या लोकांचे वर्तन आणि विचार जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचे प्राथमिक निष्कर्ष महिलांच्या सहभागामध्ये लक्षणीय वाढ दर्शवतात. कुंभमेळ्यात ४० टक्क्यांहून अधिक महिला उपस्थित आहेत, विशेषतः शहरी भागातील. १८-३५ वयोगटातील महिलांमध्ये लक्षणीय वाढ दिसून आली आहे, जी बदलत्या सामाजिक गतिशीलतेवर प्रकाश टाकते.

पुरुष साथीदारांशिवाय महाकुंभला भेट देणाऱ्या केवळ महिलांच्या समूहात झालेली वाढ हा सर्वात उल्लेखनीय ट्रेंड आहे. सर्व स्तरात झालेला शिक्षणाचा प्रसार, सुरक्षिततेची भावना, वाढलेला आत्मविश्वास व विकसित झालेले सामाजिक मापदंड यामुळेच महाकुंभात सहभागी होणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढ झाल्याचे डॉ. अर्चना सिंह यांचे विश्लेषण आहे. आधीच्या काळात स्त्रियांचा धार्मिक सहभाग मुख्यतः घरगुती विधींपुरताच मर्यादित होता, आता मात्र त्या मोठ्या प्रमाणावर आध्यात्मिक शोधात सक्रियपणे गुंतल्या आहेत, असे डॉ. सिंह म्हणाल्या.

उत्तर प्रदेशातील सुरक्षित वातावरणानेही या सामाजिक परिवर्तनाला हातभार लावला आहे, ज्यामुळे महिलांना स्वतंत्रपणे प्रवास करण्यास आणि अधिक मुक्तपणे सहभागी होण्यास प्रोत्साहित केले जात आहे. हा नवा आत्मविश्वास आणि स्वातंत्र्य केवळ धार्मिक परंपरांमध्ये महिलांच्या भूमिकेला आकार देत नाही तर व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक परिदृश्यात त्यांचे स्थान अधिक मजबूत करत आहे.

महाकुंभ २०२५ चा अभ्यास करणाऱ्या १७ सदस्यीय संशोधन चमूला असे आढळून आले आहे की धार्मिक आणि सामाजिक संस्थांनीही त्यांचा दृष्टिकोन बदलला आहे. रीसर्च टीमच्या सीनियर फेलो डॉ. नेहा राय यांच्या मते, आखाडे आणि धार्मिक नेते आता स्त्रियांबद्दल अधिक खुला, मोकळेपणाचा आणि स्वीकारार्ह दृष्टिकोन दाखवत आहेत. यामुळे महिला भक्तांचा अधिक आदर-सन्मान आणि समावेशन झाले आहे. परिणामी सनातन धर्म समजून घेण्यात त्यांचे स्वारस्य, रुची वाढली आहे.

चमूतील आणखी एक संशोधक डॉ. प्रीती यादव यांनी सांगितले की, अनेक महिलांनी विविध आखाड्यांचे संत आणि धार्मिक नेत्यांशी चर्चा केली व त्यांना सक्रियपणे, उत्सुकतेने अनेक प्रश्न विचारले. विचारांच्या या आदान-प्रदानामुळे महिला आणि आध्यात्मिक नेते दोघांनाही सनातन धर्माची व्याप्ती वाढवण्यास मदत मिळत आहे.

(ऑर्गनायझरवरून साभार)

## इतिहास

# पराक्रमी चंद्रगुप्त (द्वितीय)

स मुद्रगुप्ताच्या कारकिर्दीनंतर त्याचा जेष्ठ पुत्र रामगुप्त गादीवर आला. शक राजाने रामगुप्तावर आक्रमण करून त्याचा पराभव केला. रामगुप्ताचा भाऊ चंद्रगुप्त (द्वितीय) (इ.स. ३८०-इ.स. ४१५)याने त्या पराभवाचा सूड घेत शक राजास ठार मारले आणि स्वत: राज्यकारभार हाती घेतला. चंद्रगुप्त हा एक सामर्थ्यशाली, धाडसी व न्यायी राजा आणि उत्तम प्रशासक म्हणून ओळखला जातो. त्याने समुद्रगुप्ताचे राज्य तर अबाधित ठेवलेच, पण त्याशिवाय शक राजांचा पराभव करून सौराष्ट? आणि गुजरात प्रांत आपल्या राज्यात समाविष्ट केला. त्यामुळे पश्चिम किनाऱ्यावरची बंदरे त्याच्या आधिपत्याखाली आली. त्यानंतर त्याने वायव्येकडील अवंती आणि कुशाणांचे उर्वरित छोटे राज्य आपल्या साम्राज्यास जोडले. रामगुप्ताच्या काळात बंगालच्या राजाने गुप्त साम्राज्याचे मांडलिकत्व झुगारून दिले होते. चंद्रगुप्ताने बंगालवर चाल करून बंगालचा पराभव केला आणि ते राज्य आपल्या राज्यास जोडले. त्यानंतर त्याने सिंधू नदी पार करून त्यापलीकडील हूणांचा प्रदेश आपल्या साम्राज्यात समाविष्ट केला. समुद्रगुप्ताच्या वेळच्या गुप्त साम्राज्याच्या सीमा चंद्रगुप्ताने काही पटींनी विस्तृत केल्या. पश्चिमेस सिंध व सौराष्ट?ापासून पूर्वेकडे बंगालपर्यंत आणि हिमालयापासून ते नर्मदा नदीपर्यंत त्याचे साम्राज्य पसरलेले होते. दक्षिणेत विदर्भात वाकाटकांशी विवाहसंबंधाकरवी त्याने मैत्रीचे नाते निर्माण केले. त्यामुळे दक्षिणेतील पश्चिम किनारपट्टीचा काही भाग चंद्रगुप्ताच्या ताब्यात आला. शक राजांना आणि सिंधू नदीच्या खोऱ्यातील हूणांना पराभूत केल्यामुळे भारतातील परकीयांचे आधिपत्य पूर्णपणे संपुष्टात आले. त्याच्या काळात उत्तर भारतात एकसंधता आणि एकात्मता निर्माण झाली.



चंद्रगुप्ताने विक्रमादित्य हे नाव धारण केले. चंद्रगुप्ताच्या काळातील अनेक सुवर्ण, चांदी आणि तांब्याची नाणी उपलब्ध आहेत. त्याच्या कारकिर्दीत समाजाला स्थैर्य प्राप्त झाल्यामुळे शास्त्र, कला, संस्कृती, व्यापार आणि स्थापत्यशास्त्र व कला इत्यादींना उत्तेजन मिळाले आणि त्यांची भरभराट झाली. याच काळात हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन झाले. कालिदासासारखा महाकवी, विशाखदत्तासारखे वाङ्‌मयकार, धन्वंतरी हे जीवशास्त्राचे तज्ज्ञ, आर्यभट्ट व वराहमिहीर यांच्यासारखे गणितज्ज्ञ तसेच इतर अवकाश शास्त्रज्ञ अशा विद्वानांना चंद्रगुप्त (विक्रमादित्य) आणि त्यानंतरच्या राजांनी आश्रय दिला. समुद्रगुप्ताच्या कारकिर्दीत सुरू झालेले सुवर्णयुग विक्रमादित्य, कुमारगुप्त आणि स्कंधगुप्त यांच्या कारकिर्दीपर्यंत चालू राहिले. गुप्त साम्राज्याला प्राचीन भारताचे सुवर्णयुग असे मानले जाते. फाहिएन नांवाचा एक चीनचा विद्वान पर्यटक बौद्ध धर्माच्या अभ्यास व संशोधनासाठी चंद्रगुप्ताच्या राज्यकालात गुप्त साम्राज्यात तीन वर्षे राहून गेला. त्याने गुप्तकालीन राजकीय, धार्मिक आणि सामाजिक परिस्थितीवर बऱ्याच नोंदी केल्या.

## जीवनशैली

# शारीरिक-मानसिक संतुलनासाठी ताडासन

शा रीरिक, मानसिक, भावनिक, आध्यात्मिक फायद्यांसाठी आणि एकूणच व्यक्तिमत्त्व विकासासाठी योगासन, प्राणायाम, सूर्यनमस्कार, ध्यान किती महत्त्वाचे आहे, हे आपण मागे पाहिले. याच मालिकेत आसनांचा विचार केला असता आणखी एका प्रभावशाली आसनाची आठवण येते आणि ते आसन म्हणजे ताडासन. ताडासन किंवा 'माऊंटन पोझ' हे योगासनांच्या मूलभूत आसनांपैकी एक आहे. आसनाचे हे नाव दोन संस्कृत शब्दांपासून बनले आहे. 'ताड' म्हणजे 'पर्वत' आणि 'आसन' म्हणजे 'मुद्रा', म्हणजेच पर्वताची मुद्रा करणे असा याचा अर्थ आहे. ताडाचे झाड त्याच्या उंचीकरिता प्रसिद्ध आहे. या आसनात शरीराची अंतिम स्थिती ही ताडाच्या झाडाप्रमाणे उंच भासते, म्हणूनच या आसनाला 'ताडासन' असे नाव आहे. हे आसन करायला सोपे आणि साधे दिसत असले तरी त्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. उभ्याने करायच्या अन्य महत्त्वपूर्ण आसनांमध्ये प्रावीण्य मिळविण्यासाठी तुम्हाला सर्वात आधी 'माऊंटन पोझ' शिकणे आणि त्याचा सराव करणे आवश्यक आहे. हे आसन करताना तुम्हाला जमिनीवर स्थिर राहावे लागेल व मन एकाग्र करावे लागेल. जेणेकरून शरीरात ऊर्जा प्रवाहित होईल. ताडासन उंची वाढवण्यासाठी आणि शरीराला पायांपासून हातापर्यंत ताणण्यासाठी प्रभावीपणे कार्य करते. या आसनाच्या सरावामुळे तुमच्या संपूर्ण शरीराला आणि मनाला फायदा होतो.

**कृती** : आसनपूर्व स्थितीसाठी दोन्ही पायांमध्ये थोडे अंतर ठेवून दोन्ही तळहात दोन्ही मांड्यांजवळ ठेवून आरामात उभे रहावे. आसनपूर्व स्थितीमधून सावकाश दोन्ही पाय एकत्र घ्यावेत. ताडासन हे उभे राहून करावयाचे आसन असल्याने दोन्ही पाय एकत्र घेताना पायाचे अंगठे, टाचा, गुडघे एकमेकांजवळ करून सरळ उभे रहावे. दोन्ही हात शरीराजवळ सरळ ठेवावेत. आपली नजर डोळ्यासमोरील कुठल्याही काल्पनिक स्थिर बिंदूवर केंद्रित करावी. श्वास घेत हळूहळू दोन्ही हात शरीरासमोरून सरळ रेषेत वर घेत घेत टाचाही त्याच लयीत जमिनीपासून वर उचलाव्यात. दोन्ही हात पूर्ण वर गेल्यावर बाहू कानाजवळ येतील आणि हाताची बोटे आकाशाच्या दिशेला सरळ राहतील आणि टाचा वर उचलल्यामुळे आपण चवड्यांवर उभे असू. सर्व शरीराला वरच्या दिशेने ताण देऊन खेचून घ्यावे. सर्व शरीराचा भार चवड्यांवर तोलून धरावा. चेहरा सरळ ठेवून लक्ष स्थिर बिंदूवरच केंद्रित करावे किंवा शक्य असल्यास व तोल जात नसल्यास डोळे बंद करून प्राणधारणेचा अभ्यास करावा. प्राणधारणा म्हणजेच श्वासावर लक्ष केंद्रित करणे. आसनाच्या अंतिम स्थितीत श्वासाची गती नैसर्गिक असावी. ही ताडासनाची अंतिम स्थिती आहे. हे एक प्रकारचे संतुलन आसन आहे.

आसनातून बाहेर येण्यासाठी सावकाश डोळे उघडून टाचा आणि हात एकत्र हळूहळू एकाच लयीत जमिनीच्या दिशेने घेऊन यावेत. हात शरीराच्या बाजूला व टाचा जमिनीवर आल्यानंतर दोन्ही पायांमध्ये अंतर ठेवून आसनपूर्व स्थितीत उभे रहावे.

**लाभ** : हे आसन केल्यामुळे मणक्यांमधील रक्ताभिसरण सुधारते. मणक्यांमधील नाड्यांच्या जोड्या उत्तेजित होतात. मेरुदंडाचा लवचिकपणा वाढतो व त्यामुळे मणक्यांवरील अनावश्यक दाबामुळे निर्माण झालेले मेरुदंडाचे किरकोळ आजार व दोष नाहीसे होतात. वाढत्या वयामध्ये (वय वर्ष १४ ते १८) दररोज ताडासनाचा अभ्यास केल्यामुळे उंची वाढण्यास मदत होते. पायातील अशुद्ध रक्तवाहिन्यांचे काम सुधारते. शरीरातील आळस निघून जातो व ताजेतवाने वाटते. मनोकायिक तोलक्षमता वाढते.

**पूर्वाभ्यास** : उत्तान ताडासन (जमिनीवर पाठीवर झोपून ताडासन करणे),




पूर्व ताडासन (टाचा न उचलता केवळ हातांना ताण देऊन ताडासन करणे), सुलभ ताडासन (भिंतीच्या आधाराने उभे राहून ताडासन करणे) या आसनांचा ताडासन करण्यापूर्वी सराव करावा.

**विविध प्रकार** : दोन्ही हातांच्या बोटांची गुंफण घालून हात वरील बाजूस ताणले जातात किंवा दोन्ही हात नमस्कारासनामध्येही ठेवले जातात. पायांमध्ये साधारण अंतर ठेवून दोन्ही हात शरीराच्या बाजूला ठेवून (समस्थिती) उभे राहण्यासही ताडासन म्हटले जाते.

**विधिनिषेध** : मेरूदंडाचे तीव्र आजार, खांदे-कोपर यांमधील वेदना, प्रचंड मानसिक अस्थिरता असल्यास हे आसन टाळावे. शक्यतो योगशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली या आसनाचा अभ्यास करावा.

## राज्य



# महाकुंभामुळे उत्तरप्रदेशाची अर्थव्यवस्था सुदृढ

## तीन लाख कोटींचा होणार फायदा

उ त्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शुक्रवारी सध्या सुरू असलेल्या महाकुंभाच्या यशावर प्रकाश टाकला आणि या आध्यात्मिक उत्सवामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला ३ लाख कोटी रुपयांहून अधिक फायदा होईल, असे सांगितले. सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान समाजवादी पक्षाच्या आमदार रागिणी सोनकर यांनी यूपी विधानसभेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाकुंभमुळे राज्याला होणाऱ्या आर्थिक लाभाविषयी माहिती दिली. सरकारने गेल्या आठ वर्षांत आठ कोटींहून अधिक लोकांना दारिद्र्यरेषेच्या बाहेर काढले आहे, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १० वर्षांत आम्ही २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणू शकलो आहोत आणि गेल्या आठ वर्षांत आमच्या सरकारने ६ कोटींहून अधिक लोकांना गरिबीतून बाहेर काढले आहे. यावरून प्रत्येक क्षेत्रात बदल झाल्याचे दिसून येते. महाकुंभाच्या उत्कृष्ट आयोजनामुळे संपूर्ण देश आणि विश्व आज उत्तर प्रदेशची क्षमता पाहत आहे व याचा आम्हाला अभिमान वाटला पाहिजे. महाकुंभ उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेत ३ लाख कोटी रुपयांहून अधिक वाढ घडवून आणणार आहे, असेही मुख्यमंत्री आदित्यनाथ म्हणाले. त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी सरकारतर्फे सुरू असलेल्या प्रयत्नांवर आणि उपक्रमांवर भर दिला आणि उत्तर प्रदेश पोलिसांमध्ये २० टक्के महिलांची भरती करण्यात आली आहे, याकडे माध्यमांचे लक्ष वेधले. 'आम्ही महिला सक्षमीकरणासाठी काम केले गेले आहे व करीतच राहू. यूपी पोलिस विभागात २० टक्के महिलांची भरती करण्यात आली. तसेच महिलांना प्रत्येक क्षेत्रात रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी आमचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत, असेही मुख्यमंत्री आदित्यनाथ म्हणाले.

मुख्यमंत्री योगी पुढे म्हणाले, भाजपाच्या डबल-इंजिन सरकारच्या अंतर्गत, उत्तरप्रदेश देशातील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनले आहे आणि २०२९ पर्यंत देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनून एक ट्रिलियन डॉलर्सचे लक्ष्य गाठण्याच्या मार्गावर आहे.


'समाजवादी पक्षाच्या सरकारच्या काळात उत्तरप्रदेशला देशातील 'बिमारू' राज्यांच्या श्रेणीत टाकण्यात आले होते. हे राज्य देशाची ६वी-७वी अर्थव्यवस्था बनले होते. मात्र, भाजपाप्रणीत सरकारच्या आठ वर्षांच्या कार्यकाळात उत्तर प्रदेशचे आर्थिक व औद्योगिक चित्र पूर्णपणे बदलले आहे. गेल्या ८ वर्षांच्या दुहेरी इंजिन सरकारच्या प्रयत्नांमुळे उत्तरप्रदेश भारतातील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनले आहे आणि २०२९ मध्ये उत्तर प्रदेश एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनेल, असा ठाम विश्वास योगी आदित्यनाथ यांनी व्यक्त केला. त्यांनी फेब्रुवारी २०२३ मध्ये आयोजित ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिटच्या यशावरही प्रकाश टाकला. उत्तरप्रदेश हे राज्य देशातील सर्वोत्तम गुंतवणुकीचे ठिकाण बनले आहे, असेही त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले.

'उत्तरप्रदेश हे देशातील सर्वोत्तम गुंतवणुकीचे ठिकाण म्हणून उदयास आले आहे. फेब्रुवारी २०२३ च्या ग्लोबल इन्व्हेस्टर समिट दरम्यान राज्याला ४० लाख कोटी रुपयांचे प्रस्ताव आले, त्यापैकी १५ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प प्रत्यक्ष सुरू झाले आहेत. या १५ लाख कोटींचा अर्थ ६० लाख तरुणांना रोजगार हमी आहे. ७.५ लाख तरुणांना सरकारी सेवा देणारे हे पहिले सरकार आहे, असेही योगी म्हणाले. उत्तरप्रदेशचे अर्थमंत्री सुरेश खन्ना यांनी गुरुवार, २० फेब्रुवारी रोजी २०२५-२६ साठी ८,०८,७३६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला. अर्थसंकल्पात सायबर सुरक्षेवर केंद्रित आर्टिफिशियल इंटेलिजन्स सिटी आणि टेक्नॉलॉजी रीसर्च पार्कला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच पात्रतेच्या आधारावर गुणवंत विद्यार्थ्यांसाठी स्कूटी, चार नवीन द्रुतगती मार्ग (एक्सप्रेस वे) बांधणे आणि ५८ नगरपालिकांना स्मार्ट नगरपालिका म्हणून विकसित करणे यांचाही अर्थसंकल्पात समावेश करण्यात आला आहे.

(ऑर्गनायझरवरून साभार)

## व्यक्तिमत्त्व

# भास्कराचार्य प्रथम व द्वितीय



भा रतीय ज्योतिषशास्त्र व गणित या विषयांत दोघा भास्कराचार्यांना विशेष कार्य केले आहे.

भास्कराचार्य, प्रथम (जन्म इसवीसन ६२९) सातव्या शतकातील भारतीय ज्योतिर्विद होते. त्यांच्याविषयी वैयक्तिक माहिती विशेष उपलब्ध झालेली नाही. आस्मक (आंध्र प्रदेश) येथे त्यांचा जन्म होऊन पुढे हे सौराष्ट्रात गेले असावेत. हे पहिल्या आर्यभटांचे पुरस्कर्ते होते व हे आर्यभटांचे शिष्यही असावेत. यांचे तीन ग्रंथ प्रसिद्ध असून पैकीमहाभास्करीय व लघुभास्करीय या ग्रंथाची प्रत्येकी आठ प्रकरणे आहेत त्यांमध्ये पुढील विषयांची माहिती आलेली आहे. ग्रहांचे माध्य (सरासरी) व स्पष्ट भोग (ज्योतिषशास्त्रीय सहनिर्देशक पद्धती), स्थानिक रेखांतर संस्कार, दैनिक गतीविषयीचे तीन प्रश्न (दिशा, स्थान व काळ), ग्रह व ताऱ्यांच्या युत्या, सूर्य-चंद्राची ग्रहणे, सूर्यसहोदयास्त (एखाद्या ग्रहाचे वा ताऱ्याचे सूर्याच्या बरोबर उगवणे वा मावळणे), चंद्राच्या कला, त्रैराशिक पद्धतीचे विवरण वगैरे. या दोन्ही ग्रंथांवर समीक्षण ग्रंथ लिहिले गेले होते. आर्यभटीय भाष्य हा त्यांचा तिसरा ग्रंथ म्हणजे पहिले आर्यभट यांच्या ग्रंथाचे समीक्षण आहे. त्यांच्या ग्रंथातून कुट्टकाचा (अनिश्चित समीकरणाचा) उल्लेख आढळतो. सर्व अंकगणितीय कृत्ये दोन प्रकारची (बेरीज व वजाबाकी) असतात, असे त्यांचे मत होते.

**भास्कराचार्य, द्वितीय** : (१११४-११८५). भारतीय गणिती व ज्योतिर्विद. सिद्धान्?तशिरोमणि या प्रसिद्ध ग्रंथाचे कर्ते. पृथ्वीच्या अंगी आकर्षण शक्ती आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले होते. पाय् म्हणजे वर्तुळाचा परिघ व त्याचा व्यास यांच्या गुणोत्तराचे मूल्य त्यांनी बरोबर काढले होते. दशमान संख्या पद्धतीचा त्यांनी वापर केला होता व गणितातील अनंत (अनंत-१) या संकल्पनेचा सर्वांत पहिला संदर्भ त्यांच्या सिद्धान्तशिरोमणि या ग्रंथाच्या बीजगणित या खंडात आलेला आहे.

भास्कराचार्य द्वितीय यांचा जन्म विज्जलविड येथे झाला. संशोधक भाऊ दाजी तेलंग यांच्या मते हे गाव महाराष्ट्रातील चाळीसगावाच्या नैऋत्येस १६ किमीवरील सह्याद्रीजवळील पाटण हे असावे, तर काहींच्या मते हल्लीचे बीड हे विज?जलविड होय. भास्कराचार्यांचे ज्योतिषशास्त्रातील प्राथमिक अध्ययन त्यांचे वडील महेश्वर यांच्याजवळ झाले. भास्कराचार्य हे ब्रह्मगुप्त (५९८-६६५) या विख्यात गणित तज्ज्ञांच्या परंपरेतील होते व त्यांच्याप्रमाणे भास्कराचार्यही पुढे त्या काळी भारतातील गणितीय अभ्यासाचे प्रमुख केंद्र म्हणून मानण्यात येणाऱ्या उज?जैन येथील खगोलीय वेधशाळेचे प्रमुख झाले.

सिद्धान्तशिरोमणि (११५०) व करणकुतूहल (११७३) त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ असून सिद्धान्तशिरोममणीवर त्यांनीच टीकाग्रंथ लिहिला होता. याशिवाय भास्करव्यवहार हा मूहूर्तग्रंथ व भास्करविवाहपटल हा छोटा तसेच बीजोपनयन हा ५९ श्लोकांचा ग्रंथ हेही त्यांनी लिहिले असावेत. सर्वतोभद्रयंत्र हे ज्योतिषशास्त्रीय उपकरणांचे पुस्तकही त्यांनी लिहिले होते. त्यांच्या ग्रंथाची फार्सी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तमिळ इत्यादी भाषांत भाषांतरे झाली आहेत. सिद्धान्तशिरोमणी हा ग्रंथ त्यांच्यानंतर सु. ७०० वर्षे ज्योतिषगणितावरील प्रमाणभूत ग्रंथ मानला गेला व त्यावर ४,००० हून जास्त टीकाग्रंथ लिहिले गेले.

सिद्धान्तशिरोमणि या ग्रंथाचे लीलावती (पाटीगणित), बीजगणित, ग्रहगणिताध्याय व गोलाध्याय हे चार खंड असून लीलावती व बीजगणित हे पहिले दोन स्वतंत्र ग्रंथांसारखेच मानण्यात येतात. 'लीलावती' या नावासंबंधी विविध आख्यायिका प्रचलित आहेत. लीलावती ही भास्कराचार्यांची एकुलती एक दुर्दैवाने विधवा झालेली मुलगी होती आणि तिला त्यांनी गणित शिकविले. त्यांनी आपल्या ग्रंथाला तिचे नाव दिले. लीलावतीमध्ये अंकगणित व महत्त्वमापन (क्षेत्रफळ व घनफळ) यांवर २७८ श्लोक असून त्यांचे स्पष्टीकरणही गद्यात दिले आहे. तसेच यामध्ये संख्यांच्या स्थानसंज्ञा, बेरीज, वजाबाकी इत्यादी आधुनिक अंकगणितातील सर्व कृत्ये (परिकर्माष्टके), संकीर्ण नियम, व्याज, गणितीय व भूमितीय पद्धती, प्रतलीय व घनभूमिती, शंकुच्छाया, कुट्टक गणित व काही परिमाणांची कोष्टके दिलेली आहेत. पुढे लीलावतीची १३ प्रकरणांत विभागणी करण्यात आली. अंकगणिताचे पाठ्यपुस्तक म्हणून या ग्रंथाचा भारतात अनेक शतके उपयोग करण्यात येत होता. १५८७ साली अबुल फैजी यांनी लीलावतीचे फार्सी भाषेत भाषांतर केले होते.

बीजगणित या खंडात २१३ श्लोक असून त्यात त्यांनी आधुनिक बीजगणिताप्रमाणे अज्ञात संख्या दर्शविण्यासाठी अक्षरांचा वापर केला होता. यामध्ये धन-ऋण संख्या, शून्य, अव्यक्त व करणी संख्या, कुट्टके, एकवर्णी व अनेकवर्णी द्विघाती समीकरणे, अनिर्धार्य द्विघाती समीकरणे, अव्यक्तांच्या गुणाकाराच्या क्रिया व स्वत:विषयीची माहिती त्यांनी दिलेली आहे. शून्याने एखाद्या संख्येस भागले असता उत्तर अनंत येते, याविषयी त्यांना कल्पना होती, असे दिसते कारण ३/० याचे मूल्यही अनंत राशी आहे, असे त्यांनी एके ठिकाणी स्पष्टपणे नमूद केलेले आहे. ऋण गुणिले ऋण बरोबर धन आणि ऋण गुणिले धन बरोबर ऋण या आधुनिक चिन्ह संकेताचीही त्यांना पूर्वकल्पना होती. बीजगणित या खंडाचे वारा अधिकार (प्रकरणे) असून पैकी कुट्टक व चक्रवालाख्य वर्गप्रकृती हे अधिकार विशेष उल्लेखनीय आहेत. एका संख्येच्या ७ पटीस २३ ने भागिले असता १३ उरतात आणि ४ पटीस २५ ने भागिले असता १७ उरतात, अशा प्रकारांत संख्या काढण्यासंबंधीची उदाहरणे कुट्टकांच्या योगाने सोडविता येतात. अनिश्चित समीकरणे सोडविण्याची भास्कराचार्यांची रीत पाश्चात्त्यांच्या रीतीपेक्षा सरस असल्याचे पाश्चात्त्य गणित तज्ज्ञांचे मत आहे. या खंडात त्यांनी दशमान संख्या पद्धतीचा व्यवस्थित उपयोग करून ब्रह्मगुप्तांच्या व तदनंतरच्या ग्रंथांतील उणिवा दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अत्ता उल्ला यांनी याचे फार्सीत भाषांतर केले होते (१६३४).

ग्रहगणिताध्याय (गणिताध्याय) या खंडात ४, ३४६ श्लोक असून यात ग्रहांसंबंधीचे व पंचांगाचे गणित दिलेले आहे. ग्रहांचे माध्य भोग व शर, स्पष्ट भोग, दैनंदिन गतीचे तीन प्रश्न, सूर्य सांवासिक काल, चंद्र व सूर्य ग्रहणे व पात, ग्रहांचे सूर्यसहोदयास्त व युत्या इ. १२ विभाग यात आहेत. क्रांतिवृत्त (सूर्याच्या भासमान भ्रमणाची वर्तुळाकार कक्षा) व विषुववृत्त (सूर्याच्या भासमान भ्रमणाची वर्तुळाकार कक्षा) व विषुववृत्त यांतील कोनामुळे माध्य व स्पष्ट सूर्योदयामध्ये पडणारे अंतर काढण्यासाठी आवश्यक असणारा एक उदयांतर संस्कार भास्कराचार्य यांनी शोधून काढला.

गोलाध्याय या चवथ्या खंडात २,१०० श्लोक असून गोलाचा अभ्यास, स्वरूप, भूगोल व खगोल, खगोलीय सहनिर्देशकदर्शक गोलाची कृती, गोलीय त्रिकोणमितीची तत्त्वे, ग्रहांच्या माध्य गतीची तत्त्वे, ग्रहगतिदर्शक प्रतिकृती, ग्रहणांचे उदयास्त, खगोलीय उपकरणे, ऋतुवर्णन व उदाहरणे असे १३ विभाग यात आहेत. गोलाध्यायात 'मध्याकर्षण तत्त्व' या नावाने त्यांनी गुरूत्वाकर्षणाच्या नियमांचे विवेचन केले आहे. तसेच गोलाचे पृष्ठफळ व घनफळ काढण्याच्या पद्धती त्यांनी दिल्या आहेत. एकंदरीत गोलाध्याय हा गणिताध्यायाचे अधिक स्पष्टीकरण करणारा खंड असून त्याचा ज्योतिर्गणितात कसा उपयोग होतो हे त्यात दाखविले आहे.

करणकुतूहल (ब्रह्मतुल्य वा ग्रहागाम कुतूहल) या दुसऱ्या ग्रंथात त्यांनी खगोलीय समस्या उकलण्याच्या सोप्या पद्धती दिल्या आहेत. याचे १० अध्याय असून यात शके ११०४ मधील फाल्गुन अमावास्येचे क्षेपक दिले आहेत. तसेच अहर्गणावरून माध्य ग्रहसाधन (उदा., ग्रहांचे माध्य व स्पष्ट भोग, दैनंदिन गतीचे तीन प्रश्न, ग्रहणे इ.) कसे करावे हे विशद केले आहे. त्यामुळे याच्या साहाय्याने पूर्ण पंचांग तयार करता येते.

ग्रहभगणादि माने, स्पष्टाधिकारातील परिध्यंश, माध्य ग्रहाचे बीज-संस्कार, अयन गती इ. गोष्टी त्यांनी आधीच्या ग्रंथांवरून घेतल्या आहेत. त्यांच्या ग्रंथातील विचारसाध्य अशी नवी माहिती वाखाणण्यासारखी आहे.

काटकोन त्रिकोणासंबंधीच्या पायथॅगोरस प्रमेयाचा एक भूमितीय सिद्धांताही भास्कराचार्यांनी स्वतंत्रपणे मांडला होता आणि अनेक गणित-इतिहासकारांच्या मते तो पायथॅगोरस यांच्या मूळ सिद्धांताशी बरीचसा मिळताजुळता आहे. त्यांनी होते. पृथ्वीचे गोलत्व विशद केले होते. पृथ्वीभोवती १२ योजने (सु. १५० किमी.) जाडीचे वातावरण असल्याचे व त्यात ढग, तडित् इत्यादी आविष्कार घडतात, असे त्यांनी लिहून ठेवले आहे. पृथ्वीच्या अक्षीय व कक्षीय भ्रमणांची त्यांना कल्पना होती. ग्रहणात चंद्र-सूर्याला राहू-केतू गिळत नाहीत व चंद्र पृथ्वीच्या छायेत गेल्याने चंद्रग्रहण होते तसेच चंद्र स्वयंप्रकाशित नाही, हे त्यांना माहीत होते. भास्कराचार्य बहुधा उज्जैन येथे मृत्यू पावल्याचे मानतात.

(संदर्भ : विश्वकोश)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आखाडा बाळापूरात धनंजय मुंडेंच्या फोटोला जोडेमारो आंदोलन

## संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**
बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच आ. धनंजय मुंडे यांना आमदार पदावरून बडतर्फ करून त्यांना सहआरोपी करण्याची मागणी करीत दि ४ मार्च रोजी आखाडा बाळापूर येथे आ. धनंजय मुंडे यांच्या फोटोला जोडेमारो आंदोलन केले.

स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणाची चार्जशीट दाखल झाल्यानंतर सरपंच संतोष देशमुख यांच्या खूनाचे व्हिडीओ आणि छायाचित्र व्हायरल झाले. या घटनेचा राज्यभरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथेही नागरिकांनी स्व. संतोष देशमुख यांची अतिशय क्रुरपणे मारहाण करून हत्या करण्यात आली या घटनेचे तीव्र पडसाद कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथेही उमटले. सदरील घटना ही माणुसकीला काळीमा फासणारी आहे. या घटनेचे व्हिडीओ आणि छायाचित्र उपलब्ध असतांना या प्रकरणात वाल्मिक कराड व इतर आरोपींना कारागृहात व्हीआयपी वागणूक दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणात परळीचे आ. धनंजय मुंडे यांना आमदार पदावरून बडतर्फ करून त्यांना सहआरोपी करावे अशी मागणी आंदोलकांनी केली तसेच या प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देऊन सरपंच स्व संतोष देशमुख व त्यांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. मागण्या तत्काळ मान्य न केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलनाचा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी जकी कुरेशी, सोपान बोंढारे, डॉ संतोष बोंढारे, विजय बोंढारे, सुशील बोंढारे, सचिन देशमुख, श्रीकांत पाटील, ऋषीकेश बोंढारे, प्रमोद बोंढारे, संतोष बाभूळकर, संदीप सावंत, अजय बोंढारे, सुरज हेंद्रे, डॉ अरूण सुर्यवंशी यांच्यासह परिसरातील गावकऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी धनंजय मुंडे यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.



**हिंगोली– स्व. ओमप्रकाश देवडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त मोफत कर्करोग तपासणी व उपचार शिबीराचे उद्घाटन करण्यात आले होते. या शिबीरात १२३ रूग्णांची तपासणी करण्यात आली तसेच २५ जणांनी अवयव दान साठी नोंदणी केले. यावेळी बँकेचे अध्यक्ष प्रकाशंचद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा, राजु मुदीराज, एम एम बुद्रुक, डॉ सचिन बगडीया, विठ्ठलदास मुंदडा आदींची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

# पोलिस दलाच्यावतीने तक्रार अर्ज निर्गती मेळाव्यांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**
पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारी तत्काळ संबंधीत पोलिस ठाण्याला वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये सोडविण्यासाठी दर शनिवारी हिंगोली पोलिस घटकाच्यावतीने हिंगोली शहर, औंढा नागनाथ पोलिस ठाणे, वसमत शहर पोलिस ठाणे येथे तसेच जिल्ह्यातील इतर पोलीस ठाण्यांमध्ये दि ८ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही करण्यात आल्या आहेत.
हिंगोली शहर पोलिस ठाणे येथे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे हे स्वत: उपस्थित राहणार आहेत. पोलिस ठाणे बासंबा, पोलिस ठाणे कळमनुरी हद्दीतील तक्रारदार नागरिकांनी दि ८ मार्च रोजी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सतेच वसमत शहर पोलिस ठाणे येथे अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील उपस्थित राहणार असून वसमत शहर, वसमत ग्रामीण, कुरूंदा, आखाडा बाळापूर, हट्टा या पाच पोलिस ठाणे हद्दीतील तक्रारदारांनी दि ८ मार्च रोजी उपस्थित राहण्याचे तसेच पोलिस ठाणे औंढा नागनाथ येथे उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे यांची उपस्थिती असणार असून औंढा नागनाथ, हिंगोली ग्रामीण, नर्सी नामदेव, सेनगाव, गोरेगाव या पाच पोलिस ठाण्याहद्दीतील तक्रारदारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदलीचे वेळापत्रक जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**
राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचे वेळा-पत्रक जाहीर झाले असून दि १० मार्चपर्यंत शिक्षकांची अद्ययावत माहीती ऑनलाईन भरावी लागणार आहे. त्यानंतरच या बदल्या होणार असून नवीन शैक्षणिक वर्षात बदली झालेले शिक्षक आपापल्या जिल्ह्यातील शाळांवर रूजू होणार आहेत. त्यामुळे शिक्षकांमधून बदलीच्या तयारीला वेग आला आहे.
राज्यात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार ऑनलाईन बदल्या केल्या जात असून विन्सीस आयटी सर्व्हिसेस पुणे यांच्या मार्फत बदल्या केल्या जाणार आहेत. त्यामध्ये संवर्ग एकमध्ये दिव्यांग, विधवा, परितक्त्या यांचा समावेश असून संवर्ग दोनमध्ये पतीपत्नी एकत्रीकरण तर संवर्ग तीनमध्ये सर्वसाधारण शिक्षकांचा समावेश आहे. या बदल्यांसाठी शिक्षकांनी ऑनलाईन माहीती भरल्यानंतर त्या जिल्ह्यात त्या संवर्गातील जागा रिक्त असल्यानंतरच बदली होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले आहे. त्यासाठी ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना पत्र पाठवले आहे. यामध्ये १० मार्चपर्यंत शिक्षकांची अद्ययावत माहीती पोर्टलवर भरली जाणार आहे. त्यानंतर ११ मार्च ते १३ मार्च या कालावधीत जिल्हा परिषदांना बिंदू नामावली तपासून घेऊन रिक्तपदांची माहीती अपलोड करावी लागणार आहे. त्यानंतर दि १४ मार्च ते २० मार्च या कालावधीत शिक्षकांना पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा दिली जाणार आहे. दि २१ मार्च ते २५ मार्च या कालावधीत पात्र अर्जांची पडताळणी केली जाणार आहे. यासोबतच न्यायालयीन प्रकरणे, विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल केलेल्या प्रकरणात बदली बाबतचे स्पष्ट आदेश असल्यासया प्रकरणी प्रथमत: तपासून प्राधान्य देण्यासाठी दि २६ मार्च ते २७मार्च या दोन दिवसांचा कालावधी असणार आहे. दि २८ मार्च ते ६ एप्रिल पर्यंत आंतरजिल्हा बदलीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. दि ६ एप्रिलपर्यंत बदली प्रक्रिया पूर्ण होऊन शिक्षकांना त्यांनी मागितलेल्या जिल्ह्यात बदली होणार असल्याने नवीन शैक्षणिक वर्षात नवीन शिक्षक शाळांवर रूजू होणार आहेत.



**हिंगोली– शहरातील तहसील कार्यालयाजवळील रेल्वे उड्डाणपूलाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असून या बांधकामाचे साहीत्याची जुळवाजुळव करतांना दिसत आहे. सध्या अस्तित्वात असलेला रेल्वे उड्डाणपूल अतिशय अरूंद असल्यामुळे याठिकाणी नेहमीच अपघात आणि वाहतुकीची कोंडी होत असते. नवीन रेल्वे उड्डाणपूलामुळे या समस्या निर्माण होणार नाहीत. छाया– विजय गुंडेकर**


## संक्षिप्त वृत्त

### सा. बां. विभागाच्या पतसंस्थेची कार्यकारणी



हिंगोली– सार्वजनिक बांधकाम मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित नांदेड सन २०२५–२०३० या कालावधीची संचालक मंडळ निवडणूक अविरोध पार पडली. यावेळी सर्व अधिकारी, कर्मचारी सन्माननीय सभासद बंधू व भगिनी उपस्थित होते. पतसंस्थेच्या अध्यक्षपदी माधव सूर्याजीराव देशमुख, उपाध्यक्ष विश्वंभर दिगंबरराव ढगे, सचिव सतीश रामराव पवार, संचालकपदी सुनील गुंडेराव मोरे, किशोर विश्वनाथ वावरे, सुरेश विठ्ठलराव बोन्लावार, संतोष विठ्ठलराव पगारे, अशोक विठ्ठलराव नाईक, धनंजय श्रीकृष्णराव साले, वर्षा बबनआप्पा घेवारे, शकुंतला पंडितराव टाकरस यांची निवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

### रमजान ईदनिमित्त पोलिस अधीक्षकांच्या भेटी



हिंगोली– मुस्लीम धर्मीयांचा पवित्र रमजान ईद सणानिमित्त पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शहरातील मेहराज चौक, पेन्शनपूरा, तलाब कट्टा, पलटण, रिसाला बाजार, आजम कॉलनी येथील सर्व मस्जिद तसेच नागरिकांना भेटी दिल्या. यावेळी मुस्लीम बांधवांना रमजान ईदनिमित्त हार्दीक शुभेच्छा दिल्या. यावेळी आजम कॉलनी येथे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचा मुस्लीम बांधवांकडून सत्कार करण्यात आला. यावेळी जुबेर नवयुवक मंडळाचे शेख जुबेर, शेख सज्जाद, शेख एजाज, शेख अल्मास आदींची उपस्थिती होती.

### १३ वाहन चालकांवर कारवाई

हिंगोली– वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच अवैधपणे वाहतुक करणाऱ्या १३ वाहन चालकांविरूध्द हिंगोली पोलिसांच्यावतीने कारवाई करण्यात आली असून सदरील वाहन चालकांकडून १० हजार ७०० दंड वसूल करण्यात आले.

# सांदीपनीच्या बालवैज्ञानिकांनी विज्ञान दिनी सादर केले प्रात्यक्षिक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**
सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनिल नगर तरोडा (बु.), नांदेड येथे राष्ट्रीय विज्ञान दिवसाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांनी सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून केली.
बालवैज्ञानिकांनी आजच्या काळात विज्ञानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मनोगत व्यक्त केले. यात अनया गाडगीळे, तन्वी मिश्रा, रेवंत खंदारे, आरव सुंधाळे, अक्षरा केळगंद्रे, हरजुगतसिंग विष्णुपुरीकर, मनंत कौर, प्रज्ञा वाघमारे, आर्यन देशमुख, समृध्दी मुळे, स्वराली चिंचोळकर, सर्वज्ञ पौवळे, तन्वी जटाळे, रुपाली बोथीकर, तन्वी सुगांवकर, परी वानखेडे, अनंदी राठोड, श्रद्धा गाडगीळे, वेदिका पवार या विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर विज्ञान शिक्षक काळेश्वर पावडे यांनी विज्ञानाच्या विविध प्रयोगातून राष्ट्र उभारणीत विज्ञानाचे महत्त्व दाखवले. त्यांनी प्रत्यक्ष सादरीकरणातून मुलांच्या मनात विज्ञानाची आवड निर्माण केली. शाळेच्या भव्य मैदानात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नवनवीन प्रकल्पांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.
कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मखाले, विज्ञान विषयाचे सहशिक्षक चंद्रकांत लुंगारे, सौ. दिपा लामतुरे, सौ. गितांजली राहेगांवकर व शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन खंडेराव जोगदंड यांनी केले.

# सोनारावर दरोडा टाकून लुटलेले सोने पोलिसांकडून सोनारास केले परत



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ४ मार्च**
दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी सोन्या चांदीचे व्यापारी संतोष शिवकुमार सराफ रा. हिंगाली हे मौजे जांबगव्हाण येथे दिवसभर व्यापार करून सायंकाळी ०७.०० वाजण्याचे सुमारास पत्नीसह स्वतः च्या मोटारसायकलवर हिंगोलीकडे घरी येत असताना अज्ञात सहा दरोडेखारांनी फिर्यादी संतोष सराफ यांच्या डोक्यात लाठी मारून चालत्या मोटारसायकल वरून खाली पाडले व त्यांच्या जवळील ७४ ग्रॅम सोन्याचे दागीने व मोबाईल असलेली बॅग जबरीने घेवुन पळुन गेले होते. त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन औंढा नागनाथ येथे गुन्हा दाखल होता. सदरचा गुन्हा हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री. विकास पाटील, सपोनि घेवारे यांनी उघड करून पाच आरोपीस ताव्यात घेवुन गुन्हयात गेलेला संपुर्ण मुद्देमाल हस्तगत केला होता. तसेच सदर गुन्हयाचा तपास औंढा ना. पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री गणेश राहीरे, सपोनि श्री अरूण नागरे यांनी करीत आहेत.
मुद्देमाल वापसी बावत कायदेशीर प्रकीया पुर्ण झाल्यानंतर पोलीस स्टेशन औंढा चे गणेश राहीरे यांनी सदर गुन्हयातील फिर्यादी नामे संतोष शिवकुमार सराफ रा. हिंगाली यांना पोलीस स्टेशनला बोलावुन घेवुन चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल किंमती अदांजे ६ लाख रूपयांचा जसाच्या तसा फिर्यादीस परत केला आहे. चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल अगदी कमी कालावधीत जसाच्या तसा परत मिळाल्यामुळे व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

# इस्कॉनच्या मूल्यशिक्षण संवर्धन स्पर्धेत एक हजार विद्यार्थ्यांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्चे**
श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, इस्कॉन चौपाटी येथून इस्कॉन द्वारे हिंगोली शाखेच्यावतीने भगवत गीतेवर आधारित मूल्य शिक्षण संवर्धन परीक्षेत ४ थी ते १० वी इयत्तेतील जिल्ह्यातील एकूण १००० विज्ञार्थ्यानी सहभाग घेवून चारित्र्यवान उज्ज्वल भविष्याचा संकल्प केला.
हिंगोली इस्कॉन शाखेच्यावतीने परीक्षेत जिल्हा स्तरावर एकूण प्रथम ५ विद्यार्थ्यानी मेरिटमध्ये यश मिळवले. शालेय स्तरावर एकूण १५ जणांना मेरिटनुसार यशवंत ठरवण्यात आले. त्यावेळेस बक्षीस वितरण प्रसंगी बलदेव प्रभुजी बोलत होते. देश भरात हा उपक्रम सुरू असून चारित्र्यवान पिढी निर्माण साठी इस्कॉन सेवारत आहे असही ते म्हणाले. बक्षीस वितरण समारंभा प्रसंगी, केंद्र शासन कडून आदर्श युवा पुरस्काराने सन्मानित पत्रकार डॉ.विजय निलावार, डॉ.प्रकाश अंभोरे, प्रा.कपिल जमदाडे, प्रा. प्रणव पवार, बालरोग तज्ञ डॉ.नितेश चौधरी, इस्कॉन चौपाटी येथील मूल्य शिक्षण संवर्धन स्पर्धा परीक्षा समिती सदस्य व परीक्षक अभय गोपालदास प्रभुजी आदी उपस्थित होते.
मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशवंत स्पर्धकांना सायकल घड्याळ, बॅग्स आदींचे वाटप करून सत्कार करण्यात आला. प्रथम बक्षीस सायकल हे भारतीय विद्या मंदिरचा विद्यार्थी हनुमान गजानन जाधव पटकावले. द्वितीय बक्षीस लेनोवो टॅब हे वैष्णवी सोहनकुमार पुरोहित यांना मिळाले. तृतीय बक्षीस बोट डिजिटल वॉच दिव्यांश पियुष अग्रवाल, तृतीय बक्षीस आदित्य बबन राठोड, चतुर्थ बक्षीस, स्नेहल गंगाधर गंजवे आणि पाचवे बक्षीस साईश अभयकुमार भरतीया यांनी पटकावले. डॉ नितेश चौधरी, अभय भारतीया, सोहन पुरोहित, परीक्षक अभय गोपालदास प्रभूजी मंचावर उपस्थित मान्यवरांनी यशवंतांच कौतुक केले. हनुमान जाधव, वैष्णवी पुरोहित, सृष्टी लेकुले, कृष्णाली कोटे यांनी परीक्षेमुळे आमच्यात अध्यात्मिक शक्ती सह नवचैतन्य निर्माण झाल्याचे उदगार काढले. १००० विद्यार्थ्यापर्यंत भगवतगीता संदेश पोचल्याने भारतीय संस्कृती, कार्यक्षमता वृध्दी, चारित्र्य संपन्नता यांचा सुरेल संगम साधला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना ध्यान धारणा, करुणा, विनम्रता, सत्यनिष्ठा, आत्मसंयमनन आदींची प्राप्ती झाल्याचे पालकांनी प्रतिक्रियातून सांगितले.
याप्रसंगी पियूष अग्रवाल व प्रा.सुनील गुंडेवार, अभय गोपालदास यांच्या कार्य गौरवार्थ मंचांवरील मान्यवरांनी सत्कार केला. इस्कॉन हिंगोली शाखेने निती मूल्य संवर्धन आणि भगवद्गीताच महत्व अनन्य साधारण असल्याचं या उपक्रमातून अधोरेखित केलं हे यापुढेही निरंतर सुरू ठेवावं अशी अपेक्षा ज्येष्ठ पत्रकार डॉ.विजय निलावार यांनी व्यक्त केली. संचालन सौ. स्मिता देडे, स्वागतपर प्रास्ताविक पियूष अग्रवाल आभार प्रदर्शन प्रीती झुनझूनवाला यांनी मानले. कार्यक्रम स्थळ व्यवस्थापन सुनील गुंडेवार यांनी केले. हिंगोली इस्कॉन शाखेच्या सर्व बंधू, भगिनी, बालगोपाल यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील फोटो व्हायरल झाल्याने बीड जिल्ह्यात कडकडीत


**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ मार्च**


संरपंच संतोष देशमुख यांची दिवसाढवळ्या अपहरण करून हत्या करण्यात आली होती.ही हत्या खंडणी प्रकरणात निर्घृण हत्या करण्यात आली होती. यामुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभर हळहळ व्यक्त करून आरोपींना अटक करण्यासाठी मोर्चे काढण्यात आले होते.

मंगळवारी सकाळी बीड शहरातून सकाळी बंदचे आवाहन करीत दुचाकी रॅली काढण्यात आली. वाल्मिक कराडला फाशी झालीच पाहिजे, अमर रहे अमर रहे संतोष देशमुख अमर रहे अशा घोषणा रॅलीदरम्यान देण्यात आल्या. तर पोलिस संरक्षणात रापमच्या बस सोडण्यात येत होत्या. बीड, घाटनांदूर, अंबाजोगाई, दिंद्रुड, धारूर, वडवणीसह सर्वत्र कडकडीत बंद पाळण्यात आला.

या हत्येतील मुख्य सूत्रधार, एक नंबर आरोपी वाल्मीक कराडसह सर्वच







आरोपींना मोकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली. वाल्मीक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्ती असल्याने धनंजय मुंडे यांच्या राजीनामाची मागणी विरोधाकांनी तसेच सत्ताधाऱ्यांनी लावून धरली होती. काल संतोष देशमुख यांच्या हत्या करतानाचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील संतप्त प्रतिक्रिया आल्या. या हत्येचा तीव्र निषेध करत आज बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. त्यामुळे आज सकाळपासूनच व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेऊन बंदमध्ये सहभागी झाले. बीड शहरातील मुख्य बाजारपेठ सुभाष रोड, मोंढा,धोंडीपुरा, कारंजा रोड,नगर रोड वरील दुकान, हॉटेल्स,छोट्या व्यवसायिकांनी आपले व्यवसाय बंद ठेवले. यावेळी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा,बलभीम चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, माळीवेस भागात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.


## रविवारी सामुदायिक उपनयन संस्कार

### माजलगावात जय्यत तयारी
### डॉ. सचिन देशमुख यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.४ मार्च**

शहरामध्ये समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने ता. ९ मार्च २०२५ रोजी सामुदायिक उपनयन संस्कार चे आयोजन करण्यात आले असुन माउली लॉन्स येथे भव्य - दिव्य असा मंडपसह जय्यत तयारी करण्यात आली असल्याची माहिती उपनयन समितीचे अध्यक्ष डॉ. सचिन देशमुख यांनी दिली आहे.

मानवांच्या ऐहिक व पारलौकिक उत्कर्षासाठी केवळ आणि केवळ वेद माउली समर्थ आहे. विवेक, सदाचार, ज्ञान आणि विज्ञानाची प्राप्ती, वेदाध्ययन व वेदप्रतिपादित कर्मांतूनच होते, आणि वेदाध्ययनाचा हा मौलिक अधिकारी बटूंना उपनयन संस्काराव्दारे प्राप्त होणार आहे. माजलगाव येथील समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने सामुदायिक उपनयन संस्कार चे आयोजन रविवारी सकाळी ११.१२ वा. करण्यात आले आहे. यावेळी रामचंद्र गोपालकृष्ण मठाचे मठाधिपती श्री श्री श्री योगानंद सरस्वती स्वामीजी यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमाची



माउली लॉन्स येथे जय्यत तयारी करण्यात आली असुन कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन सासमुदायिक उपनयन समितीच्या वतीने समितीचे अध्यक्ष डॉ. सचिन देशमुख, बप्पा देशमुख, विनायक रत्नपारखी, आनंतशास्त्री जोशी, नंदु आनंदगांवकर, दामोधर संधीकर, दत्ता महाजन,मुकुंद जोशी, गणेश मुळे,कृष्णा कान्नापुरकर यांचेसह समस्त ब्राम्हण समाज माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.


## धारूरमध्ये बिबट्याचा वावर ; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.४ मार्च**

धारूर वनपरिक्षेत्र कार्यालयाला नागरिकांनी निवेदन दिले आहे.अरणवाडी शिवारात बिबट्याचा वावर असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बिबट्याला पकडण्यासाठी तात्काळ पिंजरा लावण्याची मागणी शेतकऱ्यांनी धारूर वनपरिक्षेत्र कार्यालयात केली आहे. बिबट्याचा वावर असल्यामुळे शेतकरी शेतात जायला घाबरत आहेत. त्यामुळे शेतीची कामे खोळंबली आहेत.

बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. रवीराजे बजरंग माने,शंकर शिवाजी माने,संभाजी माने, दशरथ अभीमान शिनगारे, अतुल गोरख माने,कालिदास निवृत्ती माने, रत्नाकर मधुकर माने,रामकिसन बाबासाहेब नागरगोजे,बाबुराव उद्धव रुद्र आधी शेतकऱ्यांच्या निवेदनावर सह्या आहे.

ठळक मुद्दे खालील प्रमाणे
* धारूर वनपरिक्षेत्र कार्यालयाला शेतकऱ्यांचे निवेदन
* अरणवाडी शिवारात बिबट्याचा वावर
* तात्काळ पिंजरा लावण्याची मागणी



## स्वामी रामानंद तिर्थ महान तपस्वी समाज सुधारक -डॉ.तंगलवाड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ यांनी मराठवाड्यासारख्या ग्रामीण भागामध्ये गोरगरिबांसाठी शिक्षणाची दारे उघडी केली. स्वामीजी महान तपस्वी समाजसुधारक होते असे प्रतिपादन डॉ. दत्ता तंगलवाड यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेत 'स्वामी रामानंद तीर्थ यांचे शैक्षणिक कार्य' या विषयावर द्वितीय पुष्पगुंफताना डॉ. तंगलवाड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे हे होते, तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख डॉ. छत्रपती पांगरकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. तात्याराम सोंडगे उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की स्वामीजी हे मोठे समाज सुधारक होते. शिक्षणातून समाज परिवर्तन घडवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मराठवाड्यात बीड, नांदेड,धाराशिव भागात शाळा महाविद्यालय उभी केली.राष्ट्रीय शिक्षणाचा विचार त्यांनी मांडला. अध्यक्षीय समारोपात डॉ. सुहास मोराळे म्हणाले की स्वामीजींचे विचार हे प्रेरणादायी आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तात्याराम सोंडगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. राम गव्हाणे यांनी केले तर आभार डॉ. पांगरकर यांनी मानले. व्याख्यान मालेचे प्रथम पुष्प प्रा. नारायण शिंदे यांनी गुंफले.'स्वामी रामानंद तीर्थ यांचे मुक्तिसंग्रामातील योगदान' या विषयावर त्यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे होते. दोन्ही व्याख्यानांना महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगाराच्या हाती कोयत्या ऐवजी रेशीम धागा

## बीड तालुक्यात सातशे हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर रेशीम शेती बहरली : तहसीलदार शेळके यांची माळापुरी येथे शेतीभेट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ मार्च**

बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो . ऊसतोड कामगार मोठ्या प्रमाणात आहेत . पावसाचा लहरीपणा व अनियमित पिकणारी शेती याला कुठेतरी फाटा देत बीड जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात तुतीची लागवड करून रेशीम कोष उत्पादन करत आहेत , ही लक्षणीय बाब आहे .

पावसाळा सुरु झाला , खरीप पीक घेतले की उर्वरित आठ महिने ऊसतोडीला जायचे , असा सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकऱ्यांचा शिरस्ता . कापसासारखे नगदी पिकही आता परवडेनासे झाले . अशा परिस्थितीत नरेगा च्या माध्यमातुन रेशीम कोषा च्या विक्रीतून शेतकरी बीड तालुक्यात आज लखपती होत आहेत असे जिल्हा रेशीम अधिकारी शंकर वराट यांनी कळवले आहे .

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना वेळोवेळी ही बाब खटकत होती . ऊसतोड कामगार , अल्पभूधारक शेतकरी यांच्यासाठी काही करता येईल का , यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात . नरेगाच्या माध्यमातून रेशीमशेती , तुतीलागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी जिल्हा रेशीम अधिकारी , तहसीलदार यांना सूचित केले .

बीड तालुक्यातील माळापुरी येथील प्रगतशील शेतकरी मन्सूर बेग हे रेशीम शेती मधून वर्षाकाठी एक एकरातून अडीच ते तीन लाख रुपये सहज नफा कमवतात . त्यांच्या खास भेटीसाठी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके माळापुरी येथे सोमवार दिनांक ३ मार्च रोजी पोहोचले . परिसरातील विविध रेशीम शेतकऱ्यांच्या क्षेत्रावर पाहणी करून रेशीम शेती किती किफायतशीर आहे हे प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या तोंडूनच त्यांनी या ठिकाणी ऐकले . यावेळी शेतकऱ्यांनी इतर पिकाच्या तुलनेत रेशीम शेती खूप फायद्याची असून शाश्वत उत्पादनाची हमी या शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळते असे आवर्जून सांगितले . बीड तालुक्यामध्ये एकूण ७२९ एकरवर तुती पिकाची लागवड केली असून या पिकाच्या माध्यमातून शेतकरी मोठ्या प्रमाणात रेशीम कोष उत्पादन करून आपले आर्थिक जीवनमान उंचावत आहेत . बीड तालुक्यात माळापुरी, काकडहिरा , बेलखंडी पाटोदा , उमरदखालसा , नागापूर बुद्रुक , खांडे पारगाव , कामखेडा , राक्षस भुवन , कुक्कडगाव , नेकनूर सफेपुर , घाट जवळा , बऱ्हाणपुर , परभणी केसापुरी , कदमवाडी, नाळवंडी या गावात तुती लागवड मोठ्या प्रमाणात होते . विशेष म्हणजे बीड शहरातच रेशीम अंडकोष विक्रीचे विक्री केंद्र आहे त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा माल बंगलोर किंवा कर्नाटक कडे घेऊन जावा लागत नाही .

विशेष म्हणजे गणेश बडगे या रेशीम शेतकऱ्याने नुकतीच बाजार पेठेत कोष विक्री केली असता त्यांस २१८.७०० किलो एवढया वजनाच उत्पन्न मिळाले म्हणजेच प्रती किलो ७६५ एवढा भाव मिळाला .रेशीम शेती का व कोणी करावी : - कोणीही शेतकरी एका अर्जदारास एक एकर याप्रमाणे पाच एकर पर्यंत या योजनेत तुती लागवड करू शकतात . तुती लागवडी करीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माधयमातून ४,१८, ८१५ अक्षरी चार लाख अठरा हजार आठशे पंधरा रुपये शेतकऱ्याला अर्थसहाय्य प्राप्त होते . यात पहिल्या वर्षी अकुशलसाठी १४७०१५ रुपये, कुशलसाठी १५१००० रुपये असे एकूण २९८०१५ रुपये तर दुसऱ्या वर्षी अकुशलसाठी ५९४०० तर कुशल साठी १००० असे ६०४०० रुपये तर तिसऱ्या वर्षी अकुशल साठी ५९४०० रु व कुशलसाठी १००० असे एकूण ६०४०० रु अनुदान मिळते .

तुती (मलबेरी) : - मोरस इंडिका हे मलबेरीचे शास्त्रीय नाव आहे . तुती ही एक वनस्पती आहे . रेशीम उद्योगाची सुरुवात तुतीच्या झाडांच्या लागवडीपासून होते . यामध्ये व्ही -१ व एस - १६३५ या तुतीच्या जातीच्या लागवडीतून पाल्याचे उत्पादन चांगले मिळते असे मानले जाते . या जाती बागायती क्षेत्राकरिता प्रसारित करण्यात आल्या आहेत . तुतीची लागवड पावसाळ्यामध्ये करता येते . जमिनीची मशागत करून एक एका पट्ट्यात ५ फुट बाय २ फुट अंतरावर तुती



लागवड केली जाते . तुतीचे पहिले पीक तयार होण्यास ५ ते ६ महिने लागतात . पहिल्या पिकाचा पाला रेशीम किडयांना खाऊ घातल्यानंतर तुतीच्या झाडांची जमिनीपासून एक फूट उंचीवर छाटणी केली जाते . यानंतर येणारे पीक साधारणपणे दोन महिन्यांत तयार होते . अशाप्रकारे दुसऱ्या वर्षांपासून प्रतिवर्षी पाच ते सहा पिके बागायती जमिनीतून मिळतात . एकदा लागवड केलेल्या तुतीच्या झाडापासून २० ते २५ वर्षांपर्यंत पाला उपलब्ध होऊ शकतो .

आर्थिक महत्व : - तुती ही मोरेसी कुटुंबातील मोरस वंशातील एक अतिशय कणखर आणि जलद वाढणारी बारमाही वनस्पती आहे . तुतीच्या पानांचा वापर केवळ रेशीम किड्याच्या आहारासाठी आणि संगोपनासाठी केला जातो , बॉम्बिक्स मोरीचा वापर रेशीम धाग्याच्या उत्पादनासाठी केला जातो . असा अंदाज आहे की एकूण जागतिक कच्च्या रेशीम उत्पादनात तुती रेशीमचा वाटा सुमारे ९०% आहे आणि ग्रामीण लोकांसाठी हा एक अतिशय आकर्षक आर्थिक क्रियाकलाप आहे . रेशीम किड्यांचे खाद्य म्हणून तुतीच्या पानांचा वापर करण्याव्यतिरिक्त , ते इतर अनेक कारणांसाठी देखील वापरले जात आहे . उदाहरणार्थ , उच्च पौष्टिक मूल्य आणि स्वादिष्ट चवीमुळे तुती फळाला मौल्यवान अन्नपदार्थ म्हणून महत्त्व मिळत आहे . तुतीची साल आणि लाकूड कागद आणि क्रीडा वस्तूंच्या उत्पादनासाठी देखील उपयुक्त आहे . त्याचबरोबर मिळणारी मलबेरी ही फळे औषधी गुणधर्म असल्याकारणाने त्याचा वापर आयुर्वेदामध्ये देखील केला जातो .

जमीन व हवामान : - हलकी ते मध्यम भारी उत्तम पाण्याचा निचरा होणारी जमीन तुती लागवडी करता निवडावी , समशितोष्ण हवामानाला हे पीक उत्तमम प्रतिसाद देते अति थंडी पिकास हानिकारक ठरते .

लागवडीचा हंगाम : - खरीप , रब्बी व उन्हाळी या तीनही हंगाम्यात पीक लागवडीस योग्य जाती ह्या व्ही १ , एम ५ , एस ३६ , एस ५४ या आहेत.बीज प्रक्रिया : - तुती वाळवी व बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये याकरता १) एक टक्का थायमेटच्या द्रावणामध्ये तीन ते चार तास कलमे बुडवून ठेवावीत . २) बुरशीनाशक बाविस्तीत किंवा कॅप्टन एक टक्का द्रावणात चार ते पाच तास बेणे बुडवून ठेवावे . ३ ) तुती बेण्याला लवकर मुळे फुटणयाकरता रुटएक्स पावडर बेण्याच्या खालच्या भागास लावावी जेणेकरून मुळ्या लवकर फुटतील व जोमदार वाढ होईल .

## स्व.संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या ;लिंबागणेशकरांचा उत्स्फूर्त बंद

**तभा वृत्तसेवा**
**लिंबागणेश दि.४ मार्च**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण करताचे व्हिडिओ आरोपीने काढल्यानंतर ते व्हिडिओ सीआयडीने रिकव्हर करीत त्यातील स्क्रीन शाट चार्जशीटला जोडले आहेत.आता हे स्क्रीन माध्यामांच्या हाती लागले असून ते फोटो माध्यमांनी प्रकाशित केल्यानंतर सर्वसामान्य माणसांचे मन हेलावून गेले असुन संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे.संतोष देशमुखांचा अमानुष छळ करून मृतदेहाची विटंबना केल्याने जनसामान्यांत संतापाची लाट उसळली आहे. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सर्व समाजातील ग्रामस्थांनी आज दि.४ मंगळवार रोजी सर्व दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवत गावच्या वेशीवर स्व.संतोष आण्णा देशमुख अमर रहे मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशा घोषणा देत उत्स्फूर्त बंद पाळला. यावेळी राजेभाऊ गिरे,पांडुरंग वाणी, बाळकृष्ण थोरात, साहेबराव निर्मळ, अशोक वाणी,विनायक मोरे,दशरथ दाभाडे, विठ्ठल कदम, दिनेश जाधव, महेश ढवळे, बाजीराव नाईगडे, रामकिसन गिरे, अमोल साळवे, अर्जुन घोलप,रवी वायभट, हरिओम क्षीरसागर, डॉ.गणेश ढवळे आदि उपस्थित होते.

स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांचा पोलिस प्रशासनावर दबाव





असल्याने निष्पक्ष तपास होणार नसल्याने त्यांचा राजीनामा घ्यावा.अशी बीडकरांची मागणी होती.मात्र पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे एकंदरीतच बीडचे पालकमंत्री बीडमधील स्व.संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येप्रकरणी संवेदनशील असल्याचे दिसून आले नाही. मुख्यमंत्री यांनी मागील केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला. त्यामुळे आता नैतिकता म्हणून अजितदादा पवार यांनी बीड पालकमंत्री पदाचा राजीनामा देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्री पद स्विकारावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.